


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ गुरुवार १६ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०




## मद्यधुंद पोलिसाच्या मोटारीने अनेक गाड्यांना उडवलं; ७ जण जखमी



**पुणे/प्रतिनिधी** : पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली असून पोलिसानेच कायद्याचे उल्लघंन केलंय. पोलीस कॉन्स्टेबलने पुण्यात डंक अँड ड्राईव्ह करत ६ गाड्यांना जबरदस्त धडक दिली आहे. या अपघात ७ जण जखमी झाले आहेत. ही घटना रांजणगाव गावात झाली असून त्या पोलीस कॉनस्टेबलचं नाव हेमंत इनामे असं आहे. दारूच्या नशेत त्याच्या कारने अनेक गाड्यांना जोरदार धडक दिली. धक्कादायक म्हणजे या प्रकरणात कॉनस्टेबलला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. कॉनस्टेबलच्या (पान २

## धावत्या बसला लागलेल्या आगीत २० प्रवाशांचा मृत्यू

**जैसलमेर** बस दुर्घटनेत अनेकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना जयपूरच्या टोंक रोडवर सीटी ट्रान्सपोर्टच्या मिनीबसला अचानक आग लागली. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. सर्व प्रवाशांनी आपला जीव वाचवण्यासाठी खिडक्या आणि दरवाज्यांमधून उड्या मारल्या. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये व परिसरात मोठी घबराट पसरली. आगीची कारण अस्पष्ट असून पोलीस आणि वाहतूक विभागाने या घटनेचा तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, टोंक रोडवर जयपूर सिटी ट्रान्सपोर्ट सर्व्हिस लिमिटेडची मिनीबसच्या मागच्या बाजूने धूर निघाल्यानंतर काही मिनिटांतच आग लागली. चालकाने त्वरित बस रस्त्याच्या कडेला थांबवली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आणि त्यांनी आग आटोक्यात आणली. सुदैवाने, या घटनेत कोणत्याही प्रवाशांना गंभीर दुखापत झाली नाही.

प्रवाशांनी या घटनेनंतर सिटी ट्रान्सपोर्टच्या सेवेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, ही बस



अत्यंत जुनी होती आणि तिची योग्य देखभाल करण्यात आली नव्हती. शहरात धावणाऱ्या अनेक मिनी बसेस जुन्या झाल्या आहेत आणि त्यांची देखभाल होत नाही, यामुळे अशा दुर्घटना वाढत आहे, असाही प्रवाशांनी आरोप केला.

पोलिसांनी आणि वाहतूक विभागाने या संपूर्ण घटनेचा तपास सुरू केला आहे. जळालेली बस रस्त्यावरून बाजूला काढल्यानंतर टोंक रोडवरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली. जयपूरमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील बसेसची देखभाल आणि सुरक्षितता यावर प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे, असे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

### निवडणूक विभागाचा अजब कारभार चव्हाट्यावर

## अख्खीच्या अख्खी गावंच मतदारयादीतून गायब

### पंचायत समितीचे माजी सभापती शशिकांत मंगळे यांची जिल्हाधिका-यांकडे तक्रार




**अमरावती/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर निवडणूक विभागाचा अजब कारभार चव्हाट्यावर आला आहे. निवडणूकीपूर्वी निवडणूक विभागानं प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदारयाद्यांत अख्खी गावं गायब आहेत. पंचायत समितीचे माजी सभापती शशिकांत मंगळे यांचा हा आरोप असून त्यांनी जिल्हाधिका-यांकडे तक्रार केली आहे.

यावर यशोमती ठाकूर यांनी प्रतिक्रिया देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. आता हळूहळू सगळीकडून वोट चोरीची प्रकरणं बाहेर येत आहेत. अंजनगाव तालुक्यातून गावच्या गावं वगळण्यात आली. असं करून निवडणूक जिंकत आहेत. भाजपकडे फिरते वोटर आहेत. ते अमरावती जिल्ह्यात मध्य प्रदेशात आणि राजस्थानमध्येही वोट करतात, असा गंभीर आरोप ठाकूर यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही यावरून टीकास्त्र डागलं आहे. रोज नव्या नावाची आणि शहराची माहिती बाहेर येत आहे. ज्या निवडणूक आयोगावर सगळ्यांचा विश्वास होता त्यांच्याकडून असं होणं योग्य नाही, असं सुळे यांनी म्हटलं आहे. सध्या राज्यातल्या विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाची भेट घेऊन मतदार याद्यांमधील घोळासंदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत.

निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन रितसर तक्रार केली आहे. अशा परिस्थितीत आता अमरावतीमधील मतदार याद्यांमधील घोळही समोर आला आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणावर आता आयोगाची काय भूमिका असणार आहे, हे पाहावं लागणार आहे.

### नक्षलवादाच्या इतिहासातील सर्वांत मोठी शरणागती

## वेणुगोपाल राव सह ५० सहकाऱ्यांचे पोलिसांसमोर आत्मसमर्पण

**गडचिरोली /वृत्तसंस्था-** गडचिरोलीतील नक्षलवाद संदर्भात एक अतिशय महत्वाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. गडचिरोली पोलीस आणि महाराष्ट्राच्य गृह विभागाच्या माओवाद विरोधातील लढाईला आजवरचं सर्वात मोठं यश प्राप्त झालं आहे. माओवाद्यांचा पॉलिट ब्युरो मेंबर तसेच सेंट्रल कमिटी मेंबर मल्लोजूला वेणुगोपाल राव उर्फ सोनू उर्फ भूपती याने त्याच्या ५० सहकाऱ्यांसह गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केल्याची माहिती समोर आली आहे. काल (१४ ऑक्टोबर) रात्री दक्षिण गडचिरोली जिल्ह्यातील घनदाट जंगलात छत्तीसगड सीमेलगत महाराष्ट्राच्या बाजूने हे सामूहिक आत्मसमर्पण झाले आहे. परिणामी गडचिरोलीच्या इतिहासातील हि आजवरची सर्वात मोठी शरणागती असल्याचे बोलले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,



तब्बल सहा कोटींचे बक्षीस असलेल्या मल्लोजुला रावसह ५०हून अधिक नक्षलवादी आज शरणागती पत्करणार आहे. यामुळे नक्षल चळवळीला मोठा धक्का बसला आहे. विशेष

### देवेंद्र फडणवीसांचा विमान प्रवास मोर्चा गडचिरोलीकडे

म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऐनवेळी सोलापूरचा विमानप्रवास टाळून मोर्चा गडचिरोलीकडे वळवला आहे. ते आज देवेंद्र गडचिरोलीत या कार्यक्रमाला स्वत: उपस्थित राहणार आहे. शिवाय मुख्यमंत्री उपस्थित राहणार असतील तर शरणागती पत्करु, अशी अटच वेणुगोपाल राव उर्फ सोनू उर्फ भूपती याने टाकली होती. त्यामुळे ऐनवेळी सोलापूरचा विमानप्रवास टाळून मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या मोर्चा गडचिरोलीकडे वळवला आहे. तर गडचिरोलीतील कार्यक्रम आटोपून मगच देवेंद्र फडणवीस (पान २ वर)

### भीषण संघर्षानंतर पाकिस्तानची शस्त्रसंधीसाठी अफगाणिस्तानला विनवणी

## दोन्ही देशांत ४८ तासांसाठी युद्धविराम

**लाहोर/वृत्तसंस्था-** पाकिस्तान आणि अफगाणिस्तान मधील तालिबान कडून चालवल्या जाणाऱ्या प्रशासनाने बुधवारी संध्याकाळी ६ वाजल्या पासून पुढील ४८ तासांसाठी तात्पुरता युद्धविराम घोषित करण्यास सहमती दर्शवली आहे. सीमेवर नव्याने झालेल्या संघर्षानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तान आणि अफगाणिस्तान मध्ये भीषण संघर्ष सुरू आहे. पाकिस्तानने अफगाणिस्तानमधील काबूलजवळील काही ठिकाणांना



लक्ष्य करून केलेल्या एअर स्ट्राईकनंतर हा संघर्ष चिघलला होता. दरम्यान, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान मधील तालिबान कडून चालवल्या जाणाऱ्या प्रशासनाने बुधवारी संध्याकाळी ६ वाजल्यापासून पुढील ४८ तासांसाठी तात्पुरता युद्धविराम घोषित करण्यास सहमती दर्शवली आहे. सीमेवर नव्याने झालेल्या संघर्षानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने घोषित करण्यात (पान २ वर)

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीला दे धक्का, दोन जिल्हाध्यक्षांचा तडकाफडकी राजीनामा; अजित पवारांकडे जाणार?

**मुंबई/प्रतिनिधी** :: राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, महापालिका निवडणुकां ची रणधुमाळी पाहायला मिळत असून राजकीय पक्ष युती व आघाड्यांमध्ये वाटाघाटी करत आहेत. तर, गावागावात भावी सदस्य आणि नगरसेवक सोशल मीडियावर झळक आहेत. निवडणूक आयोगही कामाला लागला असून जिल्हा प्रशासन गतीमान झाल्याचं पाहायला मिळत आहे. त्यातच, या निवडणुकांच्या अनुषंगाने आपली उमेदवारी, आणि सत्तेतील सहभागासाठी पक्षप्रवेश



व पक्षांतराच्याही हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यातच, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला आज दोन मोठे हादरे बसले आहेत. कारण, हिंगोली आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील राष्ट्रवादी शप पक्षाच्या जिल्हाध्यांनीच राजीनामा दिला आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी राजीनामा दिल्यानंतर अवघ्या काही तासांतच अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनीही आपला राजीनामा दिला आहे. राष्ट्रवादीतील या दोन्ही नेत्यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे (पान २ वर)




## एसटी बँकेच्या बैठकीत तुफान राडा!

### बोर्ड बैठकीत सदावर्ते विरुद्ध शिंदे गट हाणामारी; बाटल्या फेकल्या, खुर्च्या मोडल्या

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईतील राज्य परिवहन सहकारी बँकेच्या बोर्ड बैठकीत बुधवारी दोन विरोधी गटांमध्ये प्रचंड गोंधळ आणि हिंसक संघर्ष झाला.

शिवीगाळ, बाटल्या फेकणे आणि शारीरिक हाणामारीचे हे धक्कादायक दृश्य व्हिडिओमध्ये कैद झाले असून, ते सोशल मिडियावर व्हायरल झाले आहे.

हा संघर्ष अॅड. गुणरत्न सदावर्ते यांच्या समर्थकांमध्ये आणि एकनाथ शिंदे-नेतृत्वाखालील शिवसेना गटाशी संबंधित कार्यकर्त्यांमध्ये झाला. एका व्यक्तीने बैठकीचे रेकॉर्डिंग करण्यावर आक्षेप घेतल्याने आणि 'कार्यवाही लीक करू नका' अशी मागणी केल्याने जोरदार शाब्दिक बाचाबाची झाली, जी लगेच शारीरिक हाणामारीत बदलली.

दोन्ही गटांनी एकमेकांवर बाहेरील लोकांना आणल्याचा आणि हिंसाचार सुरू केल्याचा आरोप केला आहे.

नागपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, या घटनेत सामील असलेल्या सर्वांची ओळख पटवण्यासाठी व्हायरल व्हिडिओ फुटेज तपासले जात आहे. हा



संघर्ष एसटी बँकेच्या बोर्डातील भ्रष्टाचार आणि आर्थिक गैरव्यवस्थापनाच्या चालू असलेल्या आरोपांशी जोडलेला असल्याचे प्राथमिक निष्कर्षातून दिसून येते. (पान २ वर)

## 'बँक ऑफ महाराष्ट्र'सह भारतातील ४ मोठ्या बँकांचे विलीनीकरण?

**मुंबई/प्रतिनिधी** :भारतातील बँकिंग क्षेत्रात आणखी एक मोठा बदल होणार आहे. सरकार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे (इएँ) मेगा विलीनीकरणावर करणार आहे. सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना मोठ्या बँकांमध्ये विलीन करण्याची योजना बनवली आहे. 'बँक ऑफ महाराष्ट्र'सह भारतातील ४ मोठ्या बँकांचे विलीनीकरण होणार आहे. खातेदारांवर याचा काय परिणाम होणार?

इंडियन ओव्हरसीज बँक सेंट्रल बँक ऑफ इंडिया , बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र या चार बँकांचे पंजाब नॅशनल बँक बँक ऑफ बडोदा आणि स्टेट बँक ऑफ इंडिया सारख्या मोठ्या बँकांमध्ये विलीनीकरण करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रस्तावावर प्रथम वरिष्ठ कॅबिनेट अधिकाऱ्यांकडून चर्चा केली जाईल. यानंतर पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) त्याचा आढावा घेईल. २०२७ च्या आर्थिक वर्षातही चर्चा सुरू राहण्याची अपेक्षा आहे. वर्षाच्या आत एक रोडमॅप अंतिम केला




जाऊ शकतो. तथापि, संबंधित बँकांचे विचार मागितले जातील आणि सल्लामसलतीसाठी वेळ दिला जाईल. 'सरकार कोणतीही औपचारिक घोषणा करण्यापूर्वी अंतर्गत सहमती निर्माण करू इच्छिते,' असे सूत्रांनी सांगितले.

केंद्र सरकार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एकत्रीकरण करण्याची योजना आखत आहे. अशातच या चार मोठ्या बँकांच्या विलीनीकरनाचा प्रस्ताव समोर आला आहे. यापूर्वी २०१७ ते २०२० दरम्यान, सरकारने १० सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे चार मोठ्या संस्थांमध्ये विलीनीकरण केले होते, ज्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या २०१७ मध्ये २७ वरून १२ झाली. ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक ऑफ इंडियाचे पीएनबीमध्ये विलीनीकरण झाले, तर सिंडिकेट बँक कॅनरा बँकेत विलीन झाली.

सरकार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे मेगा विलीनीकरण करणार आहे. यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना मोठ्या बँकांमध्ये विलीन करण्याची योजना आहे.

<u>२ कोणत्या चार बँकांचे विलीनीकरण होणार आहे?</u>

इंडियन ओव्हरसीज बँक सेंट्रल बँक ऑफ इंडिया , बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र (ँदश) या चार बँकांचे पंजाब नॅशनल बँक बँक ऑफ बडोदा (ँदँ) आणि स्टेट बँक ऑफ इंडियासारख्या मोठ्या बँकांमध्ये विलीनीकरण करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या विलीनीकरण प्रस्तावावर (पान २ वर)



## एमडी ड्रग्स सह आरोपी गजाआड

# ६.८० लाखाचा मुद्देमाल जप्त, गुन्हे शाखाची यशस्वी कामगिरी



**अमरावती -** गुन्हे शाखाच्या पथकाने यशस्वी कामगिरी करत एमडी ड्रग्स ची विक्री करण्याकरिता येणाऱ्या आरोपीला पांढरी हनुमान मंदिर परिसरातून ताब्यात घेतले. अब्दुल राजिक अब्दुल ताहीर ( ३२,अलहिलाल कॉलनी) अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून ५६ ग्रॅम एमडी ड्रग्स ५ लाख ६० हजार, बर्गमन कंपनीची मोपेड १ लाख १० हजार, विवो कंपनीचा मोबाईल १० हजार असा एकूण ६ लाख ८० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. माहिती अनुसार गुन्हे शाखाच्या पथकाला माहिती मिळाली की एका काळ्या रंगाच्या मोपेड गाडीवर एमडी ड्रग्सची विक्री करणे करिता आरोपी अब्दुल राजिक अब्दुल ताहीर पांढरी हनुमान मंदिराच्या बाजूला येणार आहे. यावरून पथकाने पंचा समक्ष कारवाई करून आरोपीला तिथून ताब्यात घेतले. त्याच्या कडून ५६ ग्राम एमडी ड्रग्स,१ दुचाकी,१ मोबाईल असा एकूण ६ लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.गाडगे नगर पोलीस स्टेशन येथे आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करणयात आले आहे. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त शाम घुगे, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात सपोनी मनीष वाकोडे, हेड कॉन्स्टेबल सतीश देशमुख, फिरोज खान, अजय मिश्रा, अमंलदार सुरज चव्हाण,शेख नाझीम, रणजित, चेतन कराळे, सागर ठाकरे यांनी कारवाई मध्ये सहभाग केला.

# शासकीय विभागीय ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा



**अमरावती -** वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञानसंपन्न व माहिती समृध्द समाज घडविण्यासाठी वाचन संस्कृतीचा प्रचार, प्रसार व विकास होणे आवश्यक आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती सार्थ रितीने जतन करुन त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी आणि विदयार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनांची आवड व प्रेरणा निर्माण करणे व वाचनाचे महत्त्व जाणून घेणे यासाठी दरवर्षी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम यांचा (१५ऑक्टोंबर) हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात येत असतो. त्यानिमीत्याने विविध साहित्यकृती, ग्रंथांचे प्रदर्शन शासकीय विभागीय ग्रंथालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्या हस्ते या ग्रंथ प्रदर्शनाचेउद्घाटन करण्यात आले. तहसीलदार विजय लोखंडे, सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी तसेच ग्रंथालय कर्मचारी, विदयार्थी व वाचक वर्ग उपस्थित होते. श्री. अनिल भटकर यांनी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. विजय लोखंडे . यांनी . मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश पाटील यांनी तर आभार डॉ. सूरज मडावी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता ग्रंथालयाचे कर्मचारी गजानन कुरवाडे, दीपक गेडाम, अजय इंगळे, शेषराव भिरडे, राजाराम देवकर, श्री. वानखेडे, श्री. मिश्रा, योगेश घवडे इत्यादी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# चांदूर रेल्वेच्या प्रवीण पुंड यांचा विक्रम, इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद!

### १४ मिनिटांत १०० पर्यंत पाढे बिनपाहता -विलक्षण स्मरणशक्तीचा चमत्कार!'



**चांदूर रेल्वे -** डॉ. सी. व्ही. रमण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदूर रेल्वे येथील वरिष्ठ लिपिक श्री. प्रवीण पंजाबराव पुंड यांनी आपले नाव थेट इंटरनॅशनल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंदवून चांदूर रेल्वेचे नाव उज्ज्वल केले आहे. प्रवीण पुंड यांनी 'थ्री क्वार्टर चा पाढा' (३/४ चा गुणाकार) १ ते १०० पर्यंत चढत्या व उतरत्या क्रमाने, तसेच प्रत्येक रांग उजवीकडून डावीकडे व डावीकडून उजवीकडे दोन्ही प्रकारे केवळ १४ मिनिटे १८ सेकंदात बिनपाहता म्हणून दाखवून हा आश्चर्यकारक विक्रम केला. त्यांच्या या अद्वितीय स्मरणशक्ती व गणिती कौशल्यामुळे इंटरनॅशनल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्सने त्यांना अधिकृत प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले आहे. या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य, सहकारी शिल्पनिदेशक व कर्मचारी वर्गांनी त्यांचे अभिनंदन केले. गणित विषयातील निपुणता आणि मानसिक तालीम यामुळे विद्यार्थी वर्गासाठी प्रेरणादायी ठरावा, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. प्रवीण पुंड यांचा हा विक्रम 'गणितातील मानसिक वेग व स्मरणशक्तीचे उत्कृष्ट उदाहरण' म्हणून नोंदला गेला असून, चांदूर रेल्वे शहरासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.

## शंकरराव तिरमारे यांचे निधन



**अमरावती -** स्थानीक स्वस्तीक नगर येथील रहीवासी तथा कृषक विकास नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव दौलतराव तिरमारे यांचे आज बुधवारी (ता.१५) निधन झाले. मृत्युसमयी ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्यावर उद्या गुरुवारी हिंदू स्मशान भूमी अमरावती येथे सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार होणार आहे. त्यांच्या मागे एक मुलगा विनोद तिरमारे, तीन विवाहित मुली, नातू, पणतू असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व. शंकरराव तिरमारे साईनगर प्रभाग अमरावती येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष होते. त्यांचा समिधा हा कथा संग्रह प्रकाशित झाला आहे. त्यांना जिल्हास्तरीय समाजभूषण पुरस्कार, मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय मराठी वाङ:मय पुरस्कार, सातपुडा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे.

# अप्पर आयुक्त यांच्या आदेशाने लोतवाडा येथिल सरपंच, उपसरपंच, व ग्र.पं. सदस्य अपात्र

### राजकीय वर्तुळा खळबळ, भिमराव कुऱ्हाडे यांनी अप्पर न्यायालयात केली होती तक्रार

**खल्लार -** दर्यापूर तालुक्यातील लोतवाडा येथिल सरपंच सौ दुर्गा सुधिर गावंडे, उपसरपंच ओंकार बबन,कात्रे ग्रामपंचायत सदस्य सौ शुभांगी अतूल भदे यांनी ग्रामपंचायतच्या शासकीय जागेत अतिक्रमण करुन सरकारी रस्त्यावर घराचे पक्के बांधकाम करुन अतिक्रमण केल्याने लोतवाडा येथिल सामाजिक कार्यकर्ते भिमराव विठ्ठलराव कुऱ्हाडे यांनी अपर जिल्हाधिकारी,अमरावती येथे अपिल दाखल केली होती . त्या अतिक्रमण धारकाचा अहवाल सचिव ग्रामपंचायत लोतवाडा यांनी मोका पाहणी अहवालानुसार सरपंच उपसरपंच व सदस्य यांनी शासकीय जागेत अतिक्रमण केले असल्याचा पंचनामा करुन त्यावर पंचाच्या सह्या घेऊन तो अहवाल अपर जिल्हाधिकारी,अमरावती यांच्या न्यायालयात दाखल केला होता. मात्र न्याय मिळाला नसल्याने त्या आदेशा विरोधात भिमराव कुऱ्हाडे यांनी अपर आयुक्त अमरावती यांचे न्यायालय अमरावती येथे पुन्हा अपिल दाखल केले.यावेळी पुन्हा ग्राम पंचायत सचिवांच्या माध्यमातून तपसणी करीत अर्जदार गैरअर्जदार व पंच समक्ष घराची व जागेची मोजणी केली असता सरपंच,उपसरपंच व सदस्य यांनी शासकीय जागेत अतिक्रमण केल्या बाबतचा अहवाल व जीपीएस फोटो अपर आयुक्त अमरावती यांचे न्यायालयात दाखल केले अपर आयुक्त यांनी संपूर्ण प्रकरणाचा अभ्यास करुन दि. १०ऑक्टोबर रोजी सौ दुर्गा सुधिर गावंडे (सरपंच) ओंकार बबन कात्रे ( उपसरपंच ) व सौ शुभांगी अतूल भदे ( सदस्य ) ग्राम पंचायत लोतवाडा यांना पद मुक्त केले. अपिलार्थी भिमराव कुऱ्हाडे यांचे वतीने ॲड स्वप्नील पाटील ओव्हर अमरावती यांनी काम पाहिले.

**हा सत्याचा विजय**

लोतवाडा येथिल सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी अतिक्रमण केले होते. त्याबाबतचा पाठपुरावा मी केला न्यायव्यवस्थेने सत्य समोर आणले त्यात शेवटी सत्याचा विजय झाला.

**-भिमराव कुऱ्हाडे,** अपिलार्थी

अप्पर आयुक्त अमरावती यांनी दिलेला निर्णय मला पूर्णपणे मान्य आहे. न्यायव्यवस्थेवर आमचा विश्वास आहे.

**-सौ दुर्गा सुधिर गावंडे,** सरपंच, लोतवाडा

# लालखडी मध्ये प्लास्टिक गोदामला भीषण आग

**४ लाखांचे नुकसान**





**अमरावती -** लालखडी मार्गावरील प्लास्टिक गोदामला आज बुधवार १५ ऑक्टोंबरच्या सकाळी १० वाजता सुमारास लागलेल्या भीषण आगीत ४ लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अग्निशमन विभागाने शर्तीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवल्याने संभाव्य अनर्थ टाळला. माहितीनुसार लालखडी मार्गावर सय्यद सुफियान सय्यद हफीज यांचे प्लास्टिक गोदाम आहे. लाल खडी चौक ते नवसारी रिंग रोड मार्गावर अनेक लोक कचरा टाकतात आणि त्या कचऱ्याची विल्हेवाट लागावी म्हणून कचऱ्याला आगही लावतात. काही दिवसापूर्वी येथे आंदोलन देखील झाले होते. संतप्त नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करून महापालिकेचा निषेध नोंदवला होता तरी देखील कचरा टाकण्याचे प्रमाण कमी झालेले नाही. बुधवारी सकाळी कचऱ्याच्या आगीतून निघालेली चिंगारी प्लास्टिक गोदाम पर्यंत पोहोचली आणि तेथील प्लास्टिक सामग्री व बारदाना जळू लागला. आग एवढी भीषण होती की आगीच्या लोट आणि धूर २ किलोमीटर पर्यंत दिसून येत होता. तिथून जाणाऱ्या नागरिकांनी याची माहिती अग्निशमन विभागाला दिली. माहिती मिळतात अग्निशमन विभागाचे टीम घटनास्थळी पोहोचली आणि ३ वाहनानी पाणी मारून आग विझवली.ही आग जर वेळेवर विजवली नसती तर फार मोठा अनर्थ घडला असता.या प्रकरणात पोलिसांनी आकस्मिक घटनेची नोंद केली असून आगीच्या कारणांचा शोध घेतल्या जात आहे.

## ग्रामीण डाक सेवकांचे धरणे आंदोलन

### काळी पट्टी बांधून व्यक्त केला निषेध

**अमरावती -** ऑल इंडिया ग्रामीण डाक सेवक युनियन द्वारा आपल्या प्रलंबित मांगण्यासाठी आज बुधवार १५ ऑक्टोंबर रोजी विभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. ऑल इंडिया ग्रामीण डाक सेवक संघटनचे नवी दिल्ली येथील जनरल सेक्युरिटी महादेवय्या यांनी मागील काळा मध्ये संपाचे नेतृत्व केल्यामुळे त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. तरी त्यांना पूर्ववत कामात घेण्यात यावे. या प्रमुख मागणीसाठी हे धरणे आंदोलन करण्यात येत आहे.

या संदर्भात संचार राज्यमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना निवेदन सादर करण्यात आले. तरीपण मागणी पूर्ण नाही झाली तर गुरुवारी खासदारांना निवेदन देण्यात येणार आहे. २२ ऑक्टोबर रोजी सर्कल ऑफिस समोर धरणे व हंगर फास्ट करण्यात येणार. ७ नोव्हेंबर रोजी जंतर-मंतर वर आंदोलन होणार आणि नवंबर डिसेंबर मध्ये एक दिवसीय देशव्यापी संप पुकारण्यात येणार आहे. तरीही मागणी पूर्ण नाही झाली तर डिसेंबर पासून बेमुदत संप करण्याचा इशारा देण्यात आला आहे. धरणे आंदोलन करणाऱ्यांमध्ये विभागीय सचिव वी.ए.रिठे, एन.टी.खाडे, अमोल राऊत, तौसीफउद्दीन वहीउद्दीन, राजू कोहरे, भास्कर गायकी, प्रकाश टेंमधरे, मानसिंग कुटे माटे, एल एस पांडे, एन डब्ल्यू उमाळ, अरुण उगले, गजानन साठवण सहा इतरांचा सहभाग होता.

# व्यावसायिकाची ४० लाखांची फसवणूक

### -माहुली जहांगीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती -** व्यावसायिक भागीदारीवर विश्वास ठेवणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले. डवरगाव येथील रतन इंडिया परिसरात वाहतूक व्यवसाय करणाऱ्या तरुणाला त्याच्या भागीदाराने तब्बल ४० लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी माहुली जहांगीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मध्य प्रदेशातील नर्मदापुरम जिल्ह्यातील सिवनी मालवा, बिजामणी येथील दीपेश रघुवंशी (वय २७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी १ फेब्रुवारी २०२४ रोजी दर्शन द्वारकादास राठी (वय ५२, सेव्हन रॉयल पार्क, सुरत) यांच्यासोबत वाहतूक व्यवसाय सुरू केला होता. हा व्यवसाय १ फेब्रुवारी ते जून २०२४ या कालावधीत सुरू होता. व्यवसाय पूर्ण झाल्यानंतर दीपेश यांनी आपल्या वाट्याचा परतावा मागितला असता, आरोपी दर्शन राठी यांनी १६ लाखांचा धनादेश दिला. मात्र, तो धनादेश बँकेत सादर केल्यावर अपुरा निधी असल्याने बाऊन्स झाला. त्यानंतर उर्वरित ४० लाख परत देण्यास दर्शन राठी यांनी टाळाटाळ सुरू केली. अनेक वेळा संपर्क साधूनही दर्शन राठी यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने अखेर दीपेश रघुवंशी यांनी माहुली जहांगीर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी दर्शन राठी यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### मद्यधुंद पोलिसाच्या मोटारीने

या कारनामामुळे या अपघातात बावीस वर्षीय अभिषेक पवार गंभीर जखमी झाला आहे. त्याच्या डाव्या पायला दोन ठिकाणी फ्रॅक्चर झाला आहे. त्यासोबत त्याच्या छातीला आणि पोटाला गंभीर जखम्या झाल्या आहेत. पुण्यातील खाजगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु आहे. हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप अभिषेकच्या आई आणि नातेवाईकांनी केला आहे. दरम्यान पोलिसांना घटनास्थळी पोलीस कॉनस्टेबल हेमंत इनामेचा फोन सापडला होता. पण त्यावेळी इमानेचा बायकोने जखमींचा उपचारांचा खर्च देण्याचे आश्वासन देऊन फोन ताब्यात घेतला. पण त्यानंतर त्यांनी उपचारांचा खर्च देण्यास नकार दिल्यामुळे हे प्रकरण चिघळलं आहे.

### नक्षलवादाच्या इतिहासातील सर्वांत

सोलापूरला जाणार आहेत.

अशातच, काही दिवसांपूर्वी गडचिरोली डिव्हिजन ने एकत्रितरीत्या पत्रक काढत सोनू उर्फ भूपतीच्या भूमिकेला पाठिंबा दिला होता. त्यानंतर उत्तर बस्तर आणि माड डिव्हिजन मधील काही नक्षल कमांडर स्नेही तशाच पद्धतीचे पत्रक काढले होते. त्या,.मुळे सोनू उर्फ भूपती लवकरच शरणागती पत्करेल, अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र तो प्रामुख्याने छत्तीसगड किंवा तेलंगणामध्ये शरणागती पत्करेल, अशी स्थिती असताना महाराष्ट्र पोलिसांनी बाजी मारली आणि सोनू उर्फ भूपतीचा शस्त्र खाली ठेवून शरणागती पत्करण्या संदर्भात मन वळवण्यात यश मिळवलंय.

### भीषण संघर्षानंतर पाकिस्तानची

आलेल्या या युद्धविरामाचा उद्देश सीमेवर उफाळलेल्या संघर्षानंतर निर्माण झालेली कटुता कमी करणे आणि चर्चेचा मार्ग खुला करणे हा आहे.पाकिस्तान आणि अफगाणिस्तान हे दोन्ही देश या गुंतागुंतीच्या पण तोडगा काढण्यासारख्या मुद्द्यांवर मार्ग शोधण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करतील.

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीला

आपला राजीनामा पाठवला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून हे दोन्ही नेते आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करत टायमिंग साधणार असल्याचे समजते. शरद पवार यांचे खंदे समर्थक आणि राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी आज शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. त्याचबरोबर पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा सुद्धा राजीनामा दिला आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे हा राजीनामा सुपूर्द केला. गेल्या नऊ वर्षांपासून दिलीप चव्हाण हे राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष आहेत. परंतु, आता अचानक स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी राजीनामा दिला असून लवकरच ते अजित पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.

अहिल्यानगर येथील शरद पवारांच्या राष्ट्रावादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनीही पदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या सात वर्षांपासून ते अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष राहिले आहेत, कौटुंबिक कारणास्तव आपण राजीनामा देत असल्याचा उल्लेख पत्रात आहे. तसेच, फाळके यांच्याकडून नवीन चेहऱ्याला संधी देण्याची मागणीही करण्यात आली आहे. त्यामुळे, त्यांनी केवळ जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून ते सध्यातरी शरद पवारांच्याच राष्ट्रवादीत आहेत. राजेंद्र फाळके हे शरद पवारांचे कट्टर समर्थक असून त्यांचे मूळ गाव आमदार रोहित पवार यांच्या मतदारसंघातील कर्जत हे आहे.

### एसटी बँकेच्या बैठकीत तुफान

एकेकाळी महाराष्ट्राच्या सहकारी बँकिंग नेटवर्कमधील एक मोठी संस्था मानली जाणारी एसटी सहकारी बँक, आता अंतर्गत संघर्ष आणि व्यवस्थापनाच्या वादांमुळे गंभीर चौकशीला सामोरे जात आहे. या हाणामारीच्या व्हिडिओमुळे संस्थेच्या सार्वजनिक प्रतिमेला मोठे नुकसान झाले आहे.

### 'बँक ऑफ महाराष्ट्र'सह भारतातील

चर्चा कशी होईल? या प्रस्तावावर प्रथम वरिष्ठ कॅबिनेट अधिकाऱ्यांकडून चर्चा केली जाईल. यानंतर पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) त्याचा आढावा घेईल. सरकार कोणतीही औपचारिक घोषणा करण्यापूर्वी अंतर्गत सहमती निर्माण करू इच्छिते, असे सूत्रांनी सांगितले.

### झोन निहाय स्वच्छता कंत्राटला मिळाला

नव्याने टेंडर प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले होते. आता पुन्हा हायकोर्टाने आपला निर्णय फिरवला असून झोन निहाय स्वच्छता कंत्राटला स्थगनादेश दिला आहे.मनपाने नव्याने टेंडर प्रक्रिया सुरू केली आणि घरो घरी जाऊन कचरा संकलन करावे असा त्यात नियम टाकला होता. त्यामुळे नागरी सहकारी संस्थांने या इंटर प्रक्रियावर शंका व्यक्त करत हायकोर्टात दरवाजा ठोकला होता. न्यायमूर्ती किलोर व न्यायमूर्ती व्यास यांनी हा निर्णय देऊन झोंन निहाय कंत्राटदारांना दिलासा दिला आहे.एड. भांगडे यांनी या प्रकरणात युक्तिवाद केला.

### खोलापूर येथे चायना मांज्याने

लटकलेल्या चायना मांजा त्यांच्या गळयात फसला आणि त्यांचा गळा कापला गेला यामुळे ते खाली पडले. कुटुंबीयांनी त्यांना तात्काळ वलगाव येथील बेस हॉस्पिटलमध्ये दाखल केले. आय सीयु मध्ये त्यांच्यावर उपचार सुरू आहे. त्यांच्या गळयावर ३६ टाके लागलेले आहे. या घटनेनंतर एकदा पुन्हा चायना माज्यांवर प्रतिबंध लावण्याची मागणी केली जात आहे. चायना माज्यांमुळे आतापर्यंत अनेक अपघात घडले ,तरी पण या मांज्याची विक्री होत असल्याने नागरिकांचा आरोग्य धोक्यावर दिसत आहे.

# तरुणाला ऑनलाईन फसवणुकीत १.९० लाखांचा फटका

## इंस्टाग्रामवरील 'ऑफर' ठरली सापळा

**अमरावती -** गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रवीण नगर येथील २२ वर्षीय तरुणाला २५ हजार रुपयांचा आयफोन मिळण्याच्या आमिषाने तब्बल १ लाख ९० हजार ६० रुपयांचा फटका बसला आहे. या प्रकरणी आतिफ खान आरिफ खान (वय २२) यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली असून, पोलिसांनी अज्ञात मोबाईलधारकाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांपासून ते ऑनलाईन प्लॅटफॉर्मपर्यंत 'धमाका ऑफर्स'ची लगबग सुरू आहे. कपडे, इलेक्ट्रॉनिक्स, दागिने, मोबाईल आणि भेटवस्तूंवरील सवलती ग्राहकांना आकर्षित करत आहेत. परंतु, या ऑफर्सच्या नावाखाली सायबर गुन्हेगार सक्रिय झाले असून, निष्पाप ग्राहकांना जाळ्यात ओढत आहेत. पोलिस विभागाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत ऑनलाईन फसवणूक टाळण्याचे आवाहन केले आहे. १४ ऑक्टोबर रोजी दुपारी इंस्टाग्राम ब्राउझ करत असताना आतिफ खान यांना 'आयफोन' नावाचे एक पेज दिसले. त्या पेजवर 'आयफोन १५ केवळ २५,००० मध्ये उपलब्ध' अशी पोस्ट पाहून त्यांनी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधला. आरोपीने मोबाईल बुकिंगसाठी ५०० पाठवण्यास सांगितले. त्यानंतर काही दिवसांनी 'अमेझॉन शॉप'च्या नावाने फोन आला आणि मोबाईलसाठी ६,८०३ आकारले जातील, असे सांगण्यात आले. आतिफ यांनी दिलेल्या क्यूआर कोडद्वारे पैसे भरले. पुढील काही दिवसांत विविध माध्यमांतून त्यांनी एकूण १,९०,०६० रुपये जमा केले. तरीदेखील त्यांना मोबाईल न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

सोशल मीडियावर कोणत्याही संशयास्पद लिंक्स उघडू नका. अशा लिंक्समुळे सायबर गुन्हेगारांना तुमच्या मोबाईलमध्ये प्रवेश मिळतो. दिवाळीच्या काळात अशा घटना वाढतात, त्यामुळे सतर्कता बाळगणे अत्यंत आवश्यक आहे.

**-अनिकेत कासार, एपीआय, सायबर विभाग**

# कर्ज फेडण्याच्या बहाण्याने ७० हजारांची ऑनलाइन फसवणूक!

**अमरावती -** ऑनलाइन व्यवहारांच्या वाढत्या वापराबरोबरच सायबर फसवणुकीच्या घटनाही दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. अशीच एक घटना अमरावतीत घडली असून, कर्ज फेडण्यासाठी कस्टमर केअरशी संपर्क साधलेल्या तरुणाला तब्बल ७० हजार रुपयांचा फटका बसला आहे. गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अर्जुन नगर येथील निखिल गोपाळराव माहुलकर (वय ३३, मोर्शी रोड, अर्जुन नगर, अमरावती) या तरुणाने ऑनलाइन ॲपद्वारे घेतलेल्या कर्जाची रक्कम फेडण्यासाठी कस्टमर केअरशी संपर्क साधला. मात्र, त्याचाच गैरफायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्याच्याकडून ७० हजार रुपये लाटले. तक्रारीनुसार, निखिल माहुलकर यांनी 'नवी ॲप'द्वारे २ लाखांचे कर्ज घेतले होते. १५ महिन्यांचे हप्ते भरल्यानंतर त्यांना उर्वरित १ लाख ५० हजार ३४३ रुपये परत करायचे होते. त्यासाठी त्यांनी गुगलवर नवी ॲपचा कस्टमर केअर नंबर शोधून संपर्क साधला.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १६ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## दिवाळी खरेदीत सावधान!

## मालेगाव पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांचे नागरिकांना आवाहन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

***दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने मालेगाव शहरातील बाजारपेठा, चौक आणि गल्ली-बोळांत खरेदीची लगबग सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर मालेगाव पोलीस स्टेशनचे निरीक्षक संजय चौधरी यांनी नागरिक, दुकानदार आणि वाहनचालकांना सतर्कता आणि जबाबदारीचे आवाहन केले आहे.***



पोलीस निरीक्षक चौधरी यांनी सांगितले की, सणासुदीच्या काळात बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या काळात पाकीटमार, लुटारू टोळ्या आणि संधीसाधू घटक सक्रिय होतात. त्यामुळे नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तू, मोबाईल, पर्स आणि दागिन्यांची काळजी घ्यावी. कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलीसांना माहिती द्यावी.फटाके विक्रेत्यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी परवाना असलेल्या सुरक्षित ठिकाणीच दुकाने लावावीत. फटाक्यांच्या दुकानाजवळ बीडी, सिगारेट, अगरबत्ती यांचा वापर टाळावा, कारण अशा निष्काळजीपणामुळे आगीचा धोका संभवतो.

तसेच शहरातील दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत ठेवून त्यांची नियमित तपासणी करावी. हे कॅमेरे चोरी, पाकीटमारी किंवा गर्दीतील गोंधळ नियंत्रणात ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतात, असे निरीक्षक चौधरी यांनी सांगितले.

वाहनचालकांना आवाहन करण्यात आले आहे की, गर्दीच्या रस्त्यांवर जड वाहने व चारचाकी वाहने आणू नयेत. टू-व्हीलर चालकांनी वाहन उभे करताना इतरांना अडथळा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. रस्त्याच्या मध्यभागी किंवा बाजार परिसरात गाडे व स्टॉल लावणे टाळावे, अन्यथा वाहतूक कोंडी व अपघाताचा धोका संभवतो. दिवाळी सणादरम्यान कायदा-सुव्यवस्था आणि अग्निसुरक्षेसाठी विशेष पोलीस पथके नियुक्त करण्यात आली असून, शहरातील प्रमुख चौकांमध्ये गस्त वाढविण्यात आली आहे. 'दिवाळी उत्साहात साजरी करा; परंतु सुरक्षितता, शिस्त आणि सावधगिरी हीच खरी उजळणी आहे,' असे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांनी आवाहन केले.

## दिवाळी तोंडावर, शहरात नालेसफाई व बंद लाईट दुरुस्तीची मागणी !

### अजय घुगे यांचे नगरपंचायतीला निवेदन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर आला असताना शहरातील नालेसफाईचे काम अद्याप सुरू झालेले नाही, तसेच अनेक ठिकाणी पोलवरील विद्युत दिवे बंद आहेत या दोन्ही महत्त्वाच्या तक्रारींकडे नगरपंचायतीने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता अजय उत्तमराव घुगे यांनी सादर केलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

शहरातील विविध भागांमध्ये नाल्यांमध्ये साचलेला कचरा, दुर्गंधी व डासांचा त्रास वाढला आहे नागरिकांना या समस्येमुळे आरोग्याचा धोका निर्माण होत आहे त्याचबरोबर अनेक ठिकाणी रस्त्यांवरील पोलवरील लाईट बंद असल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य पसरते आणि अपघाताचा धोका वाढतो दिवाळीच्या सणासुदीच्या काळात नागरिकांना



स्वच्छ, प्रकाशमान आणि सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी नगरपंचायतीने सर्व नाले तातडीने स्वच्छ करून घ्यावेत आणि बंद पडलेले पोलवरील लाईट बदलून कार्यरत करावेत, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे अजय उत्तमराव घुगे यांनी नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांनी स्वतः सर्व प्रभागांची पाहणी करून योग्य ती कारवाई करावी, असे आवाहनही केले आहे.

## प्रा. प्रवीण व्यवहारे यांना राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार २०२५ प्राप्त



■ प्रतिनिधी | कारंजा ■

माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम सरांच्या ९४ व्या जयंती निमित्त कोचिंग क्लासेस असोसिएशन (सीसीए) चे सहावे राज्यस्तरीय अधिवेशन सोलापुरात उत्साहात पार पडले.रविवारी दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ सकाळी ११ वाजता सोलापूर येथील व्हीव्हीपी कॉलेज सभागृहात झालेल्या या अधिवेशनाचे उद्घाटन संस्थापक डॉ. जी. के. देशमुख, भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, डॉ. निरणकुमार शहा, गिरीश तिवारी, राज्याध्यक्ष डॉ. पी. एम. वाघ, राज्य सरचिटणीस प्रा. ज्ञानेश्वर ढाकणे, राज्य उपाध्यक्ष पंकजकुमार बांडे, उमेश बोरसे, प्रा. आप्पासाहेब मस्के, प्रा. गोविंद जाधव, प्रा. पंकज नाले, जिल्हाध्यक्ष काशीनाथ भतगुणकी आदी मान्यवर उपस्थित होते. यात प्रा. संदीप मस्के, प्रा. पंकजकुमार बांडे, प्रा. उमेश बोरसे (पुणे), प्रा. गोविंद जाधव (बीड), प्रा. कारभारी सपाटे (जालना), प्रा. गिरीश मराठे (नंदुरबार), प्रा. बाळकृष्ण जाधव (हिंगोली), प्रा. भागवत तोर (जालना) आदींनीं याप्रसंगी आपले विचार मांडले. अधिवेशनात ब्रिलियंट ट्युटोरियल्स कारंजा (लाड) जि. वाशिम चे संचालक प्रा. प्रवीण रामेश्वर व्यवहारे सर यांना कोचिंग क्लास असोसिएशन व ड्रीम फाउंडेशन धँए सेंटर तर्फे 'राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार -२०२५' देऊन गौरव करण्यात आला. संयोजक प्रा. काशिनाथ भतगुणकी यांन प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. राजे इपर यांनी केले. आभार प्रा. रामेश्व जंगले यांनी मानले.

## आ. सई डहाके यांच्या हस्ते उद्‌घघाटन



**कारंजा :** नगर पालिका हद्दीतील, दिव्यांगांच्या सर्वार्थाने कल्याणाकरीता आणि त्यांच्या समस्या सोडवून त्यांना योग्य मार्गदर्शन देण्याच्या उद्देशाने, मा.महेशजी वाघमोडे मुख्याधिकारी नगर परिषद कारंजा यांच्या मार्गदर्शनात दिव्यांग कल्याण केंद्राचे उद्धघाटन येत्या शुक्रवार दि.१७ ऑक्टोंबर २०२५ रोजी संपन्न होणार आहे, सदरहू कार्यक्रम कारंजा येथील, जाणता राजा चौक, छत्रपती शिवाजी महाराज नगर कारंजा येथे होऊ घातला आहे, नगर पालिकेच्या दिव्यांग विभागाचे स्वतंत्र कार्यालय 'दिव्यांग कल्याण केन्द्र' सुरु करण्यात येणार असून सदरहू कार्यालयाचा उद्‌घघाटन समारंभ यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

## कृषीच्या विद्यार्थ्यांचे आत्मनिर्भरतेकडे मार्गक्रमण!



### - विद्यार्थ्यांकडून 'फार्म टू फूड' उपक्रम - केळी वेफर आणि टोमॅटो केचप निर्मितीने शेतकऱ्यांचे लक्ष वेधले!

■ प्रतिनिधी | अकोला ■

कृषी महाविद्यालय, अकोला येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अकोला जिल्ह्यातील वणी रंभापूर गावात विद्यार्थ्यांकडून 'फार्म टू फूड' या संकल्पनेवर आधारित प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले.

या प्रात्यक्षिकाचा उद्देश शेतकऱ्यांना शेतीतील उत्पादनांना मूल्यवर्धन करून अधिक उत्पन्न मिळविण्याचे मार्ग दाखवणे हा होता. विद्यार्थ्यांनी केळीपासून वेफर आणि टोमॅटोपासून केचप तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष सादर केली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ प्रक्रिया उद्योगाचे महत्त्व स्पष्ट केले नाही, तर ग्रामीण महिलांना लघुउद्योगातून स्वावलंबनाचे नवे दालनही दाखवले. ग्रामीण भागातील शेती उत्पादने साठवून त्यांचे मूल्यवर्धन कसे करता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण या प्रात्यक्षिकातून पाहायला मिळाले.या उपक्रमाचे मार्गदर्शन कृषी महाविद्यालय अकोला चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर, उद्यानविद्या विभाग शाखा प्रमुख डॉ. सुधीर दलाल, ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रम अधिकारी ,प्रा. डॉ. अतुल वराडे यांनी केले. या उपक्रमात कृषी महाविद्यालय अकोलाच्या समीर जांबोर, सौम्य गायकवाड, कोमारी बालाकृष्ण, अश्विनी कुमार, प्रतिक झोडे, इंद्रकुमार गिरि, प्रणव देशमुख आदी विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कार्यक्रमात उपस्थित शेतकरी व महिलांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत, अशा प्रकारच्या प्रशिक्षणांमुळे ग्रामीण भागातील युवक व महिलांना स्वावलंबनाचा मार्ग मिळेल, असे मत व्यक्त केले.

## उमेद अभियान अंतर्गत 'उमेद मार्ट' केंद्राला महिलाची गदी




■ प्रतिनिधी | मालेगाव ■

जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत, व्यवस्थापन कक्ष अभियानातील समूहाने बनवलेल्या खाद्य वस्तू व पदार्थांच्या वस्तू विक्री 'उमेद मार्ट' केंद्राला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत असून शेकडो महिलांनी केंद्राला भेट देऊन वस्तू खरेदी केल्या आहेत.

येथील पोलिस स्टेशन समोर, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा वाशिम अंतर्गत अभियानातील बचत गट समूहाने बनवलेल्या अनेक खाद्य वस्तूचा 'उमेद मार्ट 'विक्री स्टॉल लावण्यात आला आहे. दिवाळीच्या सणानिमित्त उमेद अभियान अंतर्गत बचत गटाच्या महिलांनी शेव, चिवडा ,पापड्या , लाडू, बेसनाचे लाडू, चकल्या, पेढे, गोडंबी, शुद्ध हळद, घरगुती मसाले, शेंगदाण्याचे लाडू , चटणी असे अनेक प्रकारचे घरगुती चवीष्ट पदार्थ माफक दरात विक्री साठी उपलब्ध करून दिले आहे.बचत गटाच्या माध्यमातून बनविलेल्या दिवाळी साठी फराळाच्या अत्यावश्यक वस्तूला केंद्राला अनेक लोक महिला भगिनी भेट देऊन वस्तू खरेदी करीत आहेत.हे अभियान २० ऑक्टोबर पर्यंत याच ठिकाणी राहणार आहे.तेव्हा बचत गट समूहाने बनवलेल्या शुद्ध ,व दर्जेदार आणि चविष्ट वस्तू विक्री केंद्राला भेट देऊन समुह बचत गटाला सहकार्य करण्याचे आवाहन विनोद प्रकाश कराळे पंचायत समिती मालेगाव यांनी व बचत गटाच्या महिलांनी केले आहे.

## स्टेट बँक ऑफ इंडियाकडून संरक्षण वेतन पॅकेज अंतर्गत १ कोटी रुपयांचा विमा दावा निकाली



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

स्टेट बँक ऑफ इंडियाने (SBI) आपल्या 'संरक्षण वेतन पॅकेज' (Defence Salary Package - DSP) योजनेअंतर्गत एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत दिवंगत संरक्षण कर्मचारी वासुदेव संभाजी शेळके यांच्या कुटुंबाला मोठा आधार दिला आहे. एसबीआयने वासुदेव शेळके यांच्या पत्नी व नामनिर्देशित लाभार्थी सौ. गोकुळा वासुदेव शेळके यांच्या नावे असलेल्या रु. १ कोटींच्या विमा दाव्याचे अत्यंत तत्परतेने आणि यशस्वीरित्या निराकरण केले आहे.

वासुदेव संभाजी शेळके यांचे एसबीआयमध्ये संरक्षण वेतन पॅकेज (डीएसपी) अंतर्गत वेतन खाते चालू होते. दुर्दैवाने, दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या एका अपघातात त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर नामनिर्देशित पत्नी सौ. गोकुळा शेलके यांनी संरक्षण वेतन पॅकेज अंतर्गत मिळणाऱ्या विमा लाभासाठी दावा सादर केला होता.

बँकेने सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी अत्यंत वेगाने पूर्ण केली आणि विमा कंपनीमार्फत रु. १ कोटींची रक्कम सौ. गोकुळा शेलके यांच्या खात्यात तातडीने जमा करण्यात आली. एसबीआयने दाखवलेली ही तत्परता त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे आणि जबाबदारीपूर्ण दृष्टिकोनाचे उत्तम उदाहरण आहे.

या संदर्भात एसबीआय शेलू बाजार शाखेचे व्यवस्थापक मयूर तेलगोटे म्हणाले की, 'संरक्षण दलातील कर्मचारी राष्ट्रासाठी आपले जीवन समर्पित करतात. त्यांच्या कुटुंबियांना कठीण काळात वेळेवर आणि मजबूत आर्थिक आधार देणे ही आमची नैतिक जबाबदारी आहे. एसबीआय नेहमीच अशा कुटुंबांसोबत ठामपणे उभी राहते.' संरक्षण दलातील जवानांच्या सेवेला सन्मान देत, त्यांच्या कुटुंबीयांना वेळेत आर्थिक मदत पोहोचवणे ही बँकेची प्रमुख जबाबदारी आहे. एसबीआयने केलेले हे तत्पर विमा दावा निकालीकरण बँकेच्या संरक्षण दलाबद्दलच्या आदरभावाचे आणि सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे.

## वाशीम बाजार समितीमध्ये होणार दोन कोटीचे नवीन शेतकरी भवन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शासनाच्या ' राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन ' या योजने अंतर्गत वाशीम कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दोन कोटी रूपयाचे नवीन, अत्याधुनिक शेतकरी भवन होणार आहे.नवीन शेतकरी भवनाला मंजूरी व आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी वाशीम मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे यांनी पुढाकार घेतल्याची माहिती बाजार समितीचे संचालक नत्थुजी कापसे यांनी दिली.

शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रौद्योग विभागाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी शासन निर्णय क्रमांक कृबास ०१२५/ प्र.क्र.२८६/ २१ञ्स अन्वये कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशीम येथे नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन या योजने अंतर्गत वाशीम बाजार समितीमध्ये होणाऱ्या नवीन शेतकरी भवनाचे अंदाजपत्रक दोन कोटी सात लाख सव्वीस हजार



### आमदार श्याम खोडे यांचा पुढाकार

सातशे पंच्याऐंशी रूपये एवढे असून या कामाची शासनाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

या नवीन शेतकरी भवनामध्ये शेतकऱ्यांना मुक्कामाची सोय होणार असून शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा पण याच भवनामध्ये उपलब्ध होणार आहेत. वाशीम बाजार समितीमध्ये दररोज वाशीम, बुलढाणा, हिंगोली, नांदेड, यवतमाळ या जिल्ह्यातील शेकडो शेतकरी शेतमाल विक्रीसाठी येतात.

## दिवाळी महोत्सव : उमेद अभियानांतर्गत बचत गटांच्या वस्तु विक्री व प्रदर्शनीचे उद्‌घाटन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांचे हस्ते आज (बुधवार दि. १५) उमेद अभियानाच्या वस्तू विक्री व प्रदर्शनीचे उद्‌घाटन करण्यात आले.

महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उमेद अभियानात कार्यरत बचत गटातील महिलांनी स्व उत्पादित केलेल्या वस्तूंचे विक्री व प्रदर्शन येथील जिल्हा क्रीडा मैदानात सुरू करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रदर्शनीच्या उद्‌घाटनानंतर उपस्थित महिलांशी संवाद साधला. महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची पाहणी केली तसेच काही वस्तूंची खरेदी सुद्धा केली. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक तथा जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे,



> 'दिवाळीच्या मुहूर्तावर जिल्हा क्रीडा मैदान येथे उमेद अभियानांतर्गत निवडक बचत गटांच्या वस्तूंच्या विक्री व प्रदर्शनी करिता स्टॉल लावले आहे. जिल्ह्यातील अधिकारी- कर्मचारी व नागरिकांनी सदर स्टॉलला भेट देऊन दिवाळीनिमित्त खाद्यपदार्थ, दिव्यांची व इतर शोभेच्या वस्तूंची खरेदी करावी आणि बचत गटातील महिलांना प्रोत्साहन द्यावे.'
>
> **- अर्पित चौहान,**
> मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम

सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कालिदास तापी, कृषी अधिकारी अभिजीत देवगिरकर, उमेद अभियानाचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे, विस्तार अधिकारी सचिन गटलेवार आदींची उपस्थिती होती.

पुढील एक आठवडाभर ही प्रदर्शनी सुरू राहणार असल्याची माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे कडून देण्यात आली आहे.

## वाशीमचे मिलिंद सावदेकर यांना 'पक्षी जनजागृती पुरस्कार' जाहीर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

पक्षी संवर्धन आणि जनजागृती क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे वाशीम येथील मिलिंद सावदेकर यांना यावर्षीचा स्व. रामभाऊ शिरोडे (वाणी) स्मृती पक्षिमित्र पक्षी जनजागृती पुरस्कार जाहीर झाला आहे.

हा प्रतिष्ठित पुरस्कार 'महाराष्ट्र पक्षिमित्र' या राज्यव्यापी संस्थेमार्फत दरवर्षी देण्यात येतो. यंदा जाहीर करण्यात आलेल्या २०२५ च्या पुरस्कारांमध्ये सावदेकर यांचा समावेश असून, त्यांनी पक्ष्यांच्या अभ्यास, नोंदणी, सर्वेक्षण आणि जनजागृती या क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल घेण्यात आली आहे. रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून, हा पुरस्कार अविनाश शिरोडे, नाशिक यांचे तर्फे प्रायोजित आहे. या पुरस्काराचे वितरण ३ रे अखिल भारतीय व ३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात १ व २ नोव्हेंबर २०२५ रोजी अमरावती येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.या गौरवाबद्दल वाशीममधील पर्यावरणप्रेमी आणि पक्षिमित्रांनी मिलिंद सावदेकर यांचे अभिनंदन केले आहे.

## नकुल देशमुखानी २ लक्ष रुपयाचा धनादेश मुख्यमंत्री यांच्याकडे केला सुपूर्द

### - जन्मदिवस साजरा न करण्याची केले होते आवाहन - स्नेहजणांकडून उत्तम प्रतिसाद - मुख्यमंत्र्यांकडून कौतुक आणि शुभेच्छा

■ प्रतिनिधी | रिसोड ■

भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल देशमुख यांनी मुख्यमंत्री सहायता निधीत २ लक्ष रुपयांचा धनादेश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

महाराष्ट्रातील अतिवृष्टी आणि ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेतकरी बांधव हा अतिशय अडचणीत सापडला असून राज्यातील देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकार शेतकऱ्यांच्या ठामपणे पाठीशी उभे आहे याच अनुषंगाने भाजपचे नेते नकुल देशमुख यांनी त्यांचा ९ ऑक्टोबर रोजी होणारा वाढदिवस टाळत त्याच्या सर्व स्नेहीजनांना मित्र परिवारास आणि कार्यकर्त्यांना जन्मदिवस





साजरा न करता त्यावर होणारा खर्च शेतकरी बांधवांप्रती बांधवांसाठी सामाजिक बांधिलकी जपत मुख्यमंत्री सहायता निधी देण्याचे आवाहन केले होते. नकुल देशमुख यांनी मित्रपरिवार, स्नेही, हितचिंतक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना केलेल्या आवहानास प्रतिसाद दिला. अमरावती येथे २ लाख रुपये इतकी मदत 'मुख्यमंत्री सहायता निधी' करिता मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कडे नकुल देशमुख यांनी सुपूर्द केली. यावेळी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब, भाजप रप्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण साहेब, माजी मंत्री माजी खासदार अनंतरावजी देशमुख साहेब, भाजपा महाराष्ट्र सरचिटणीस मा.रणधीरजी सावरकर साहेब, खासदार अनुपजी धोत्रे, सोबत भाजपा जिल्हा महामंत्री गजाननराव लाटे, रिसोड ग्रामीणचे अध्यक्ष सुभाषराव खरात, गोवर्धन मंडळाचे अध्यक्ष अमोल पाटील भुतेकर, रिसोडच्या नगराध्यक्ष विजयमाला आसनकर, कृष्णा आसनकर, पंचायत समिती सदस्य भूषण पाटील, पंचायत समिती सदस्य संदीप धांडे सहित मान्यवर मंडळी उपस्थित होती.

**नकुल देशमुख यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून कौतुक आणि शुभेच्छा :**

शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलता जपत वाढदिवस साजरा न करता मित्र परिवाराला आव्हान करून व्यर्थ खर्च टाळत तो खर्च मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये देण्याचे आवहान करत २ लक्ष रुपये निधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल देशमुख यांचे या उपक्रमाबद्दल कौतुक केले. तसेच त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देखील दिल्या.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३१७ ■ गुरुवार, १६ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# माओवाद पर्वाच्या समाप्तीची सुरुवातः मुख्यमंत्री

## -भूपतीसह ६१ माओवाद्यांचे सशस्त्र आत्मसमर्पण

### गडचिरोली पोलिसांना १ कोटींचे बक्षीस



**गडचिरोली जनमाध्यम :** महाराष्ट्राच्या इतिहासातील एक ऐतिहासिक टप्पा गडचिरोलीत साकारला. राज्य आणि केंद्र सरकारच्या संयुक्त प्रयत्नांतून माओवादी केंद्रीय समितीचा सर्वोच्च नेता भूपती ऊर्फ मल्लोजुल्ला वेणूगोपालराव याच्यासह ६१ जहाल माओवादी सदस्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शस्त्रांसकट आत्मसमर्पण केले. या आत्मसमर्पण कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत माओवाद्यांनी ५४ अग्निशस्त्र आणि माओवादी गणवेशांसह शरणागती पत्करली. संविधानाची प्रत देऊन त्यांच्या लोकशाही प्रवाहात स्वागत करण्यात आले. या प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली पोलिस दलाचे कौतुक करत १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले, तसेच आत्मसमर्पित माओवादी सदस्यांच्या पुनर्वसनासाठी ३ कोटी ०१ लाख ५५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असल्याचो सांगितले.मुख्यमंत्री म्हणाले, 'आजचा दिवस माओवाद संपवण्याच्या प्रवासातील निर्णायक आहे. गडचिरोली या लढ्याचे नेतृत्व करत असल्याचा महाराष्ट्राला अभिमान आहे. येत्या काळात माओवाद १०० टक्के संपेल, हा आमचा निर्धार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**नवीन इतिहासाची नोंद**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, चार दशकांपूर्वी ज्यांनी गडचिरोलीत माओवादी चळवळीची बीजे रोवली, तोच भूपती आज संविधानाचा स्वीकार करत मुख्य प्रवाहात दाखल झाला. ही देशाच्या इतिहासातील अत्यंत मोठी घटना आहे. उत्तर गडचिरोलीनंतर आता दक्षिण गडचिरोलीतही माओवाद संपुष्टात येत आहे, असे ते म्हणाले. फडणवीस यांनी स्पष्ट केले की, उर्वरित माओवादी कार्यकर्त्यांनी आत्मसमर्पण करून शांततेचा मार्ग स्वीकारावा, अन्यथा कायद्याला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी.

**संविधानातूनच समतेचा मार्ग**

मुख्यमंत्र्यांनी माओवादी विचारसरणीवर टीका करताना सांगितले की, समता आणि न्याय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातूनच येऊ शकतो. शस्त्र आणि हिंसेतून नव्हे. त्यांनी सांगितले की, राज्य सरकार आत्मसमर्पण केलेल्या सर्व माओवाद्यांना पुनर्वसन, रोजगार व प्रतिष्ठेचे जीवन देण्यासाठी कटिबद्ध आहे,

**केंद्र कटिबद्ध रणनीती प्रभावी**

मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या माओवाद निर्मूलनाच्या धोरणाचे कौतुक केले. २०२६ पर्यंत देशातील माओवाद पूर्णतः हद्दपार करण्याचे उद्दिष्ट घेऊन सरकार पुढे सरकत आहे, असे ते म्हणाले.

**गडचिरोलीचा विकासमार्ग**

गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिक गुंतवणुकीला मोठा वेग येत असून तो आता 'स्टील मॅग्नेट' बनणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. स्थानिक ९० टक्के नागरिकांना रोजगार देण्यावर सरकारचा भर आहे. तसेच ५ कोटी झाडे लावून पर्यावरणपूरक विकास साधण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमाला पोलिस महासंचालक रश्मि शुक्ला, संदीप पाटील, डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, एसपी निलोत्पल यांसह वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

# आंतरजातीय विवाह करणाऱ्या ७० लाभार्थ्यांच्या खात्यात ३५ लक्ष जमा

## -आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन आर्थिक सहाय्य योजना

### -प्रति जोडपे प्रत्येकी ५० हजाराचे अनुदान



**वर्धा जनमाध्यम :** आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना सामाजिक न्याय विभागाच्यावतीने राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना ५० हजार रुपयाचे अर्थसहाय्य देण्यात येते. सन २०२५-२६ वर्षात प्राप्त झालेल्या निधीमधून जिल्ह्यातील ७० लाभार्थ्यांना ३५ लाख रुपयाचे अर्थसहाय्य लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले असल्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर यांनी सांगितले.

आंतरजातीय विवाहितांना प्रोत्साहन देण्याची ही योजना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व भटक्या जमातीच्या व्यक्तीपैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती सवर्ण हिंदू, जैन, लिंगायत, बौध्द, शीख या धर्मातील असल्यास अशा आंतरजातीय विवाहितास लागू आहे. योजनेंतर्गत लाभार्थ्यांस प्रति जोडपे ५० हजार इतके अर्थसहाय्य देण्यात येते. अनुदान रक्कम वर वधु यांचे संयुक्त बँक खात्यात पीएफएमएस प्रणालीद्वारे थेट जमा करण्यात येते.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी वर आणि वधू दोघांचेही जातीचे प्रमाणपत्र, डोमेसाईल, लिव्हींग सर्टीफिकेट, विवाह नोंदणी दाखला, आधारकार्ड आणि संयुक्त बँक खात्याचे पासबूक जिल्हा समाज कल्याण कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे, असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

# सावरखेडा परिसरात वाघाचा धुमाकूळमुरा जातीचं वासरू ठार



**समुद्रपूर जनमाध्यम :** समुद्रपूर तालुक्यातील सावरखेडा गावाजवळील वनक्षेत्रात पुन्हा एकदा वाघाचा धुमाकूळ सुरू झाला आहे. बुधवारी सकाळी वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याच्या मुरा जातीच्या वासराचा बळी गेल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी चंद्रशेखर किसनाजी थूटे यांच्या गोठ्याबाहेर तीन वर्षाचं वासरू बांधलेलं असताना वाघानं अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात वासरू जागीच ठार झालं. सकाळी गावकऱ्यांना घटनेची माहिती होताच मोठी गर्दी झाली.घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकानं घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. परिसरात वाघाचे पायाचे ठसे आढळल्याने हा हल्ला एका मोठ्या नर वाघाने केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, या घटनेनंतर सावरखेडा परिसरात भीतीचं सावट पसरलं असून शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांचे संरक्षण करण्याचं आवाहन वन विभागानं केलं आहे. नुकत्याच टपरी, बोरगाव आणि सावरखेडा परिसरात झालेल्या वाघाच्या हालचालींमुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे.

# मेफेड्रॉन तस्करांना हिंगणघाट पोलिसांचा सापळा स्थानिक गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई

## -तीन जण अटक, लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट जनमाध्यम:** वर्धा जिल्हा पोलिसांच्या अंमली पदार्थविरोधी विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने हिंगणघाट शहरात केलेल्या धडक कारवाईत मेफेड्रॉन (एम.डी.) तस्करांचा पर्दाफाश झाला आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन जणांना अटक करून लाखो रुपयांचा अंमली पदार्थ आणि अन्य साहित्य जप्त केले आहे. गोपनीय माहितीनुसार, दि. १४ ऑक्टोबर रोजी पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वाखाली वैष्णवी नगर, येनोरा माता मंदिर रोड परिसरात सापळा रचण्यात आला. सिल्व्हर रंगाच्या महिंद्रा ळ२५०० (क्र. श्प-४३ ॅ-९२९४) मधून अंमली पदार्थ वाहतूक करणाऱ्या तिघांना पोलिसांनी पकडले. अटक आरोपींत अक्षय विनोद डेहणे, सुजीत अशोकराव गावंडे (दोघे रा. संत कबीर वार्ड, हिंगणघाट) आणि मोहन हरिभाऊ टिचकुले (रा. शास्त्री वार्ड, हिंगणघाट) अशी नावे असून, त्यांनी हे पदार्थ निखील रामनवार व स्वप्नील शर्मा यांच्याकडून घेतल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून ८.५३ ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.), वापरलेली कार, मोबाईल फोन यासह एकूण ?१०,४२,१२० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेमार्फत सुरु आहे.ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या देखरेखीखाली पोलीस उपनिरीक्षक सलाम कुरेशी आणि त्यांच्या पथकाने केली.

# आर्वीत 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान

## -डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त सेवाकुंज व जिल्हा संघटनेचा उपक्रम

**आर्वी जनमाध्यम :** भारताचे माजी राष्ट्रपती आणि जनतेचे आदर्श प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' तसेच वृत्तपत्र विक्रेता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या भव्य कार्यक्रमाचे आयोजन सार्वजनिक ग्रामीण वाचनालय सेवाकुंज, खूपगाव (ता. आर्वी) आणि वर्धा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. जिल्हा संघटनेचे अध्यक्ष सुनील परिसे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम पार पडला. मंचावर डॉ, बंग, प्रकाश राठी, अनिल जोशी, सुनील पाटणकर, सुनील परिसे, नंदु गावंडे, बंडू मुळे, यांची उपस्थिती लाभली होती. त्यांनी वाचन संस्कृतीचा विकास, माहितीचे महत्व आणि समाज जीवनात वृत्तपत्र विक्रेत्यांचे स्थान यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने वर्धा जिल्ह्यातील जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते, महिला विक्रेते तसेच वृत्तपत्र वितरणात कार्यरत मुलांचा सन्मान करण्यात आला.

मान्यवरांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफळ व गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला वर्धा जिल्ह्यातील विविध भागांतील वृत्तपत्र विक्रेते, पत्रकार, वाचकवर्ग तसेच आर्वी शहरातील सन्माननीय व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यात आर्वी शहरातील अनेक विक्रेत्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# उद्या किसानपुत्रांची भाऊबीज, शेतकरी विधवांसाठी रेशन किट वाटप

## -उदयकाळ फाउंडेशन, ऊर्जा फाउंडेशन व महिला किसान अधिकार मंचचा उपक्रम

**वर्धा जनमाध्यम :** आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा बहिणींसाठी दिवाळीचा सण वेदनादायी ठरतो. अशा बहिणींच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी 'किसानपुत्रां'नी एक हृदयस्पर्शी पाऊल उचलले आहे. उदयकाळ फाउंडेशन पुणे, ऊर्जा एकल महिला संघटना वर्धा आणि महिला किसान अधिकार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने किसानपुत्रांची भाऊबीज या नावाने विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

१७ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता ऊर्जा फाउंडेशन कार्यालय, मुख्य स्टेट बँक समोर, मगनवाडी रोड, वर्धा येथे पंधरा शेतकरी आत्महत्याग्रस्त विधवा महिलांना रेशन किट भेट देण्यात येणार आहेत. या महिलांचा समावेश देवळी, सेलू आणि हिंगणघाट तालुक्यातील कुटुंबांमधून आहे.या उपक्रमाचे संयोजन प्रा. नूतन माळवी यांनी केले असून, महिला किसान अधिकार मंच व ऊर्जा फाउंडेशनच्या वैशाली खैरकार, वैशाली सावरकर, सुजाता थूल, पल्लवी जाधव, माधुरी सातपुतके, कविता पालथे, पंढरी नगराळे, मीना नेवारे, रामेश्वर मसराम आणि चंद्रशेखर भोंगाडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला आहे.शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर या भावनिक 'भाऊबीजे'चा उपक्रम समाजात संवेदना आणि बांधिलकीची जाणीव निर्माण करणारा ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


## कार्यालय ग्रामपंचायत, आंजी (मोठी), ता.जि.वर्धा

श्री.एच.बी.धारकर, प्रशासक — श्री.एच.एम.राठोड, ग्रामपंचायत अधिकारी

| अ. क्र. | योजनेचे नांव/कामाचे नांव | तां.मा.क्र./ वर्ष/कामाची मुदत | प्राकलन किंमत | निविदा सादर करण्याचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | निविदा प्रपत्र फी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गणेश मंदिर ते जोशी यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | तां.मा.क्र. २७८/२५-२६ | ३०००००/- | दि.१५.१०.२०२५ ते दि.२५.१०.२०२५ ५.३० वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) | दि.२७.१०.२०२५ ला शक्य झाल्यास किंवा ग्रा.पं.च्या मासिक सभेत | २०००/- | १ टक्का प्रा.कि.च्या |
| २. | विलास बुरांडे ते शशिकांत बोडमारे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | तां.मा.क्र. २८०/२५-२६ | २००००० | दि.१५.१०.२०२५ ते दि.२५.१०.२०२५ ५.३० वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) | दि.२७.१०.२०२५ ला शक्य झाल्यास किंवा ग्रा.पं.च्या मासिक सभेत | १५००/- | १ टक्का प्रा.कि.च्या |
| ३. | टिळक ते मोहन घुसे यांच्या घरापर्यंत सिमेंट नाली बांधकाम करणे | तां.मा.क्र. २७९/२५-२६ | ३००००० | दि.१५.१०.२०२५ ते दि.२५.१०.२०२५ ५.३० वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) | दि.२७.१०.२०२५ ला शक्य झाल्यास किंवा ग्रा.पं.च्या मासिक सभेत | २०००/- | १ टक्का प्रा.कि.च्या |
| ४. | शंकर पचारे ते उषा भावरकर पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | तां.मा.क्र. २८२/२५-२६ | २००००० | दि.१५.१०.२०२५ ते दि.२५.१०.२०२५ ५.३० वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) | दि.२७.१०.२०२५ ला शक्य झाल्यास किंवा ग्रा.पं.च्या मासिक सभेत | १५००/- | १ टक्का प्रा.कि.च्या |
| ५. | १) सुभाष पवार ते डेंगरे यांच्या घरापर्यंत सिमेंट नाली बांधकाम करणे, २) चोरे गुरुजी यांच्या घराजवळील व प्रविण भोयर यांच्या घराजवळील नाली व रपटे दुरुस्ती करणे | तां.मा.क्र. २७७/२५-२६ | ३००००० | दि.१५.१०.२०२५ ते दि.२५.१०.२०२५ ५.३० वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) | दि.२७.१०.२०२५ ला शक्य झाल्यास किंवा ग्रा.पं.च्या मासिक सभेत | २०००/- | १ टक्का प्रा.कि.च्या |
| ६. | १) बाळा घुमडे ते इंद्रजीत बत्रा यांच्या शेतापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे, २) धिरज रेवतकर ते टावर पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | तां.मा.क्र. २७७/२५-२६ | ३००००० | दि.१५.१०.२०२५ ते दि.२५.१०.२०२५ ५.३० वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) | दि.२७.१०.२०२५ ला शक्य झाल्यास किंवा ग्रा.पं.च्या मासिक सभेत | २०००/- | १ टक्का प्रा.कि.च्या |

वरील कामाची अटी व शर्ती व ईतर माहिती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

स्वाक्षरी/- प्रशासक, ग्रामपंचायत, आंजी (मोठी) जि.वर्धा

शिक्का

स्वाक्षरी/- ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, आंजी (मोठी) जि.वर्धा

## नगर पंचायत कार्यालय, कारंजा (घा.) जिल्हा - वर्धा (महाराष्ट्र)

ई-मेल npkaranja1234@gmail.com फॅक्स नं.०७१५६-२४५०१०

मुख्याधिकारी,
दुरध्वनी क्र.(का.)०७१५६-२४५०१०
दुरध्वनी क्र.(का.)०७१५६-२४५६४३

जा. क्र.नपका/बांध./कावि ७०७/२०२५-२६ दिनांक १५.१०.२०२५

**पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, निविदा सूचना क. /२०२५-२६**

मुख्याधिकारी, नगर पंचायत कारंजा (घा), जिल्हा वर्धा सन २०२५-२६ करीता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागा अंतर्गत खालील नमुद केलेल्या कामांसाठी दरपत्रके ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची किंमत | अनामत रक्कम | निविदा प्रपत्राची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | The Work of "Scientific Dumpsite Land Reclamation through Bio Mining, Resource Recovery and Scientific Rejects Disposal, KARANJA (GH)" | ९७६४७०० | २९२९४१ | ५००० | कामाचा आदेश मिळाल्यापासून ६ (सहा) महिने |

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशील**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रकाशित करण्याची दिनांक व वेळ | दिनांक १६.१०.२०२५ वेळ दुपारी १.०० वाजता |
| ई-निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १६.१०.२०२५ ते दिनांक २४.१०.२०२५ वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| कोरी निविदा प्रपत्र रकमेचा ऑनलाईन पेमेंटची स्कॅन कॉपी व ईतर आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १६.१०.२०२५ ते दिनांक २४.१०.२०२५ वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | दिनांक २७.१०.२०२५, दुपारी १२.०० वाजता |

**अटी व शती-**

१. निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in वेबसाईटवर निविदा सूचना पहावयास मिळेल.
२. या निविदेच्या पुढील सर्व कार्यवाही व शुध्दीपत्रके महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in वेबसाईटवर उपलब्ध राहील.
३. कंत्राटदाराने त्यांच्या नोंदणी संबंधीचे सर्व कागदपत्रे पीडीएफ स्वरुपात करणे आवश्यक आहे. कोरी निविदा फॉर्मची किंमत तसेच अनामत रक्कम स्वरुपात वेगवेगळी द्यावी लागेल.
४. कोणतेही कारण न दर्शविता एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर पंचायत कारंजा (घा.) जि.वर्धा यांनी राखून ठेवले आहेत.

मुख्याधिकारी, नगर पंचायत, कारंजा (घा.) जि.वर्धा — उपाध्यक्ष तथा सभापती जलनिःसारण व पाणी पुरवठा समिती नगर पंचायत कारंजा (घा.) — अध्यक्ष, नगर पंचायत कारंजा (घा.) जि.वर्धा

## नगर परिषद कार्यालय, वर्धा

सिव्हील लाईन, पाण्याची टाकी, जेल रोड, वर्धा-४४२००१

ई-मेल co.wardha@gmail.com Web : www.wardhamc.in

कार्यालयीन दुरध्वनी क्र.०७१५२-२४३२७८, २५०१९९

न.प.व./जा.क./वि.वि.३९६८/२०२५ दिनांक १५.१०.२०२५

**दरपत्रक सूचना**

पुरवठा धारक / कंत्राटदार यांना याद्वारे सुचित करण्यात येते की, वर्धा नगर परिषद क्षेत्रात विविध ठिकाणी कामे करण्यासाठी उपकरणे पुरविण्याबाबत. खालील तपशीलामध्ये नमुद केल्याप्रमाणे काम करण्याकरीता दरपत्रक दिनांक २०.१०.२०२५ पर्यंत नगर परिषद विद्युत विभागात सादर करावे.

| अ. क्र. | | विवरण | परिमाण | दर |
|---|---|---|---|---|
| 1 | NON-CSR | Supplying and erecting led fountain light IB high power water proof LI-FIN-MC 12 X 1 W, IP 68 Class having RGB. | Each | |
| 2. | NON-CSR | Supplying and erecting 3 core 1.5 Sq.mm waterproof copper cable. | Mtr. | |
| 3. | NON-CSR | 20 w garden light for outdoor spaces, an IP 65 or IP 54 water proof rating. | Each | |
| 4. | NON-CSR | Crane rent | lumpsum | |

**अटी व शर्ती -**

१. **महाराष्ट्र शासनाकडे नोंदणीकृत विद्युत परवाना धारक, जीएसटी प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने सादर करणे बंधनकारक राहील.**

स्वाक्षरी/- मुख्याधिकारी, नगर परिषद, वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# खड्ड्यांमुळे मृत्यू, तर कुटुंबाला ६ लाख भरपाई

## रस्त्यांवरील खड्ड्यांना अधिकारी, कंत्राटदार जबाबदार :उच्च न्यायालय

**मुंबई-**राज्यभरातील नागरी संस्था रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे व खुल्या मॅनहोल्समुळे होणाऱ्या अपघातांची दखल गांभीर्याने घेत नसल्याने मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. नागरिकांच्या मृत्यू आणि दुखापतीसाठी कंत्राटदारांसह अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरण्याची वेळ आली आहे. या समस्येचे निराकरण करण्याबाबत अधिकारी गंभीर नाहीत. जोपर्यंत अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जात नाही, तोपर्यंत परिस्थिती बदलणार नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले.

रस्ते अपघातात किंवा खुल्या मॅनहोल्समुळे एखाद्या नागरिकाचा मृत्यू झाला तर त्याच्या परिवाराला सहा लाख रुपये आणि कोणाला दुखापत झाली तर दुखापतीचे स्वरूप पाहून ५० हजार ते २.५ लाख रुपयांपर्यंत नुकसानभरपाई देण्याचे निर्देश न्या. रेवती मोहिते डेरे व न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने महापालिका, नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीए, एनएचएआय, एमएसआरडीसी, म्हाडा आणि बीपीटी यांना दिले.

खड्डे व उघड्या मॅनहोलमुळे होणारे मृत्यू आणि दुखापती ही नित्याची बाब आहे. कंत्राटदारांसह अधिकाऱ्यांना अशा मृत्यू आणि दुखापतींसाठी जबाबदार धरण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत नागरी अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जात नाही, तोपर्यंत परिस्थिती बदलणार नाही. भरपाईची रक्कम त्यांच्या खिशातून जाईल तेव्हाच त्यांना जाग येईल,' असे न्यायालयाने म्हटले.

**भरपाईची रक्कम ठरविण्यासाठी समिती**

न्यायालयाने भरपाईची रक्कम ठरविण्यासाठी समितीही स्थापन केली. महापालिका, नगर परिषद व स्थानिक पातळीवर समिती स्थापन करण्यात आली आहे.

**कोण असेल समितीत ? :** महापालिका पातळीवर महापालिका आयुक्त व जिल्हा विधि सेवा प्राधिकर (डीएलएसए)च्या सचिवांचा समावेश असेल. **नगर परिषदांच्या पातळीवर मुख्याधिकारी आणि त्या जिल्ह्याच्या डीएलएस सचिवांचा समावेश असेल.**

महापालिकांच्या अधिकारक्षेत्राबाहेर जिल्हाधिकारी आणि डीएलएसचे सचिव, एमएमआरडीए, एसआरडीसी,



पीडब्ल्यूडी, बीपीटी आणि एनएचएआयसाठी संबंधित विभागाचे प्रधान सचिव, मुख्याधिकारी किंवा अध्यक्ष व डीएलएसएच्या सचिवांची मिळून समिती बनविण्यात येईल.

## संक्षिप्त

### 'महाभारत'मधील 'कर्ण' काळाच्या पडद्याआड

**मुंबई-**प्रसिद्ध चित्रपट आणि टीव्ही अभिनेते पंकज धीर यांचे निधन झाले आहे. वयाच्या ६८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.'महाभारत'मधील 'कर्ण' काळाच्या पडद्याआड, अभिनेते पंकज धीर यांचं कर्करोगानं निधन प्रसिद्ध चित्रपट आणि टीव्ही अभिनेते पंकज धीर यांचे निधन झाले आहे. वयाच्या ६८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बी.आर. चोप्रा यांच्या 'महाभारत' मालिकेत त्यांनी कर्णाची भूमिका साकारली होती, ज्यामुळे ते घराघरात लोकप्रिय झाले होते. ते बऱ्याच काळापासून कर्करोगाशी झुंज देत होते. पंकज धीर यांचा मुलगा निकितन धीर आणि सून कृतिका सेंगर हे दोघेही कलाकार आहेत. पंकज धीर यांच्या अचानक निधनाच्या बातमीने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.पंकज धीर यांचे जवळचे मित्र आणि अभिनेते अमित बहल यांनी त्यांच्या निधनाच्या बातमीला दुजोरा दिला आहे. माहितीनुसार, पंकज धीर यांना कर्करोग झाला होता. त्यांनी यावर मात देखील केली होती, परंतु काही महिन्यांपूर्वी कर्करोग पुन्हा बळावला. पंकज धीर यांच्यावर शस्त्रक्रियादेखील झाली होती, पण कर्करोगाशी त्यांची झुंज अपयशी ठरली. पंकज धीर गेल्या काही दिवसांपासून खूपच आजारी होते, असे सांगण्यात येत आहे.पंकज धीर यांच्या करिअरबद्दल बोलायचं झाल्यास, त्यांनी अनेक चित्रपट आणि टीव्ही मालिकांमध्ये काम केले होते. लोकप्रिय मालिका 'महाभारत'मधील 'कर्ण'च्या भूमिकेमुळे त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली. त्याचबरोबर 'चंद्रकांता' या मालिकेत त्यांच्या 'शिवदत्त' या भूमिकेचीही खूप प्रशंसा झाली. 'बढो बहू', 'युग', 'द ग्रेट मराठा' आणि 'अजूनी' यांसारख्या मालिकेतही त्यांनी काम केले होते. याशिवाय, 'सोल्जर', 'तुमको ना भूल पाएंगे', 'रिश्ते', 'अंदाज', 'सड़क' आणि 'बादशाह' यांसारख्या बॉलिवूड चित्रपटांमध्येही त्यांनी भूमिका साकारल्या होत्या.



### बाबासाहेब पाटील यांनी गोंदियाच्या पालकमंत्रीपदाचा दिला राजीनामा



**गोंदिया-**राज्याचे सहकार मंत्री व अजित पवार गटाचे नेते बाबासाहेब पाटील यांनी गोंदिया जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. प्रकृती अस्वास्थामुळे राजीनामा देत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. मात्र अचानक त्यांनी राजीनामा दिल्याने राजकीय वर्तुळांत चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान त्यांच्या राजीनाम्यानंतर गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्रीपद राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.

### डॉ.अब्दुल कलाम यांना अभिवादन

**मुंबई-**भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव  सचिव मनीषा वर्मा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले अर्पण करून अभिवादन केले.यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे विशेष चौकशी अधिकारी-२, सचिव पंकज कुमार, उपसचिव हेमंत डांगे, अवर सचिव गोविंद साबणे, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे यांनीही डॉ अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



### वाचनाच्या सवयीमुळे ज्ञान समृध्दी- डॉ. कुलकर्णी

**मुंबई-**ग्रंथ हे मनुष्याचे मित्र असावेत. प्रत्येकाने सतत वाचत राहिले पाहिजे. ही वाचनाची सवय मनुष्याला ज्ञान समृद्धी मिळवून देत असल्याचे प्रतिपादन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त मंत्रालयात आयोजित ग्रंथ प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. माजी राष्ट्रपती ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनानिमित्ताने मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय यांच्यावतीने मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सचिव कुलकर्णी बोलत होते. सुरुवातीला माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमास कौशल्य विकास विभागाचे प्रधान सचिव मनीषा वर्मा, गृह विभागाचे प्रधान सचिव राधिका रस्तोगी, साहित्य मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील, भाषा संचालक अरुण गीते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कक्ष अधिकारी वासंती काळे आणि आभार उपसंचालक राज्य मराठी विकास संस्था अंजली धमाळ यांनी केले.

# 'सहा महिने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नका'

**मुंबई-**महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी व मंगळवारी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी व निवडणूक आयुक्तांची भेट घेतली. या भेटीवेळी त्यांनी मतदार याद्यांमधील घोळाचा मुद्दा निवडणूक आयोगासमोर उपस्थित केला. तसेच राज ठाकरे अधिकाऱ्यंना म्हणाले, 'मतदार याद्यांमधील घोळ दुरुस्त होईपर्यंत निवडणुका घेऊ नका. त्यासाठी सहा महिने थांबावे लागले तरी थांबू. परंतु, निवडणुका या पारदर्शक व निष्पक्षपणे पार पडल्या पाहिजेत.'असा सल्ला त्यांनी दिला.

राज ठाकरे म्हणाले, 'माझ्याकडे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधीची एक मतदार यादी आहे. या यादीमधील काही नाव मी तुम्हाला वाचून दाखवणार आहे ती वाचल्यावर तुमच्या लक्षात येईल की मतदार यादीत नेमका कसला घोळ आहे. काही लोकांच्या पालकाचं वय त्यांच्यापेक्षा कमी आहे, तर काही ठिकाणी एकाच घरात शेकडो सदस्य आहेत.

'२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर निवडणूक आयोगाने त्यांच्या संकेतस्थळावर एक यादी जाहीर केली होती. या यादीमध्ये मतदारांची केवळ नावं होती. त्यामध्ये मतदारांचे फोटो नव्हते, पत्ता देखील नव्हता, इतर कुठलीही माहिती नव्हती. त्यात घोळ सापडल्यानंतर काहीच तासांत ती यादी संकेतस्थळावरून हटवण्यात आली. याबाबत आम्ही काल केंद्रीय निवडणूक आयोगाशी बोललो. त्यावर त्यांनी आम्हाला सांगितलं की ही गोष्ट राज्य निवडणूक आयोगाच्या अखत्यारित येते. मग याम्ही राज्य निवडणूक आयोगाशी बोललो. तर ते म्हणाले ही बाब केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अखत्यारित येते. मग आम्ही दोन्ही आयोगाच्या प्रतिनिधीशी बोललो. ते दोन्हीही प्रतिनिधी केंद्रीय निवडणूक आयोगाचेच अधिकारी आहेत. आम्ही त्यांना म्हटलं, जनतेला आणि राजकीय पक्षांना मतदारांच्या याद्या न दाखवण्यामागचं नेमकं कारण काय? तुम्ही या याद्या दाखवत नाही त्यामुळेच हा घोळ होतो.'

मनसे प्रमुख म्हणाले, 'मतदार यादीमधील घोळ सुधारत नाही तोवर निवडणूक घेऊ नका अशी विनंती आम्ही निवडणूक आयोगाला केली आहे.गेल्या पाच वर्षांपासून महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. निवडणुकांसाठी पाच वर्षे थांबलो आहोत. तर या याद्या सुधारण्यासाठी आणखी सहा महिने गेले तरी काहीच हरकत नाही. त्यामुळे आम्ही निवडणूक आयोगाला सुचवले आहे की या याद्या सुधारल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नका.'



राज ठाकरेंचा निवडणूक आयोगाला सल्ला

# पवार कुटुंबाचा पाडवा होणार की नाही?

## अजित पवारांनी दिले उत्तर

**पिंपरी-चिंचवड-**दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील पवार कुटुंबातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना दिवाळी पाडव्याची उत्सुकता होती. परंतु, यावर्षी पवार कुटुंबाचा पाडवा होणार नाही. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कारण स्पष्ट केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

अजित पवार म्हणाले, 'यावर्षी पाडवा होणार नाही. कुटुंबात दुःखद घटना घडली आहे. मराठवाड्यातही शेतकरी अडचणीत सापडला आहे. पूरग्रस्त भागात वाईट परिस्थिती आहे, त्यांची दिवाळी गोड व्हावी म्हणून अनेक जण पूरग्रस्तांच्या घरी फराळ पाठवत आहेत. कुणी शिधा पाठवत आहे.



दिवाळीच्या आधी शेतकऱ्यांना मदत करून त्यांना उभे करता येईल असे प्रयत्न सुरू आहेत. पूरग्रस्त शेतकऱ्यांना महाराष्ट्र सरकारकडून ३२ हजार कोटींचं पॅकेज दिले आहे. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच असं पॅकेज देण्यात आले, असे अजित पवार म्हणाले आहेत.

अजित पवारांनी आज पिंपरी-चिंचवडमध्ये जनसंवाद घेतला. शेकडो नागरिकांनी आपल्या तक्रारी घेऊन अजित पवारांची भेट घेतली. काही तक्रारींचं निवारण झाले. काहींना प्रतीक्षा करावी लागली. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी पिंपरी-चिंचवड शहराकडे विशेष असं लक्ष दिलं आहे.

# आता इंटरनेटशिवाय होणार पेमेंट

## आरबीआयने लॉंच केला ऑफलाइन डिजिटल रुपया

**मुंबई-**मुंबईत आयोजित ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२५ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने एक ऐतिहासिक पाऊल उचलत ऑफलाइन डिजिटल रुपया (ई-रुपे) लॉन्च केला. या नव्या सुविधेमुळे आता इंटरनेट किंवा मोबाईल नेटवर्कशिवायही डिजिटल पेमेंट करणे शक्य होणार आहे. आरबीआयचा हा नवा उपक्रम भारतातील डिजिटल अर्थव्यवस्थेच्या दिशेने मोठे पाऊल मानले जात आहे.

डिजिटल रुपया हा आपल्या रुपया चलनाचा डिजिटल अवतार आहे. याचा उपयोग अगदी आपल्या खिशातल्या रोकड पैशांसारखाच करता येतो. फरक एवढाच की, तो डिजिटल स्वरूपात असतो. तुम्ही तो आपल्या डिजिटल वॉलेटमध्ये ठेवून ऑफलाइन वापरू शकता. प्रत्येक व्यवहारासाठी बँक खाते उघडण्याची गरज नाही. युजर्स हे वॉलेट ॲप्स त्यांच्या गुगल प्ले स्टोअर किंवा ॲपल ॲप स्टोअरवरून डाऊनलोड करू शकतात. ऑफलाइन डिजिटल रुपया वापरताना क्यूआर कोड स्कॅन करून किंवा फक्त टॅप करून व्यवहार करता येईल. इंटरनेट कनेक्शन नसतानाही व्यवहार यशस्वीपणे पूर्ण होईल. यामुळे हे चलन कॅशसारखेच वापरणे शक्य आहे. या नव्या सुविधेचा सर्वाधिक फायदा ग्रामीण आणि दुर्गम भागांतील लोकांना होणार आहे, जिथे इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्क मर्यादित असते. डिजिटल रुपयाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याचे 'ऑफलाइन पे' फीचर. डिजिटल रुपया आता देशातील अनेक बँकांमध्ये डिजिटल वॉलेट स्वरूपात उपलब्ध होणार आहे.

# शेअर बाजारातील घसरणीला ब्रेक; सेन्सेक्स, निफ्टीची उसळी

**मुंबई-**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेल्या १००ज्ञ टॅरिफच्या घोषणेनंतर अमेरिका-चीन याच्यातील व्यापार युद्ध तीव्र झाले आहे. त्याचा तणाव शेअर बाजारातही जाणवत आहे. या टॅरिफ आणि व्यापार युद्धाच्या धास्तीन गेल्या दोन दिवसांपासून सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये सतत घसरण होत होती. मात्र, बुधवारीबाजार सुरू होताच ही घसरण थांबल्याचे दिसून आले. बाजार उघडताच, मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्समध्ये ३०० पेक्षा जास्त अंकांनी वाढ झाली, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीतही १०० पेक्षा जास्त अंकांनी वाढ झाली.या आठवड्यात दोन दिवस सातत्याने




घसरण होत होती. मात्र, बुधवारी तिसऱ्या दिवशी ही घसरण थांबली आहे. बाजाराची सुरुवात चांगली झाली आहे. सेन्सेक्स ८२,१९७.२५ वर उघडला, जो त्याच्या मागील बंद ८२,०२९.९८ पेक्षा जास्त होता. लवकरच तो वेगाने वाढत ८२,३८४ वर व्यवहार करत होता. तसेच निफ्टीमध्येही सेन्सेक्सप्रमाणेच वाढ झाली. तो २५,१४५ च्या मागील बंदपेक्षा २५,१८१.९५ वर उघडला आणि नंतर २५,२५७.२५ वर पोहोचला.

# व्हीव्हीपॅट लावा नाहीतर बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या

## उद्धव ठाकरे यांची मागणी

**मुंबई-**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी यावेळी ईव्हीएम मशिनमध्ये व्हीव्हीपॅट लावण्याचा आग्रह धरला. मतदाराला त्याने नेमके कोणाला, कोणत्या पक्षाला मतदान केले आहे हे समजण्याचा अधिकार आहे. त्यासाठी व्हीव्हीपॅट लावलेच पाहिजेत. प्रभाग पद्धतच नसलेल्या मुंबईत जर व्हीव्हीपॅट लावलेल्या ईव्हीएम निवडणूक आयोग देत नसेल तर मुंबई महानगरपालिकेची निवडणूक बॅलेट पेपरवर घ्या, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

देशात आता कुठेच निवडणुका नाहीत. त्यामुळे व्हीव्हीपॅट मिळण्यात कोणतीच अडचण दिसत नाही. व्हीव्हीपॅट उपलब्ध करा, अशी सूचनाही उद्धव ठाकरे यांनी केली. मतदार याद्यांमधील गोंधळावर त्यांनी बोट ठेवले.प्रभाग पद्धतीने जिथे निवडणुका होणार आहेत, तिथे



व्हीव्हीपॅट पद्धत वापरता येणार नाही, असे आयोग म्हणतो. मग प्रभाग पद्धतच रद्द करा. तिचा मतदारांना काय उपयोग? मतदारांनी चार चार वेळा मतदान का करायचे? निवडणुकांनंतर कामासाठी त्यांनी कोणत्या नगरसेवकाकडे जायचे? तेच नगरसेवक आपापसात क्रेडिटसाठी आणि इतर गोष्टींसाठी भांडत बसतात. मग प्रभागाकडे कोण बघणार? ही अशी पद्धत संपूर्ण भारतात कुठेच नाही. मग फक्त महाराष्ट्रातच का? सत्ताधाऱ्यांच्या सोयीसाठी का? या प्रश्नावर चोक्कलिंगम यांना उत्तर देता आले नाही.

# भारतातून २१ हजार टन फुलांची निर्यात

**लासलगाव-** भारताची फूलउद्योग निर्यात क्षेत्रातील झेप कायम आहे. भारत सरकारने फूलशेतीला सूर्योदय उद्योग म्हणून ओळखले आहे आणि त्याला १०० टक्के निर्याताभिमुख असा दर्जा दिला आहे. फुलांच्या फळ बाग लागवडीच्या मागणीत निरंतर वाढ होत असल्याने कृषी क्षेत्रातील महत्त्वाचा व्यवसाय झाला आहे म्हणूनच व्यावसायिक फुलशेती ग्रीन हाउसअंतर्गत हवामान नियंत्रित हाय-टेक ॲक्टिव्हिटी म्हणून उदयास आले आहे. फुलांच्या निर्यातीमध्ये गेल्या काही वर्षांपासून स्थिर वाढ दिसत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी निर्यात मूल्यामध्ये वाढ झाली आहे. फूलबाजारात आपली उपस्थिती मजबूत करत आहे.

# यंदा कडाक्याची थंडी!

**मुंबई-**यंदा अतिपावसानंतर आता विक्रमी थंडी जाणवणार आहे. नोव्हेंबर ते फेब्रुवारी महिन्यापर्यंत कडाक्याची हाडं गोठवणारी थंडी असणार आहे. ११० वर्षांत तिसऱ्यांदा या वेळी तीव्र थंडी राहणार आहे. हिमालयातील यंदा ८६ टक्के भाग हा दोन महिने आधीच बर्फाने झाकलेला आहे. हिमालयातील तापमान ३ अंश सेल्सिअसने कमी झाले आहे.

या वेळी प्रशांत महासागरात ला निनाचा इफेक्ट असणार आहे. त्यामुळे महासागरातील तापमान हे सामान्यापेक्षा कमी राहणार आहे. ला निनाचा इफेक्ट डिसेंबरमध्ये सक्रिय होईल. यामुळे यंदा हिंदुस्थानात कडाक्याची थंडी राहणार आहे. ला निना उत्तर, मध्य आणि पूर्वेकडील प्रदेशांमध्ये सरासरी तापमान ३-४ अंश सेल्सिअसने कमी करू शकते.हिमालयाच्या वरच्या भागात म्हणजेच ४ हजार फुटांपेक्षा जास्त उंची असलेल्या भागात सामान्यतः सरासरी तापमान उणे १५ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा कमी असते. ला निना उत्तर, मध्य आणि पूर्वेकडील प्रदेशांमध्ये सरासरी तापमान ३-४ अंश सेल्सिअसने कमी करू शकते.

ऑक्टोबर या थंडीच्या पहिल्याच महिन्यात कमी तापमान राहिले आहे. भोपाळमध्ये किमान तापमान १५.८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे सामान्यपेक्षा ३.६ अंश सेल्सिअस कमी आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या सहामाहीत भोपाळमध्ये इतक्या कमी तापमानाची नोंद होण्याची ही गेल्या २६ वर्षांत तिसरी वेळ आहे. राजस्थानमध्ये दिवसा उष्ण आणि रात्री थंड तापमान आहे. सिकरमध्ये रात्रीचे किमान तापमान १५ अंश सेल्सिअसपेक्षा कमी नोंद करण्यात आली.सिक्कीम, कश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि नेपाळपासून संपूर्ण उंच हिमालयात पांढऱ्या बर्फाची चादर पसरली आहे. पाणलोट क्षेत्रदेखील वाढले आहे.



**महाराष्ट्रात तीन ते चार दिवस पाऊस**

१२२ वर्षांत सरासरी तापमान ०.९९ अंशांनी वाढले आहे. मात्र २०२५ मध्ये तापमानात वाढ होणार नाही, तर ला निनामुळे तापमानात घट होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात तूर्तास तीन ते चार दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस राहणार आहे. काही शहरांमध्ये तापमानात चढ-उतार होत आहेत. महाराष्ट्रात उष्ण आणि ढगाळ वातावरण आहे. २० ऑक्टोबरनंतर हवामानात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या मते, येत्या काही दिवसांत तापमानात आणखी घट होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात ऑक्टोबर हीटनंतर थंड वारे अनुभवायला मिळू शकतात. सध्या पश्चिम बंगालच्या उपसागरात दक्षिणेकडे सायक्लोनिक सर्क्युलेशन तयार झाल्याने पावसाचे वातावरण तयार झाले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अस्थिरतेचे ढग

देशाच्या निर्मितीपासून पाकिस्तानकडे पाहिले, तर एकच गोष्ट स्थिर आहे, ती म्हणजे अस्थिरता अन् अशांतता! पाकिस्तानच्या राजकारणावर नजर टाकल्यास या देशाच्या पाचवीला पुजलेली राजकीय अस्थिरता आजही कायम आहे. १९४७ मध्ये पाकिस्तानची निर्मिती झाली; परंतु आजतागायत एकाही सरकारला त्याचा कार्यकाळ पूर्ण करता आलेला नाही. आजही पाकिस्तान मोठ्या अस्थिर परिस्थितीला तोंड देतोय. स्वातंत्र्यानंतर गेल्या ७५ वर्षांत पाकिस्तानात केवळ ३७ वर्षेच लोकांनी निवडलेले सरकार सत्तेत राहिले. ३२ वर्षे लष्करशहांनी सत्ता हाती ठेवली. उरलेली आठ वर्षं या देशाने राष्ट्रपती राजवट अनुभवली. पाकिस्तानने तब्बल २२ पंतप्रधान पाहिले. पण यातील एकाही पंतप्रधानाला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. सर्वाधिक तीन वेळा पंतप्रधान झालेले नवाज शरीफ हे पाकिस्तानातील सर्वाधिक म्हणजे ९ वर्षं सत्तेत राहिलेले राजकीय नेते मानले जातात. सध्या त्यांचे बंधू शाहबाज शरीफ हे पंतप्रधान आहेत. संसदेत सरकार असले, तरी सारी सत्ता लष्कराचीच आहे.विद्यमान लष्कर प्रमुख असीम मुनीर यांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे भारताच्या सीमेवर तणाव वाढला. आता अफगाणिस्तानच्या सीमेवरील युद्धालाही मुनीर यांची महत्त्वाकांक्षा जबाबदार असल्याचे मानले जात आहे. राजकीय अशांतता, दहशतवादी हल्ले, आर्थिक संकटामुळे पाकिस्तान आतून पुरता पोखरला आहे. ही गोष्ट जगापासून लपून राहिलेली नाही. अशा अनिश्चित वातावरणात पाकिस्तानची वाटचाल पुन्हा एकदा लष्करी राजवटीकडे सुरू झाली आहे. नवाज शरीफ यांच्याव्यतिरिक्त, लियाकत अली खान आणि युसूफ रझा गिलानी यांनी सलग चार वर्षांपेक्षा जास्त काळ पंतप्रधान पद भूषवले. पंतप्रधान सत्तेवर असतानाही त्यांच्यावर कायम लष्कराची नजर असेच. त्यामुळे त्यांना कधीही मोकळेपणाने राज्यकारभार करता आला नाही, ही वस्तुस्थिती आहे.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील कट्टर दुश्मनीही जगाला ठाऊक आहे; परंतु पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या दोन मुस्लीम राष्ट्रात सध्या सुरू असलेले युद्ध संपूर्ण जगात चर्चेचा विषय झाला आहे. जोरदार गोळीबार आणि चकमकींमुळे दोन्ही देशांतील तणाव शिगेला पोहोचला आहे. या दोन देशांच्या सीमेवर गेले दोन दिवस सुरू असलेल्या संघर्षामुळे दोन्ही बाजूचे मोठे नुकसान झाले आहे. तालिबानने ५८ पाकिस्तानी सैनिकांना मारल्याचा दावा केला आहे, तर पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या अनेक चौक्या ताब्यात घेतल्याचे म्हटलय. १९९०च्या दशकात तालिबान हा धर्मवेड्या विद्यार्थ्यांचा एक लहान गट होता. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तान पुन्हा ताब्यात घेतला आणि तेव्हापासून त्यांनी राष्ट्रीय सैन्य तयार करण्याचा प्रयत्न केला. पूर्वी, त्यांची ताकद फक्त लढाऊ होती. आता ते एक संघटित शक्ती म्हणून काम करू लागले आहेत. त्यातूनच त्यांनी पाकिस्तानला धडा शिकवला आहे. त्यात अमेरिकेचे विशेष प्रतिनिधी आणि दक्षिण आशियाचे अभ्यासक झल्मे खलीलझाद यांनी पाकिस्तानच्या धोरणांबाबत दिलेल्या प्रतिक्रियेमुळे पाकिस्तान किती अडचणीत आहे, हे दिसून येतय. खलीलझाद हे २०१८ ते २०२१ दरम्यान अफगाणिस्तानसाठी अमेरिकेचे विशेष प्रतिनिधी होते. तालिबान परत सत्तेत आल्यानंतर ते अमेरिकेत परतले. त्यामुळे त्यांच्या प्रतिक्रियेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. खलीलझाद यांच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तान स्वतःची कबर खोदत आहे. तालिबानशी संघर्ष किंवा शेजारील देशांशी बिघडलेले संबंध इस्लामाबादसाठी महागडे ठरू शकतात. पाकिस्तानने सध्या ज्या धोरणांचा अवलंब केला आहे, त्याचा भविष्यात गंभीर परिणाम होईल.याच पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील वाढत्या सीमा संघर्षात मध्यस्थी करण्याची ऑफर दिली आहे. आंतरराष्ट्रीय बाबींमध्ये मध्यस्थी करण्याची ऑफर देऊन, ट्रम्प यांनी पुन्हा एकदा जागतिक व्यासपीठावर सक्रिय भूमिका बजावण्याचा टेंभा मिरवला असला, तरी त्याचा परिणाम उलट पाकिस्तानात झालेला दिसतो. ट्रम्प यांच्या गाझा शांतता योजनेला पाठिंबा दिल्याने पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. कट्टरपंथी इस्लामी पक्ष तहरीक-ए-लब्बैक पाकिस्तान (टीएलपी)ने देशभर निदर्शने केली. एवढेच नव्हे, त्यांनी अमेरिकन दूतावासाकडे कूच करण्याचा प्रयत्न केला; यावेळी पोलिसांशी चकमक झाली. त्यात दोन निदर्शकांचा मृत्यू झाला. इस्लामाबादमध्ये टीएलपीने मोर्चा काढला. मोर्चा रोखण्यासाठी सरकारने राजधानीकडे जाणारे प्रमुख रस्ते बंद केले. इस्लामाबाद आणि रावळपिंडीमध्ये मोबाइल, इंटरनेट सेवा बंद करण्याची वेळ पाकिस्तान सरकारवर आली. पंजाब पोलिसांनी टीएलपी मुख्यालयावर छापा टाकला आणि त्यांचे नेते साद रिझवी यांना अटक करून संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या संघर्षात सुमारे डझनभर पोलीस अधिकाऱ्यांसह अनेक लोक जखमी झाले. दंगल रोखण्यासाठी प्रमुख रस्त्यांवर पोलीस तैनात करण्यात आले. सरकारी कार्यालये आणि परदेशी दूतावास असलेले रेड झोन पूर्णपणे सील करण्यात आले. पंजाबमध्ये १० दिवसांसाठी कलम १४४ लागू करण्यात आले आहे. अमेरिकेच्या तालावर चालणाऱ्या पाकच्या धोरणामुळे पाकिस्तानातील शहरांमध्ये अंतर्गत सुरक्षा धोक्यात आली आहे. असे चित्र देशभर निर्माण झाले आहे.



**अमेरिकेने लादलेले निर्बंध आणि नोकरीसाठी आकारलेले भरमसाठ व्हिसा शुल्क याकडे बघून हताश होणार की आव्हान म्हणून संकटाला सामोरे जाणार हाच खरा प्रश्न आहे. आता कुशल तंत्रज्ञ आणि बुध्दिवंतांना भारतातच नोकरी शोधावी लागेल किंवा स्टार्टअप क्षेत्रामध्ये उतरावे लागेल. अमेरिकन कंपन्यांनी भारतातूनच आयटी सेवा घ्यायचे ठरवल्यास आयटी क्षेत्रात भारताची प्रगती होऊ शकते.**

## आता प्रतिभेला भारतातच संधी

स्वतःला सिध्द करण्यासाठी एखाद्या माणसाकडे रास्त गुणवत्ता किंवा तात्विक आधार नसेल तर तो 'शॉर्ट कट'चा अवलंब करतो. रास्त काय आणि चुकीचे काय, याचा सारासार विचार न करता विचित्र कृती करायला लागतो. भारतीय औषध उद्योग, भारतीय चित्रपट यावर आयात शुल्क लादल्यानंतर किंवा वाढवल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणखी काय करणार, याची खात्री कोणालाही नाही. एव्हाना ते हात धुवून भारताच्या मागे लागले आहेत. भारत-पाकिस्तान युध्द आपण थांबवले, असा खोटा दावा करण्यापासून भारतावर ५० टक्के आयात कर लादण्यापर्यंत त्यांनी भारतविरोधी नीती राबवायला सुरुवात केली. 'अमेरिका फर्स्ट' हे त्यांचे धोरण आहे. ते राबवताना भारताला अनेक परिणाम भोगावे लागत आहेत. ट्रम्प यांनी एका आदेशावर स्वाक्षरी करून अमेरिकेत नोकरीसाठी येणाऱ्या कुशल आणि तज्ञ भारतीयांना जबरदस्त झटका दिला. नव्या आदेशानुसार एच वन बी व्हिसाचे पूर्वी सहा लाख रुपये असलेले शुल्क आता एक लाख डॉलर्स म्हणजेच ८८ लाख रुपये झाले आहे. हा आदेश अमेरिकेत जाऊन नोकरी करू इच्छिणाऱ्या तरुणांवर मोठा आघात ठरला. भारतातील डॉक्टर्स, वैज्ञानिक, तंत्रज्ञ, आयटी क्षेत्रातील इंजिनिअर्स आणि तज्ञ वर्षानुवर्षे मोठ्या संख्येने एच वन बी व्हिसा मिळवून नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत जात आहेत. ट्रम्प सरकारचा नवा आदेश म्हणजे त्यांच्या भविष्यावर अमेरिकेने चालवलेली कुऱ्हाड आहे. या सर्व हजारो बुध्दिमान भारतीय तरुणांच्या अमेरिकेत जाऊन करिअर करण्याच्या स्वप्नावर ट्रम्प सरकारने पाणी ओतले. या निमित्ताने अमेरिकेच्या या नीतीची आणि परिणामांची जोरदार चर्चा सुरू झाली.

### व्हिसा शुल्कात भरमसाठ वाढ

अमेरिका दर वर्षी जेवढे एच वन बी व्हिसा मंजूर करते, त्याचा सर्वाधिक म्हणजेच ७० ते ७३ टक्के लाभ भारतीय नागरिकांना मिळत आला आहे. २०२४ मध्ये एक लाखापेक्षा जास्त भारतीय नागरिकांना अमेरिकेने एच वन बी व्हिसा मंजूर केला होता. २०२४ मध्ये ही संख्या घटली आणि ७१,२१९ भारतीयांना एच वन बी व्हिसाचा लाभ मिळाला. २०२५ मध्ये आज ६४ हजार पर्यंत भारतीयांना एच वन बी व्हिसा मंजूर झाले आहेत. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये नोकरीसाठी अमेरिकेत जाणाऱ्या भारतीयांना व्हिसा देण्याचे प्रमाण अगोदरच घटले आहे. आता या व्हिसाचे शुल्क भरमसाठ वाढवल्यामुळे नोकरीसाठी अमेरिकेत जाणाऱ्या भारतीयांचा ओघ निश्चितच थांबेल किंवा खूपच कमी होईल.

व्हिसा शुल्कात सहा लाखावरून थेट ८८ लाख अशी भरमसाठ वाढ केल्याने भारतीय तरुणांचे व्हिसा शुल्क भरणाऱ्या अमेरिकन कंपन्याही हबकल्या आहेत. यापुढे ते एवढे मोठे शुल्क भरण्याची तयारी दाखवतील का, हा कळीचा मुद्दा आहे. भारतीय कुशल तज्ञांची, तंत्रज्ञांची आणि इंजिनिअर्सची संख्या घटली तर अमेरिकन कंपन्यांच्या कारभारावरही परिणाम होईल आणि या व्हिसा शुल्कवाढीचा अर्थव्यवस्थेवरही परिणाम होईल. कमी वेतनात कुशल तंत्रज्ञ म्हणून भारतीय नागरिक उपलब्ध होतात म्हणून अमेरिकेत भारतीय तरुणांना मोठी संधी मिळत होती. गेली काही दशके भारतीय नागरिकांनी सिलिकॉन व्हॅलीमधे मोठे स्थान निर्माण केले. आता भरमसाठ व्हिसा शुल्कामुळे हे तरुण देशात राहूनच विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय, आयटी क्षेत्रात सेवा करणार की ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि युरोपकडे धावणार, असा प्रश्न चर्चिला जात आहे.

### ट्रम्प सरकारचे भारतावरील संकट


अमेरिकेने लादलेले निर्बंध आणि नोकरीसाठी आकारलेले भरमसाठ व्हिसा शुल्क हे ट्रम्प सरकारने भारतावर लादलेले संकट आहे. या संकटाकडे बघून हताश होणार की आव्हान म्हणून संकटाला सामोरे जाणार हाच खरा प्रश्न आहे. कुशल तंत्रज्ञ आणि बुध्दिवंतांना भारतातच नोकरी शोधावी लागेल किंवा स्टार्टअप किंवा मेक इन इंडियामध्ये उतरावे लागेल. भारतीय सॉफ्टवेअर सेवेची निर्यात सध्या १५८ अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे. येत्या पाच वर्षांमध्ये ती २०० अब्ज डॉलर्सच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. अमेरिकेत बोलावून नोकऱ्या देण्याऐवजी भारतातूनच आयटी सेवा घेणे अमेरिकन कंपन्यांनी ठरवल्यास आयटी आणि सॉफ्टवेअर सेवाक्षेत्रात भारताची मोठी प्रगती होऊ शकते. अमेरिकेतील कंपन्यांना भारतात राहून सेवा देणाऱ्या इंजिनिअर्स आणि तंत्रज्ञांची कमी खर्चात चांगली सेवा मिळू शकेल आणि भारताचीही वेगाने भरभराट होऊ शकेल. पूर्वी नोकरीसाठी भारतीय तरुण अमेरिकेत गर्दी करत होते, पण व्हिसाच्या भरमसाठ शुल्कामुळे ते भारतात राहूनच स्टार्टअप सेवा सुरू करू शकतील. भारतात रोजगार वाढेल आणि भारतात राहून जागतिक स्तरावर सेवा देऊन भारतातील तरुणांना चांगले उत्पन्न मिळू शकेल. जागतिक सेवा देण्यासाठी उत्तम प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनाही देशात चांगली संधी मिळू शकेल.

भारतातून जागतिक स्तरावर आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा देण्यासाठी उत्तम वातावरण असले पाहिजे. स्वच्छ आणि निरोगी परिसर पाहिजे. उत्तम वेतन आणि दर्जेदार सेवा देता आली तरच भारतीय तरुणांना स्पर्धेत टिकून राहता येईल. सरकारी कामातील लाल फितीचा कारभार आणि सर्व स्तरावर बोकाळलेला भ्रष्टाचार आणि कामचुकारपणा असेल तर जागतिक स्पर्धेत आपण कसा टिकाव धरू शकाणार? काम न करता वेतन किंवा मोबदला मिळाला पाहिजे आणि जास्तीत जास्त सेवा फुकट मिळाल्या पाहिजेत, ही मानसिकता दूर होणे सर्वात महत्त्वाचे आहे. राजकीय नेत्यांच्या मागे चकरा मारणे आणि सरकारी नोकरशहांची मनधरणी करणे या गोष्टी कायमच्या बंद होणे गरजेचे आहे. विदेशात जशी सुसज्ज व अद्ययावत असतात, तशी कार्यालये देशात राज्याराज्यांमध्ये उपलब्ध झाली पाहिजेत. महत्त्वाच्या मोठ्या शहरांमध्ये सुसज्ज ग्रोथ सेंटर्स उभारली पाहिजेत. वीज आणि पाणी पुरवठा अखंड पाहिजे, इंटरनेट सेवा उत्तम असली पाहिजे. संशोधनासाठी सुविधा आणि कॉर्पोरेट वातावरण गरजेचे आहे. कर आकारणी आणि कंपन्यांसाठी असलेले कायदे आणि नियम गुंतागुंतीचे नसावेत याची सरकारने काळजी घेतली पाहिजे. अन्य कोणत्याही देशापेक्षा भारतात टॅलेंट मुबलक आहे, भारतीय नागरिक प्रामाणिकपणे आणि चांगली गुणवत्ता देणारे काम करतात हे जगाला ठाऊक आहे. भारतीय कंपन्यांकडे विदेशातून अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित होईल असे वातावरण निर्माण झाले तर भारत जागतिक पातळीवर आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा देण्यात अग्रेसर राहील हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा स्वदेशीचा पुरस्कार करायला सुरुवात केली आहे. मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया, कौशल्य विकास योजनांना आता गती देणे गरजेचे आहे. नोकरशहा आणि सरकारी फायलींच्या विळख्यात या योजना अडकून राहणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. उद्योग, तंत्रज्ञान आणि आयटीसारखी मंत्रालये त्याची माहिती तसेच ज्ञान व कामाची आवड असलेल्या मंत्री व सचिवांकडेच दिली पाहिजेत. संशोधन, विकास आणि उद्यमशीलता यांना प्रोत्साहन दिले तर आपला देश आंतरराष्ट्रीय पातळीवर टॅलेंट हब म्हणून ओळखला जाईल. अमेरिकेत जाऊन 'अब की बार ट्रम्प सरकार' अशा घोषणा देऊनही भारताच्या पदरी काय पडले हे सर्व जगाने बघितले आहे. आता हळहळ करण्याऐवजी ट्रम्प सरकारने लादलेल्या संकटातून सोने कसे निर्माण करता येईल यावर सरकार आणि खाजगी क्षेत्राने लक्ष केंद्रित करायला हवे. भारतीय युवकांमधील नैराश्य दूर करण्यासाठी कालबध्द योजनापूर्वक प्रयत्न करायला हवेत अन्यथा, हा बुध्दिजीवी तरुण आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अमेरिकेला पर्याय म्हणून युरोप, युके, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि आखाती देशांकडे मोठ्या संख्येने जाईल आणि भारत ताज्या संकटातून संधीकडे मार्गक्रमण करण्यावाचून वंचित राहील.

**डॉ. सुकृत खांडेकर**

## डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार नाहीच

जागतिक पातळीवर सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या नोबेल पुरस्काराची घोषणा दरवर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात केली जाते.मानव कल्याणासाठी झटणाऱ्या विविध क्षेत्रातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक आणि जागतिक पातळीवर शांततेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी या पुरस्काराकडे सगळ्या जगाचे लक्ष लागले होते कारण यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मलाच मिळणार असा ( फाजील ) आत्मविश्वास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना होता. तसे त्यांनी अनेकदा बोलूनही दाखवले होते त्यामुळे त्यांना खरंच हा पुरस्कार मिळेल का? याची उत्सुकता जगभर होती. यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला तो व्हेनेझुएलाच्या मारिया कोरिना मचाडो यांना मिळाला.यापेक्षा ट्रम्प यांना पुरस्कार का मिळाला नाही याचीच जगभर याची चर्चा झाली. डोनाल्ड ट्रम्प यांनी हा पुरस्कार मलाच मिळणार यासाठी मी सात युद्धे थांबवली व जगात शांती निर्माण केली अशी सातत्याने वल्गना करून एकप्रकारे नोबेल पुरस्कार समितीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या दबावाला नोबेल पुरस्कार समिती बळी पडली नाही. डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार हवा होता त्यासाठी त्यांनी मोठा थयथयाट केला. सातत्याने मी सात युद्धे थांबवली अशी वल्गना केली मात्र अमेरिकेनेच अनेक देशांना फुस लावून युद्धाच्या गर्तेत ढकलले हे लपून राहिले नाही.



आधी भांडण लावून देणे आणि नंतर ते सोडवण्याचे नाटक करणे त्यातून आपला स्वार्थ साधणे हेच अमेरिकेचे धोरण आहे. डोनाल्ड ट्रम्प असो की अमेरिकेचे याआधीचे राष्ट्राध्यक्ष त्यांनी इतर देशांकडे फक्त आपल्या शस्त्रास्त्रांचे गिऱ्हाईक म्हणून पाहिले. आपली शस्त्रास्त्रे विकली जावीत यासाठी अमेरिकेने अनेक देशात युद्ध पेटवली हा इतिहास आहे. आता हेच पाहा ना... भारत पाकिस्तानचे युद्ध मीच थांबवले अशी शेखी मिरवणारे व त्याद्वारे नोबेल पुरस्कारावर हक्क सांगणारे डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला घातक शस्त्रात विकणार असल्याची बातमी नुकतीच वर्तमानपत्रात वाचली आता. जर डोनाल्ड ट्रम्प हे खरंच शांततेचे भोक्ते असते तर त्यांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रे का विकली असती?पाकिस्तान या शस्त्रांचा वापर भारताविरोधात करणार जर पाकिस्तानने हे शस्त्र भारताविरुद्ध वापरले तर भारतही त्याला उत्तर देणार मग पुन्हा संघर्ष उफाळणार. जर ही शस्त्रे दहशतवाद्यांच्या हातात पडली तर भारतासोबतच संपूर्ण जगाला धोका पसरू शकतो. मग पाकिस्तानसारख्या दहशतवादी देशांना शस्त्रे विकून जगभर अशांतता पसरवणाऱ्या ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार कसा मिळणार?मारिया माचाडो यांना हा पुरस्कार देण्यात आला त्या त्याच्या हकदार होत्याच. मारिया मचाडो या हॉवर्ड विद्यापीठातील पदवीधर आहेत आणि त्यांच्या व्हेनेझुएला देशातील हुकुमशाही विरुद्ध त्यांनी आवाज उठवला आहे. भ्रष्ट हुकुमशाही विरुद्ध स्वतःचा जीव धोक्यात घालून लढणाऱ्या मारिया मचाडो या लोकशाहीचा आवाज आहेत. मागील वर्षी या देशात निवडणुका झाल्या. या निवडणुकीत मचाडो या उभ्या राहिल्या मात्र त्यांना निवडणुकीत उभे राहण्यापासून रोखण्यात आले. त्यांना अपात्र घोषित करून त्यांचे राजकारण संपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण त्या सरकारच्या या दमनशाहिला दबल्या नाहीत. त्यांनी या विरोधात आवाज उठवला. संपूर्ण देशाला हुकुमशाही विरुद्ध एकत्र केले. देशात लोकशाही टिकावी म्हणून जीव धोक्यात घालून लढल्या त्यामुळेच त्यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड सर्वार्थाने योग्य आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि मारिया मचाडो यांची तुलना होऊ शकत नाही. लोकशाहीच्या नावाखाली हुकुमशाही राबवणारे ट्रम्प या पुरस्कारासाठी पात्र ठरूच शकत नाही म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीच्या या निर्णयाचे जगभर कौतुक होत आहे.

**श्याम ठाणेदार**

## आपला तो बाब्या, दुसऱ्याचे ते कार्ट

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांनी वसई-भाईंदर रो-रो वाहतुकीचा पर्याय निवडला. मात्र, तिथेही वाहनांची मोठी रांग लागलेली असताना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सुनील राऊत यांच्या कथित गाडी चालकाने सर्वसामान्य नागरिकांची रांग डावलून थेट गाडी पुढे नेल्याचा व्हिडिओ समाज माध्य... णि वृत्तवाहिन्यांव... दिसला.आमदार सुनील राऊत यांच्या नावाच... कथित वापर करु... त्यांच्या वाहकाने निय... पायमल्ली केली, ज्यामुळे सामान्य जनतेला मोठा मनस्ताप झाला.राजकीय वर्तुळात, हीच बाब महायुतीच्या नेत्यांकडून अशी घडली असती तर रोहित पवार, सुप्रिया सुळे आणि खुद्द संजय राऊत यांच्यासह विरोधी पक्षातील मंडळींनी यावर नुसता गदारोळ केला असता. मात्र, आता हे प्रकरण आपल्याच 'युती बंधूंशी' संबंधित असल्याने, या सगळ्यांची बोबडी वळली असून त्यांनी या संपूर्ण प्रकरणावर सोयीस्कर मौन साधले आहे.

**अविनाश देशपांडे**

## मुंबईत काँग्रेसचा 'एकला चलो रे' चा नारा नको

आगामी काळात होवू घातलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चैन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत सांताक्रूझ येथील गॅलेक्सी हॉटेलात काँग्रेसची बैठक पार पडली यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह पक्षाचे खासदार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर असल्याचे वृत आहे यावेळी मुंबई महापालिका निवडणूक काँग्रेसने स्वबळावर निवडणुका लढवाव्यात असा सूर समस्त कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचा आहे.सध्या काँग्रेस बिकट अवस्थेतून जात असताना असला एकला चलो रे चा नारा पक्षाला धोकादायक ठरु शकतो.

**राजू जाधव**

## राजकीय नीतीमूल्य जोपासण्याची गरज

आपल्या राज्यातील महायुती सरकारमधील मंत्र्यांकडून वादग्रस्त वक्तव्ये तसेच आक्षेपार्ह कृती केल्या जात असतात. यावरून गदारोळ होत असतो. विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत असते तर जनतेतही नाराजी झालेली पाहायला मिळते. मात्र राजीनामा कुणाचाही घेतला जात नाही. शिवाय याबाबत बरीच सोयीस्कर आणि उडवाउडवीची उत्तरे सत्ताधाऱ्यांकडून दिली जातात. त्यामुळे लोकप्रतिनिधींची नैतिकता किंवा नीतिमूल्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील मंत्र्यांच्या करनाम्यांची जाहीर चर्चा सुरु आहे. यातील माणिकराव कोकाटे तर खुच चर्चेत होते. त्यांचा राजीनामा घेणार अशी चर्चा होती, मात्र आता त्यांचे खातेबद्दल करून त्यांना माफ केले गेले. सध्या असेच काही गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याबाबत राजीनाम्याची मागणी होत आहे. प्रत्यक्षात शिवसेनेच्या मंत्र्यांच्या आरोपानंतर त्यांच्यावर कारवाई होत नसेल तर माझ्याच मंत्र्यावर कारवाई का,असा युक्तिवाद होत असल्याचे दिसते. त्यामुळे एकमेकांच्या चुका सांभाळून घेऊ अशा पद्धतीने सरकारचा कारभार सुरु आहे. महायुती सरकार स्थापन होऊन आठ महिने झाले आहेत. वादग्रस्त वक्तव्ये आणि मंत्री, आमदारांचे वादग्रस्त वागणे हे सर्व याच कालावधीतील आहे. त्यांच्यावर मुख्यमंत्र्यांनी कुठलीही कारवाई केलेली दिसत नाही. सर्वजण सत्ताधारी पक्षांचे असल्याने बहुधा एकाच बोटीचे प्रवासी आहेत. एकत्र प्रवास करणार असल्याने एकमेकांना सांभाळून घेण्याचा अलिखित करार त्यांच्यात झालेला असावा, हे सरकारच्या अजून लक्षात येत नाही, जी राज्यासाठी दुर्देवी बाब ठरते.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# नगरवाडी शेतशिवारात शेतीत लागवड केलेली गांजाची झाडे जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक छापेमारी, महागांव तालुक्यात अंमली पदार्थविरोधी मोठी कारवाई

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ – यवतमाळ जिल्ह्यात अवैध धंदे, शस्त्रसाठा, आणि अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळने महागांव तालुक्यात मोठी कारवाई करत गांजाच्या झाडांची शेती करणाऱ्या इसमावर NDPS कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे.



पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से) यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांनी त्यांच्या पथकांना गुप्त माहिती गोळा करून प्रभावी छापे टाकण्याचे निर्देश दिले होते. 14 ऑक्टोबर 2025 रोजी स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ कॅम्प पुसद पथकाला गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मौजे नगरवाडी, ता. महागांव येथील गजानन नारायण मेटकर (वय 50) या इसमाने आपल्या शेत सर्वे नं. 12/01 मध्ये गांजाच्या झाडांची लागवड केली आहे. त्यानुसार पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांना अवगत करून पंचांच्या उपस्थितीत शेतावर छापा मारला असता, शेतामध्ये एकूण 31 लहान-मोठ्या आकाराची, 37 किलो 500 ग्रॅम वजनाची गांजाची झाडे आढळली. या झाडांची एकूण बाजारमूल्य रु. 1,87,500 इतकी असून ती झाडे जप्त करून ताब्यात घेण्यात आली. सदर इसम गजानन नारायण मेटकर याच्याविरुद्ध महागांव पोलीस ठाण्यात NDPS कायद्याच्या कलम ८(ब), 20(b)(i) अंतर्गत गुन्हा क्र. 520/2025 नुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड, पोलीस निरीक्षक सतीश चवरे (स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ) आणि पोलीस निरीक्षक धनराज निळे (महागांव पोलीस स्टेशन) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत सपोनि धीरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, सफौ मुन्ना आडे, पोहवा संतोष भोरगे, पोहवा तेजाब रणखांब, पोहवा सुभाष जाधव, पोहवा कुणाल मुंडोकार, पोहवा रमेश राठोड, पोशि सुनिल पंडागळे, चापोउपनि रविंद्र श्रीरामे, पोशि राजेश जाधव (स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ) यांनी मोलाची भूमिका बजावली. स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, जिल्ह्यातील अवैध धंदे व अंमली पदार्थ विक्रेत्यांविषयी कोणतीही माहिती असल्यास ती पोलिसांना न घाबरता कळवावी. अशी माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असेही पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# खाजगी ट्रॅव्हल्स मालकांकडून प्रवाशांची मनमानी आर्थिक लूट !

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - पुसद येथील बाहेरगावी नोकरीला असलेले कर्मचारी तथा तालुक्यातील मजूर वर्ग कामगार काम करण्यासाठी गेलेले पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद या ठिकाणाहून आपल्या गावी दसरा व दिवाळी या सणासाठी परत येत आहेत. यातच ऐन दिवाळीच्या वेळेत येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांकडून खाजगी ट्रॅव्हल्स चालकांकडून आड्याच्या-धिड्या तिकीट वाढवून मनमानी पद्धतीने अक्षरशः लूटमार होत आहे. पुणे ते पुसद या मार्गावरील खासगी ट्रॅव्हल्स चालणाऱ्या तिकिटांचे दर तब्बल दोन ते अडीच हजार रुपये इतके गगनाला भिडले आहेत.ही दरवाढ मनमानी पद्धतीने वाढविल्या मुळे प्रवासी मोठ्या प्रमाणात हैराण झाले असून, यावर शासनाच्या वाहतूक विभागाकडून कुठल्याही प्रकारची कारवाई न केल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खुलेआम लूट सुरू असतांनाही प्रशासनाने मौन बाळगल्याने ट्रॅव्हल्स व्यावसायिकांचा मनमानी कारभार सुरू आहे.मागिल वर्षांपूर्वी अशाच प्रकारे प्रवाशांची लूट होत असल्याचे लक्षात आल्यानंतर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून तिकीट दर प्रमाणाच्या बाहेर ठेवता येणार नाही, असा आदेश काढला होता. त्या निर्णयाचे सर्वसामान्य नागरिक व प्रवाशांनी स्वागत केले होते. मात्र मागील वर्षी तसे आदेश निघाले नाहीत व कुठल्याही प्रकारची दखल सुद्धा घेण्यात आलेली नाही, आणि त्याचाच फायदा घेत ट्रॅव्हल्स चालकांनी मनमानी दर आकारले आहे. यावर्षीही त्याच पद्धतीने दिड हजारांपासून अडीच हजार रुपये इतके दर आकारले जात आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील हजारो तरुण आयटी, शिक्षण, तसेच प्रमाणात मजूरवर्ग पुणे,मुंबईला काम करण्यासाठी जात असतो आणि यावेळेस तो परत येत असतो व अनेक कर्मचारी खासगी क्षेत्रात पुण्यात कार्यरत आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही ते दिवाळीसाठी आपल्या गावी येण्याची तयारी करत आहेत. पण ट्रॅव्हल्सचे अतिशय जास्त दर पाहून अनेक तरुण वैतागले आहेत. तिकीट न घेतल्यास घरी जाता येत नाही, आणि घेतल्यास खिशावर ताण येतो, अशी प्रतिक्रिया प्रवाशांनी दिली. सरकार प्रयत्न करतंय दरकपातीचे, पण व्यापारी वेठीस धरतायत. एकीकडे राज्य सरकारने यावर्षी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात प्रमाणाच्या बाहेर पाऊस झाल्यामुळे शेतकरी हा अहवाल दिल झाला आणि नागरिकांचे सुद्धा आतोनात नुकसान झाल्यामुळे महाराष्ट्र परिवहन महामंडळ एसटी बस या महामंडळाने सुद्धा यावर्षी भाडेवाढ करण्याचे थांबविले आहे तर दुसरीकडे काही व्यावसायिक आणि ट्रॅव्हल्स चालक मात्र स्वतःच्या मनाने भाडेवाढ करून सामान्य नागरिकांना आर्थिक बाबतीत वेठीस धरत आहेत. शासनाच्या आदेशाला धाब्यावर बसवून सुरू असलेली ही लूटमार रोखण्यासाठी परिवहन विभागाने तातडीने दखल घेऊन हस्तक्षेप करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# उमरखेड नगरपरिषद निवडणुकीसाठी मूळ प्रारूप मतदार यादीत झालेल्या गंभीर त्रुटींविषयी तक्रार

## एमडीएफ ची निवडणुक आयोगाकडे तात्काळ दुरुस्तीची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मूळ प्रारूप मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर घोळ, चुका व विसंगती झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक पात्र मतदारांची नावे वगळली गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व संभ्रम निर्माण झाला आहे.



प्रभागनिहाय लोकसंख्या व मतदारसंख्येतील तफावत अत्यंत चिंताजनक आहे. अनेक प्रभागांमध्ये हजारो मतदारांचे नाव यादीतून वगळले गेले असल्याचे दिसून येते. यामुळे येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने पात्र मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, प्रभाग रचना नूसार रचनेच्या चतु : सिमेच्या आतील भाग म्हणजेच जे प्रगणक गट सामील आहे ते मतदार असणे आवश्यक आहे . कर्तव्या वर असेलेल्या कर्मचाऱ्यांनी सर्व रचनेची अस्त व्यस्त करुन टाकले प्रगणक गट बदलले गेले . जे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेस धक्का देणारे आहे. तसेच, काही प्रभागांमध्ये लोकसंख्या वाढ झालेली असतानाही मतदारसंख्या कमी झालेली दिसते. ही बाब अत्यंत संशयास्पद असून मतदार यादीच्या तयार प्रक्रियेत गंभीर त्रुटी, दुर्लक्ष किंवा संगनमत असल्याची शंका निर्माण करते. असे निवेदन महाराष्ट्र डेमोक्रेटीक फोरम तर्फे मुख्य निवडणूक आयोग , जिल्हाधिकारी,उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी नगर यांना देण्यात आले.

उमरखेड नगरपरिषद क्षेत्रांतील प्रारूप मतदार यादीचे तात्काळ पुनर्परीक्षण करावे. ,मतदारांच्या तक्रारींसाठी विशेष हेल्पडेस्क किंवा तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात यावे ,ज्यांच्या नावे वगळली गेली आहेत अशा नागरिकांना नाव समाविष्ट करण्यासाठी अतिरिक्त संधी द्यावी,संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडून अंतर्गत चौकशी व जबाबदारी निश्चित करावी,तक्रारींवरील कारवाईबाबत लेखी अहवाल सार्वजनिक करावा. , दोषी कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात यावे ,न्याय्य व पारदर्शक निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने यावर तात्काळ कारवाई करून नागरिकांना न्याय द्यावा. अश्या मागण्याचे चे निवेदन देण्यात आले. निवेदन देतांना फ़िरोज़ अंसारी ,साकिब इकबाल ,मुहम्मद खालिद ,शाहिद इक़बाल ,मोहसिन राज ,मुहम्मद जावेद मंसूरी , मुहम्मद साबिर,सै रफीक ,फुरकान खान ,शेख नदीम ,अशफाक अली ,सोहेल खान ,मुनव्वर खान ,महेमुद खान,कलीम राज ,मिनाज अहेमद ,सै सलीम,तस्लीम अहेमद एमडीएफ चे संयोजक उपस्थित होते.

# मागील वीस वर्षापासून माथनी टिपेश्वर गट ग्रामपंचायत निवडणुकीविना ?



जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - तालुक्यातील पेसाअंतर्गत येणारी आदिवासी बहुल टीपेश्वर माथनी गटग्रामपंचायतमध्ये गेल्या 20 वर्षापासून ग्रामपंचायतची निवडणूक झाली नाही त्यामुळे माथनी,टिपेश्वर हे गाव विकासापासून कोसो दूर आहे. या दोन्हीगावच्या विकासाच्या दृष्टीने टीपेश्वर गट ग्रामपंचायतची निवडणूक व्हावी यासाठी वरील दोन्ही गावातील नागरिकांनी मा. जिल्हाधिकारी साहेब यवतमाळ यांना काल निवेदन दिले.

मागील कित्तेक वर्षांपासून येथे सरपंच आणि सदस्य नसल्याने वरील गावातील विकास कामे झाली नाही, गावातील शैक्षणिक, राजकीय आणि सामाजिक विकास थांबलेला आहे.वरील दोन्ही गावे हि आदिवासी बहुल असल्याने गावातील रस्ते पाणी, नाल्या, विदयुत, स्मशान भूमी यासारखी स्थानिक पातळीवरील कामे विकासापासून कोसो दूर आहे. त्यामुळे नागरिकांना जीवन जगने कठीण झाले आहे त्यामुळे गावाच्या विकासाकरिता येथील ग्रामपंचायतची निवडणूक लवकरात लवकर घेण्याची प्रक्रिया सुरु करावी अशा विनंतीचे निवेदन वरील दोन्ही गावातील नागरिकांनी मा. जिल्हाधिकारी यांना दिला आहे यावेळी निवेदन देतांना सामाजिक कार्यकर्ते श्री संदीपभाऊ कोवे यांच्या सह शेकडो गावकरी जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे उपस्थित होते.

## वेचक




### लांयगव्हण गावातील शेकडो महिलांसह नागरीक धडकले गटविकास अधिकारी रमेश खारोडे यांना दिले निवेदन

दिग्रस - लायगव्हाण गावातील संस्कृतिक सभागृहाला कुठलीही ग्राम सभेची परवानगी न घेता लावले ग्राम अधिकारी यांनी लॉक मांडवा गट ग्रामपंचायत अंतर्गत लायगव्हाण गावातील संस्कृतिक सभागृहाला कुठलीही ग्राम सभेची परवानगी न घेता ग्राम अधिकारी यांनी लॉक लावल्यामुळे संतप्त गावातील महिला सह नागरिक आपली तक्रार घेऊन गटविकास अधिकारी रमेश खारोडे यांना निवेदन देऊन सांस्कृतिक सभागृहांना चाबी ग्रामपंचायत अंतर्गत नेहमीसाठी सभागृह दरबार खुला ठेवावा मांडवा येथील एका व्यक्तीने संस्कृतीक सभागृह ग्रामपंचायत मांडवा लायगव्हाण सभागृहाची चावी ग्राम अधिकारी जवळ ठेवण्यात येईल असे एका व्यक्तीच्या म्हणण्यानुसार सभागृहाची चावी ठेवण्यात आली तर गावकऱ्यांना सभागृह मिळत नसल्यामुळे अडीअडचणीचा सामना सातत्याने करावा लागत आहे त्यासाठी आमच्या गावातील हक्काची सभागृह आम्हाला खुले करून द्यावे अन्यथा समस्त गावकरी ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण करीता सज्ज आहे असे निवेदन शेकडो महिला सह नागरिकांनी गटविकास अधिकारी रमेश जी खारोडे यांना आज देण्यात आले.

### कला, वाणिज्य महाविद्यालय राळेगाव येथे वाचन प्रेरणा दिवस



राळेगाव - भारताचे माजी राष्ट्रपती व शास्त्रज्ञ डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती दिनांक 15 ऑक्टोबर 2025 रोजी वाचन प्रेरणा दिन म्हणून कला, वाणिज्य महाविद्यालय राळेगाव येथे साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भास्करराव सावरकर यांचे मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रा. चैनसिंग राठोड, प्रा.विशाल वाघमारे व प्रा.भीमराव वाघमारे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ग्रंथपाल प्रा. सुरेश फुलकर यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. नारायण बुरबुरे व ग्रंथालय परिचर श्री. शंकर ढोरे यांनी परिश्रम घेतले.



### डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनानिमित्त भारतीय वृतपत्र विक्रेता दिवस म्हणून साजरा

यवतमाळ : आज दि. १५.१०.२५. बुधवार रोजी सकाळी ७.०० वाजता स्व. वसंतराव नाईक शेतकरी स्वालंबन मीशनच्या वाहनतळ पेपर वितरन सेंटरवर यवतमाळ जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्यानकारी संस्थां तर्फे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती दिना निमित्त हा वृतपत्र विक्रेता दिवस म्हणून साजरा करण्यात आले आहे. सर्व प्रथम डॉ ए पी जे अब्दुल कलाम तसेच माता सरस्वती यांच्या प्रतीमेला संस्थांचे अध्यक्ष अशोक शिंदे, सचिव किरण कोरडे, उपाध्यक्ष राजु हनवते, कोषाध्यक्ष श्रीराम खत्री, प्रसिद्धि प्रमुख सचिन कदम, रविंद्र चव्हाण, धमेंद्र मुणोत, मणिष अहीर, किशोर मालोकर, मोरेश्वर घुमडे, ललीत उन्नरकर, सुनिल बोरकर, मधुकर पत्ते, सजंय भगत, प्रभाकर बोरखडे, लक्ष्मणराव देशमुख, यांच्या हस्ते सामुहीक पुजा करून हारार्पण केले आहे. व्यासपिठावर प्रमुख पाहुणे डॉ. निरज वाघमारे, डॉ. पंकज पवार, संस्थाचे अध्यक्ष अशोक शिंदे, राज्य संघटनेचे उपाध्यक्ष संतोष शिरभाते, दै. लोकमतचे वितरन प्रमुख राजु कळसकर, रामापूरे सर, दै. पुण्यनगरीचे नंदकुमार गोगटे, दै. भास्करचे आसीफ शेख, प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर उपस्थित होते. संस्थेकडून डॉ. निरज वाघमारे, श्रीफळ आणि पुष्प देवून प्रमुख पाहुणेमंडळीच्या हस्ते सत्कार करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता संघटनेचे पदाधिकारी आणि सदस्यगन यांचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीराम खत्री यांनी केले.

# पैनगंगा नदीत अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळला पोलिसांकडून ओळख पटविण्याचे आवाहन

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - उमरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्राम तिवडी शेतशिवारातील पैनगंगा नदीच्या प्रवाहामध्ये आज सकाळी सुमारे 45 ते 50 वर्षे वयोगटातील एका अनोळखी पुरुष जातीचा मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, स्थानिक ग्रामस्थांनी नदीच्या काठावर तरंगताना एक मृतदेह पाहिल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर उमरखेड पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि पंचनामा करून मृतदेह नदीबाहेर काढण्यात आला. मृत व्यक्तीचा रंग गोरा असून अंगावर साधे कपडे परिधान केलेले आहेत.

अद्याप त्याची ओळख पटलेली नाही. पोलिसांनी या संदर्भात परिसरातील गावांमध्ये चौकशी सुरू केली असून, मयत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी सर्व नागरिकांना मदतीचे आवाहन करण्यात आले आहे. उमरखेड पोलिसांनी या घटनेची नोंद घेतली असून, अकस्मात मृत्यूची नोंद (AD) दाखल करण्यात आली आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

ओळख पटविण्यासाठी संपर्क क्रमांक : API – 7588427378, HC – 8830912876, सदर माहिती सर्वांनी आपल्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप्सवर शेअर करावी, अशी विनंती उमरखेड पोलिसांकडून करण्यात आली आहे, जेणेकरून मृत व्यक्तीची ओळख लवकर पटू शकेल.

# राळेगाव प्रधानमंत्री आवास योजना शहरी सरकारी जागेवरील पात्र लाभार्थी कुटुंबाची मोजणी सर्वेक्षण झालेली घरे नियमाकुल करण्याच्या प्रक्रियेला गती देऊन घरे बांधून द्या

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - केंद्र सरकारच्या 2022 पर्यंत सर्वांना घरकुल उद्देशाने नगरपंचायत राळेगाव कडून 2017 :18 मध्ये प्रकल्प एक स्वतःच्या मालकीचे घराचे कागदपत्र पूर्तता करणारे लाभार्थी कुटुंबे व प्रकल्प दोन सर्वसाधारणपणे सरकारी जागेवर अतिक्रमण करून राहणारे व इतर निकष पूर्ण करणारे पात्र लाभार्थी कुटुंबे नगरपंचायत कडून प्रकल्प एक प्रगतीत राहिला.

परंतु प्रकल्प दोन जवळपास एक हजार कुटुंबांना गेल्या सहा वर्षात शासनाला व नगरपंचायत ला एकही घरकुल बांधून देता आले नाही या योजनेतून गोरगरीब कुटुंबांना घरे बांधून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास संघर्ष समिती व लाभार्थी कुटुंबाकडून अनेक पातळी प्रयत्न करण्यात आले सहा महिन्यापूर्वी संघर्ष समितीकडून नगरपंचायत समोर धरणे आंदोलन यशस्वीपणे करण्यात आले होते त्याचाच परिणाम म्हणून नगरपंचायतने तालुका भूमि अभिलेख कडून जवळपास सातशे पन्नास कुटुंबांच्या घरांची मोजणी सर्वेक्षण केले होते व सहाय्यक संचालक नगर रचना विभाग यवतमाळला प्रस्ताव दाखल करण्यात आले होते या प्रस्तावात त्रुटी असल्याचे सांगितले जात होते.

या पार्श्वभूमीवर संघर्ष समितीचे सदस्य शंकर गायधने यांच्या पुढाकारात जिल्हाधिकारी यांना 200 लाभार्थी कुटुंबाची स्वाक्षरी असलेले निवेदन देण्यात आले याप्रसंगी भानुदास वामनराव महाजन खुशाल ढाले बेबी अशोक वानखडे वनिता अरुण मगर मंदाबाई कलांद्रे नानाजी सावरकर हरिदास ठाकरे आशाबाई चचाने वैशाली विनोद ठाकरे इत्यादी लाभार्थी उपस्थित होते. तर जिल्हा सहा आयुक्त नगरपरिषद प्रशासन अधिकारी यांच्यासोबत झालेल्या चर्चेत मुख्य अधिकारी नगरपंचायत राळेगाव यांनी सुधारित प्रस्ताव तीनच दिवसात सहाय्यक संचालक नगर रचना कार्यालय यांच्याकडे पाठविणार असल्याचे सांगितले आहे. या प्रक्रियेत वेळ काढू पणा झाल्या तर नगरपंचायत समोर उपोषण करणार असल्याचे संघर्ष समितीकडून निवेदनात म्हटले आहे.

# पुसद पंचायत समिती गणाचे आरक्षण सोडतीने जाहीर !

जनमाध्यम प्रतिनिधी




पुसद - पुसद तालुक्यातील जिल्हा परिषदच्या आठ गटाचे आरक्षण सोडतद्वारे यवतमाळ येथे जाहीर करण्यात आले. तर पंचायत समिती पुसदच्या १६ गणाचे आरक्षण पुसद येथे दि.१३ 13 ऑक्टोंबर रोजी सोडतद्वारे निश्चित करण्यात आले. आरक्षणामुळे अनेकांचे स्वप्न भंग झाले असुन कही खुशी कही गम अशी स्थिती तालुक्यात झालेली आहे.

जांबबाजार- सर्वसाधारण, श्रीरामपूर - नागरिकांचा मागास प्रवर्ग व शिळोणा सर्वसाधारण साठी निघाले आहे. पंचायत समितीच्या १६ गणामध्येही आश्चर्यकारक आरक्षण निघाल्यामुळे अनेकांच्या स्वप्नांवर पाणी फेरले आहे.

पुसद तालुक्यातील ८ जिल्हा परिषद मतदार संघ यवतमाळ येथे जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यातील ६२ गटाचे आरक्षण निश्चित झाले आहे. ३१ महिलांसाठी तर ३१ पुरुषांसाठी आरक्षण काढण्यात आले आहे. महिलांसाठी अनु. जाती-५, अनु. जमाती ७, नागरिकांचा मागास प्रवर्ग - ७ व सर्वसाधारण १२ असे एकूण ३१ महिलांसाठी गट राखीव ठेवण्यात आले आहे तर अनु. जाती-०२, अनु. जमाती- ०७, नागरिकांचा मागास प्रवर्ग - ०९ तर सर्वसाधारण १३ असे पुरुषांसाठी आरक्षित आहेत.

पुसद तालुक्यातील ८(आठ) गटांपैकी काकडदाती अनु. जाती महिला, शेंबाळपिंपरी अनु.जाती महिला, श्रीरामपूर नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, मधुकरनगर नागरिकांचा प्रवर्ग महिलासाठी राखीव आहे. बान्शी सर्वसाधारण महिला, शिळोणा व जांबबाजार-सर्वसाधारणसाठी आहे.

तालुक्यातील आठ गणांपैकी आठीही गण महिलांसाठी पुसद पंचायत समितीच्या १६ गणाचे आरक्षण सोडत जिजामाता कन्या शाळेत काढण्यात आले.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल, तहसिलदार महादेव जोरवर, नायब तहसिलदार खाडे, दिलीप कोलेवाड व संजय जोशी उपस्थित होते. एका चिमुकलीच्या हाताने चिठ्ठी उचलून आरक्षण सोडत काढण्यात आली. गणाचे आरक्षण पुढील प्रमाणे आहे. १०२-शेबाळपिंपरीः अनु. जाती महिला, ९०- भोजलाः अनु. जाती, १००-शिळोणाः अनु. जमाती, ९५ माणिकडोहः अनु. जमाती महिला, १०१ ईसापूरः अनु.जमाती महिला, ९९ हर्षीः नामाप्र महिला, ९६-श्रीरामपूर नामाप्र महिला, ८८ बान्शीः नामाप्र, ९३ रोहडाः नामाप्र, ९१-जांबबाजारः सर्वसाधारण महिला, ९२ लाखीः सर्वसाधारण महिला, ९८-बोरी खुः सर्वसाधारण महिला, ८९- मुंगशीः सर्वसाधारण, ९४- आडगांवः सर्वसाधारण, ८९ मधुकरनगरः सर्वसाधारण व ९७- काकडदातीः सर्वसाधारण साठी आहे.

मागील एक-दोन वर्षापासून अनेक ईच्छुक जि. प. व पं.स. निवडणुकीची तयारी करीत होते. परंतु अनेक ठिकाणी गट व गण महिलांसाठी राखीव झाल्यामुळेअनेक ईच्छुकांचे स्वप्न भंग झाले आहे.हे मात्र खरे.

# घाटंजीत जीएसटी मार्गदर्शन संमेलन संपन्न, तालुका व्यापारी संघटनेचा पुढाकार

जनमाध्यम प्रतिनिधी



घाटंजी - भारतीय जनता पार्टी घाटंजी शहर व ग्रामीण तालुका कार्यकारिणी तसेच जिल्हा कार्यकारिणी यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र सरकारने जारी केलेल्या जीएसटी रिटर्न संदर्भात व्यापारी संमेलन व मार्गदर्शन सभा नुकतीच घाटंजी येथील एल एस डी हॉल येथे संपन्न झाली.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. प्रविण प्रजापती यांनी उपस्थित व्यापाऱ्यांना नवीन जीएसटी कर प्रणाली बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सरकारने जारी केलेल्या नवीन जिएसटी प्रणालीबाबत व्यापारी वर्गआणि ग्राहकांना होणारे फायदे, भारतीय अर्थव्यवस्था कशी बळकट होईल हे स्पष्ट केले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष विजयभैया बैस, शहराध्यक्ष गजानन ढवळे, भाजपा व्यापारी आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर पंचोले, व्यापारी आघाडीचे तालुका अध्यक्ष गोपाल निलावार, पदवीधर आघाडीचे जिल्हाध्यक्ष संदीप माटे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष महेश जाधव,हे प्रामुख्याने उपस्थित होते. सदर सभेला तालुक्यातील व्यापारी वर्गाने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.सदर सभेच्या निमित्ताने तालुका व्यापारी आघाडीची कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आणि पदाधिकाऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले. या कार्यक्रमामुळे घाटंजी तालुक्यातील व्यापाऱ्यांमध्ये जिएसटी विषयक जागरूकता निर्माण झाल्याचे व्यापारी आघाडीचे तालुकाध्यक्ष गोपाल निलावार यांनी समाधान व्यक्त केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अचलपूर मतदारसंघात बनावट विदेशी दारूची विक्री जोमात

## मध्यप्रदेश सिमेतून होतो पुरवठा



**अचलपूर/वार्ताहर**
अचलपूर मतदारसंघात दारूबंदी विभागाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे बनावट विदेशी दारूची विक्री जोमात सुरू आहे. एकीकडे परतवाडा येथून मध्यप्रदेशची सीमा असल्याने विदेशी बनावट दारूचा पुरवठा मध्यप्रदेश सीमेतून होतो. पण दारूबंदी विभागाचे अधिकारी - कर्मचारी हे कधीही गस्तीवर नसल्याने अचलपूर मतदारसंघात होणाऱ्या बनावट विदेशी दारूच्या पुरवठ्यावर अंकुश कोण लावणार ? हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे .

अचलपूर-परतवाडा या शहरासह चांदूरबाजार, शिरसगाव, करजगाव, घाटलाडकी , ब्राह्मणवाडा थडी या विभागांमध्ये भैसदेही जिल्ह्याची सीमा वरील उल्लेख असलेल्या सर्व गावांमध्ये बनावट विदेशी दारूची आवक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या बनावट दारूमुळे राज्य शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल बुडीत आहे. याबाबत अनेक लायसन्स धारक यांनी तक्रारी केल्या आहे. पण याकडे अचलपूर दारु बंदी विभागाने जाणून-बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप शासकीय परवानाधारक दारू विक्रेत्यांकडून होत आहे.राज्य शासनाने विदेशी दारूच्या किमतीमध्ये नुकतीच प्रचंड वाढ केली आहे. याचा पुरवठा अचलपूर ,चांदूरबाजार तालुक्यात म्हणजे अचलपूर मतदारसंघात जागोजागी होत असल्याची माहिती समोर आलेली आहे.एकीकडे राज्यात विदेशी दारूच्या किमतीमध्ये वाढ आणि दुसरीकडे मध्य प्रदेशातून बनावट विदेशी दारूची किंमतीत तिप्पट फरक असल्यामुळे शंभर रुपयाची दारु ही तीनशे रुपये ग्राहकांकडून खरेदी केल्या जाते. यामुळे अचलपूर मतदार संघात विदेशी बनावट दारू विक्रीचा परवाना दारूबंदी विभागाने डोळे झाकून दिला आहे का? हाही प्रश्न समोर आलेला आहे. अचलपूर दारूबंदी विभागाच्या कार्यालयात दारूबंदी निरीक्षक, तीन निरीक्षक तसेच चार लिपीक असा ९ कर्मचाऱ्यांचा स्टाफ कार्यरत आहे.पण तक्रार करणाऱ्या नागरिकांना या कार्यालयात सदर अधिकारी- कर्मचाऱ्यांची अनुपस्थित तीच असल्याचे सांगितले जाते .या सर्व प्रकारामुळे अचलपूर शहरातील दारूबंदी विभागाचे कार्यालय हे फक्त शोभेची वस्तू बनलेली आहे आणि दुसरीकडे बनाव दारू विक्रीचा प्रकार खुलेआम सुरू आहे.या सर्व प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दखल घेतल्या जाणार का हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

## संक्षिप्त



### संत तुकडोजी महाराज यांना मौन श्रद्धांजली

**कुऱ्हा-**येथील हनुमान मंदिर पोलीस स्टेशन समोर वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना मौन श्रद्धांजली देण्यात आली.कार्यक्रमाचे औचित्य साधून गाडगे महाराज यांच्या दशसुत्रीला कर्मयोगी फाऊंडेशन कुऱ्हा येथील सचिव दिपक राऊत यांच्याकडून दिवाकर आखरे यांना तीन चाकी सायकल भेट म्हणून दिली. तसेच कार्यक्रमात दुपारी ४ वाजून ५८ मिनिटांनी सर्व कुऱ्हा गावातील बाल, वृध्द आणि प्रौढ व्यक्तींनी मौन श्रद्धांजली अर्पण करून आदरांजली वाहिलीकार्यक्रमाच्या सुरुवातीला साने गुरुजी यांच्या खरा तो एकचि धर्म ह्या प्रार्थनाने सुरुवात झाली. आणि कार्यक्रमाचा शेवट वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या राष्ट्र वंदनेने कार्यक्रमाची सांगता केली.यावेळी शालू लुटे,निशा दमाये,इंदिरा सपाटे, रेखा सपाटे,साहारे ,कल्पना पोकळे,आशा पोकळे, पुष्पा मेश्राम,निलेश आखरे,सुधाकर वैद्य, चंद्रकांत माहुले,पंकज दारोकार,शंकर खंगार,संजय कांबळे, ज्वला भीमरोत व नागेश लुटे उपस्थित होते.

### नेहरु मैदानावरील कचरा तात्काळ हटवा-जिल्हाधिकारी

**अमरावती-** अमरावती शहराच्या मध्यवर्ती भागातील नेहरु मैदान परिसरात मोठ्या प्रमाणात टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे निर्माण झालेल्या आरोग्य आणि पर्यावरणाच्या गंभीर समस्येवर जिल्हा प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशीष येरेकर यांनी आज तातडीचे आदेश जारी करून, या परिसरातील संपूर्ण कचरा फक्त ४८ तासांच्या आत उचलण्याचे निर्देश दिले आहेत.



### आंतरराष्ट्रीय बालिका दिन साजरा

**अमरावती-**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात आंतरराष्ट्रीय बालीका दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक व डॉ. किशोर राऊत यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली.अध्यक्षीय भाषणात डॉ. नायक यांनी बालिकांचे सामाजिक स्थान व सबलीकरणाच्या गरजा तसेच बालिका भविष्यातील सक्षम नागरिक आहे, तिच्या शिक्षण, आरोग्य व संधींच्या समानतेकडे समाजाने गांभीर्याने पाहिले पाहिजे, असे सांगितले. डॉ. किशोर राऊत यांनी समाजात बालिकेची भूमिका आणि आव्हाने या विषयावर आपले विचार मांडतांना बालिका ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर समाजाच्या विकासाची शिल्पकार आहे. तिच्या क्षमतेला योग्य दिशा दिल्यास राष्ट्र उभारी घेईल, असे सांगितले. यावेळी विभागातील विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. गायत्री खरबडे हिने स्वलिखित निबंधाचे वाचन केले, तर अन्य विद्यार्थिनींनी महिलांच्या आत्मनिर्भरतेबाबत आपले मत मांडले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन व विद्यापीठ गीताने झाली. सूत्रसंचालन डॉ. रोहिणी देशमुख, तर आभार प्रा. साधना इंगोले यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. प्रशांत भगत, प्रा. सुनिता इंगळे, संशोधक विद्यार्थी श्री रमेश पवार, विभागातील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



### बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पुढे न्या-विजयकुमार चौरपगार

**काटपूर-** देशातील बहुजन समाजाला न्याय समता प्रस्थापित करून देणारे एकमेव नेते म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर होत. आजही आंबेडकरांशिवाय दुसरा पर्याय असूच शकत नसल्याचे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार यांनी केले ते संबोधी बुद्ध विहार काटपुर (ममदापूर) येथे वर्षावासानिमित्त भारतीय बौद्ध महासभे द्वारा आयोजित महिला कार्यकारणी शाखा उद्घाटन तसेच वर्षावास सांगता समारोहा प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभा महिला शाखेचे उद्घाटनही राज्य संघटक विजयकुमार चौरपगार तसेच अमरावती जिल्हा महिला कार्यकारिणीच्या अध्यक्षा माया धांडे, सरचिटणीस विद्या वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा अमरावती जिल्हा पूर्वचे अध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर होते. तर विचार मंचावर भारतीय बौद्ध महासभेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम वंजारी, संघटक राजेंद्र भटकर, उपाध्यक्ष विलास आठवले, विजय वानखडे, केंद्रीय शिक्षिका मीना आठवले, अमरावती जिल्हा संघटिका राजर्षी मनोहरे, क्षितिजा वासनकर (मोर्शी ) इत्यादी मान्यवर विराजमान होते. याप्रसंगी माया धांडे, विद्या वानखडे, विलास आठवले, पुरुषोत्तम वंजारी, विजय वानखडे, राजेंद्र भटकर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करून भारतीय बौद्ध महासभेचे महत्त्व पटवून दिले.प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे जेष्ठ पदाधिकारी आणि पत्रकार प्रकाश इंगळे यांनी संचालन किरण इंगळे यांनी आभार पल्लवी मानकर हिने केले.

## सुकळी कंपोस्ट डेपोप्रकरणी विस्तृत उत्तर सादर करा

**अमरावती/का.प्र.**
सुकळी कंपोस्ट डेपोमुळे होत असलेल्या प्रदूषणासाठी राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) महापालिकेला ४७ कोटी रुपयांचा दंड ठोठावला. या दंडाला मनपाने सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. त्यानंतर सातत्याने सुनावण्या सुरू आहेतः परंतु मनपाला सुकळी कंपोस्ट डेपोवरील प्रदूषण कमी करण्यात फारसे यश आले नसल्याने सुप्रीम कोर्टाने सीपीसीबीला पक्षकार बनवून मनपाने सुकळी कंपोस्ट डेपो प्रकरणी वास्तविक माहिती असलेले तसेच विस्तृत उत्तर ४ नोव्हेंबर रोजी सादर करावे, असे निर्देश दिले आहे.

याप्रकरणी मनपाव्दारे सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राबाबत सुप्रीम कोर्ट समाधानी नसल्याचे यावरून दिसून येत आहे. याप्रकरणी सुप्रीम कोर्टाने मनपाला ठोठावण्यात आलेल्या ४७ कोटींच्या दंडातील काही रकमेतून तटस्थ एजन्सीची नियुक्ती करून विस्तृत अहवाल का मागवू नये, असा विचारही व्यक्त केला आहे. नुकत्याच झालेल्या सुनावणीत सुप्रीम कोर्टात न्या. पी. नरसिम्हा व न्या. अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठापुढे कंपोस्ट डेपो प्रकरणी आधी नियुक्त एमिकस क्युरी अधिवक्ता शिवानी घोष यांना संपूर्ण प्रकरणाची संक्षिप्त माहिती. सादर करण्यास सांगितले.

## रुपाली माथने यांना उमेदवारी मिळण्याकरीता देवीला साकडे

**अचलपूर/वार्ताहर**
अचलपूर नगर परिषदेमध्ये नगराध्यक्ष पदासाठी खुला प्रवर्ग महिलांची निवडणूकीचे वारे वाहू लागलेले आहे. यासाठी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत विजय संपादन करण्यासाठी विविध पक्षांकडून उमेदवारांची चाचणी सुरू आहे. पक्षाचे माजी नगरसेवक अभय माथने यांच्या धर्मपत्नी रुपाली माथने यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे.शहरातील प्रसिद्ध जगदंबा देवी मंदिराच्या परिसरात समर्थकांच्या वतीने भव्य दिव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. आणि भाजपा पक्षाच्या वतीने रुपाली अभय माथने यांना उमेदवारी द्यावी यासाठी जगदंबा देवीचे मंदिरामध्ये समर्थकांनी साकडे घातले.या महाआरतीमध्ये मोठ्या संख्येने समर्थक व नागरिक उपस्थित होते.



## महावितरणच्या पदभरतीमुळे परिमंडळात नवीन १८० विद्युत सहाय्यकाची नियुक्ती

**अमरावती/का.प्र.**
महावितरणच्या विद्युत सहाय्यकांच्या भरती प्रक्रियेत निवड झालेल्या १८० विद्युत सहाय्यकांची अमरावती परिमंडळात नियुक्ती करण्यात आली आहे.या नियुक्तीमुळे तरूणांना नोकरी आणि महावितरणाला अतीरिक्त मनुष्यबळ मिळाले आहे. याचा फायदा ग्राहक सेवा अधिक बळकट करण्यासाठी होणार असल्याचा विश्वास मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी व्यक्त केला आहे.



महावितरणकडून ५ हजार ३८१ पदासाठी जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये २० ते २२ मे ला विद्युत सहाय्यक या पदासाठी ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली होती.निवड चाचणी आणि कागदपत्राच्या तपासणीअंती निवड झालेल्या उमेदवाराची परिमंडळनिहाय पदस्थापना करण्यात आली आहे.अमरावती परिमंडळात १८० विद्युत सहाय्यक रूजू झाले असून ,यात अमरावती जिल्ह्यात ८८ आणि यवतमाळ जिल्ह्यात ९२ विद्युत सहाय्यकाचा समावेश आहे. शेकडो किलोमीटर पसरले महावितरणच्या वीज जाळ्याला नव्या रूजू झालेल्या विद्युत सहाय्यकांमुळे बळ मिळणार असून वीज पुरवठा व्यवस्थापन, ग्रामीण भागातील वीज जाळे दुरुस्ती, फॉल्ट निवारण आणि वीजपुरवठ्याची सातत्यता राखण्यासाठी या नव्या कर्मचाऱ्यांचा मोठा हातभार लागणार असल्याचे अधीक्षक अभियंता दिपक देवहाते म्हणाले.

'महावितरण परिवारात' सामील झालेल्या विद्युत सहाय्यकांचा महावितरणमध्ये स्वागत करण्यात आले,शिवाय दिवाळीपूर्वी मिळालेल्या या नियुक्त्यांमुळे त्यांच्या कुटुंबीयांमध्येही आनंदाचे वातावरण आहे.महावितरणच्या या पदभरतीमुळे केवळ रोजगार निर्मितीलाच चालना मिळालेली नाही, तर दर्जेदार व अखंडित वीजपुरवठ्यासाठी मनुष्यबळाची ताकदही अधिक वाढली आहे.

## गौरक्षण प्रभागवासियांची विकासकामांची स्वप्नपूर्ती

### आ.सुलभा खोडके यांच्या हस्ते भूमिपूजन



**अमरावती/का.प्र.**
आ.सुलभा खोडके यांनी २० लक्ष निधीतून अंबापेठ - गौरक्षण प्रभागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे व नालीचे बांधकाम करणे या विकासकामांच्या भूमिपूजन केले. सर्वप्रथम खोडके यांच्या हस्ते प्रभाग क्रमांक - १३ अंबापेठ येथील शिलांगण मार्ग स्थित प्रभात कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेवर पेव्हिंग ब्लॉक लावणे यासोबतच देशपांडे वाडी येथील नालीचे बांधकाम करणे या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी कुदळ मारीत भूमिपूजनाची औपचारीकता साधित त्यांनी विकासकामांच्या नामफलकाचे अनावरण केले. यावेळी अंबापेठ - गौरक्षण प्रभागातील नागरिकांनी आ. सुलभा खोडके व यश खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.याप्रसंगी स्थानिक नागरिकांनी केलेल्या स्वागत - सत्काराचा स्वीकार करीत आ. सुलभा खोडके यांनी हे कार्य सिद्धिस नेण्यासाठी आपणास लाभणारी सुजाण जनतेची अखंडित साथ ही माझ्यासाठी सदैव अविस्मरणीय असल्याचे सांगितले.याप्रसंगी अंबापेठ - गौरक्षण प्रभाग स्थित प्रभात कॉलनी - देशपांडे वाडी - नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## स्तनाशी संबधीत सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत

**अमरावती-**श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, शिवाजीनगर, पंचवटी चौक, मोर्शी रोड येथील सर्जरी विभाग व अमरावती सार्जिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ते ३१ ऑक्टोबर, २०२५ या दरम्यान स्तनाशी संबंधीत सर्व प्रकारचे आजारांवर (जसे गाठी व कॅन्सर) तज्ञ डॉक्टरांकडून मोफत व माफक दरात उपचार केल्या जातील. त्यामध्ये शस्त्रक्रिया मोफत करण्यात येतील व लागणा-या आवश्यक तपासण्या अतिशय अल्पदरात करण्यात येईल. रूग्णांची तपासणी डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालयाचे ओ.पी.डी. क्रमांक ०४ येथे सकाळी ०९ ते दुपारी ०१ वाजेपर्यंत केल्या जाईल.अमरावती जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील रूग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख, पदाधिकारी, सदस्य, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे तसेच सर्जरी विभाग प्रमुख व अमरावती सार्जिकल असोसिएशनचे पदाधिकारी यांनी केले आहे.




याबाबत जारी केलेल्या आदेशानुसार, शहरातील शिट नंबर ५५ ए, प्लॉट नंबर १/१ (नेहरु मैदान) या १३ हजार ६२७.८१ चौ. मी. क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात आहे. यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, साथीचे रोग पसरण्याची भीती नाकारता येत नाही.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेही (MPCB) या कचऱ्यामुळे प्रदूषण होत असल्याचे कळविल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ३० नुसार नेहरु मैदानावरील सर्व कचरा (केरकचरा) त्वरित उचलण्याचे निर्देश दिले आहे. कचरा उचलल्यानंतर त्वरित त्या ठिकाणी योग्य निर्जंतुकीकरण आणि स्वच्छता मोहीम राबवावी. कचरा उचलण्याची संपूर्ण प्रक्रिया पुढील ४८ तासांत पूर्ण करावी. यापुढे या परिसरात पुन्हा कचरा साठणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे.

## कल्पक किल्ले बनवा स्पर्धेचे सातत्यपूर्ण ३१वे वर्ष

## अमरावती येथे १७ ते १९ ऑक्टोबरपर्यत आयोजन

**अमरावती/का.प्र.**
श्री विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय, दस्तुर नगर सेवा समिती, विदर्भ मल्लखांब असोसिएशन, ,महाराष्ट्र राज्य विद्यार्थी कल्याण शिक्षक - पालक संघ व वचनप्रेमी संघ , राजापेठ स्पोर्टिंग क्लब व श्री गणेश मंदिर संस्थान,अंबिका नगर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने गत ३१ वर्षांपासून सातत्याने या कल्पक किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन केल्या जाते.

या स्पर्धेसाठी 'छत्रपती संभाजी गट' (वय ०५ ते १५); 'छत्रपती शिवाजी गट' (वय १६ ते वरील) असे २ विभाग केले आहेत.स्पर्धेचे नियम व अटी पुढीलप्रमाणे - १) विद्यार्थी गटात किल्ले बनवण्यासाठी प्रत्येकी ४ विद्यार्थी राहू शकतात. २) वयो मर्यादेनुसार स्पर्धेच्या ठिकाणी २ गट राहतील. ३) स्पर्धेच्या गटाकरिता एकच शाळा – कॉलेज किंवा परिसराचे स्पर्धक असणे बंधनकारक नाही. ३) आयोजकांकडून ५*५ फूट जागा तसेच माती व पाणी उपलब्ध करून दिल्या जाईल, अन्य किल्ल्याकरिता लागणारे साहित्य स्पर्धकांना आणावे लागेल. दि. १७ ऑक्टोबर रोजी सायं. ५:०० वाजता जागा वाटप केल्या जाईल, दि. १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ७:३० वाजता किल्ले बांधण्यास प्रारंभ होईल व १९ ऑक्टोबर रोजी ३:०० वाजेपर्यंत किल्ले पूर्ण करणे आवश्यक असेल. त्या नंतर ३:०० वाजता परीक्षण होऊन समारोपिय कार्यक्रम व बक्षीस वितरण कार्यक्रम होईल. स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन आयोजक सुनील ह.पांडे,शाम ढोले, विनोद वैद्य,सुनील भालेराव,विजय देवळे, प्रवीण कौडण्य,अमोल ठाकरे, सुनील देशमुख, सुधीर देशमुख, नंदू जोशी, दिनेश पांडे, राजाभाऊ गयाळ, हितेंद्र सिसोदिया ,मीनाक्षी भालेराव, सुजाता पांडे, ललिता ढोले, क्षमा वैद्य, आशा देशमुख यांनी केले आहे. स्थळ: म.न.पा. १६ नंबर शाळेच्या मैदानावर, श्री गणेश मंदिर संस्थान अंबिका नगर जवळ, कवर नगर, अमरावती. पुरस्कार: दोन्ही गटासाठी प्रथम पुरस्कार



२००१/- , द्वितीय पुरस्कार १२०१/- , तृतीय पुरस्कार ७०१/- प्रोत्साहन पुरस्कार ३०१/- राहतील. या शिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देवून गौरव करण्यात येईल.अधिक माहितीसाठी संपर्क-अनुराधा सुनील पांडे मो.९४०३३५५३३१;सुनील पांडे मो.९३७२७९१९४३;प्रथमेश सिंग मो.९६२३४१३३२२;रक्षित खानिवाले मो. ८७२६५६६९५२यांच्याशी संपर्क साधावा.

## अंजनगाव बारी परिसरातील ९० टक्के सोयाबीन बुडाले

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
परिसरात जवळपास २१ गावातील पाच हजार हेक्टर शेतजमिन सोयाबीन पिकाखाली होती. सुरुवातीला सोयाबीन पीक पोषक वातावरण व पावसात वाढल्याने शेतकरी राजा संतुष्ट होता. मात्र एकाएकी वरुण राजाने हजेरी लावल्यामुळे सोसाबीन ९० टक्के मातीमोल झाले. यातच उर्वरीत १० टक्के शेतक-यांनी सोयाबीन पिकाचा २० बॅगा, ३० बॅगा तर काहींनी ४० बॅगा सोयाबीन पेरले असून, लागलेल्या खर्चाच्या हिशोबाने आपल्याला चार पैसे तरी उरतील म्हणून सोयाबीन सोंगायला सुरवात केली. मात्र मुद्दल निघेल की नाही हे प्रश्नचिन्ह उभे आहे.



सोयाबीन सोंगण्याला एका बॅगीला ३ हजार रुपये खर्च येत असून तिच एक बॅग काढायला १ हजार आठशे रु. खर्च येतो. म्हणजे एका बॅगेला एकुण ४ हजार ८०० रुपये काढायला लागतात. सोयाबीनला बाजारभाव ३ हजार ७०० ते ३ हजार ९०० पर्यत आहे. जर या परिस्थीतीत कास्तकाराला एका बॅगला १ पोते सोयाबीन झाले तर शेतकरी आर्थिक दृष्टया संकटात येणार यात शंका नाही. विदर्भातील सोयाबीन पिकाची ही अवस्था गंभीर असल्याचे २०२५ सालची ही दिवाळी अंजनगाव बारी परिसरातील २१ गावातील शेतकऱ्यांसाठी अंधकारमय जाणार यात शंका नाही.

# प्रकाशोत्सवाची तयारी....





छाया -प्रदीप इंगोले

## यांच्याकडूनही खरेदी करा!

**दो**न दिवसांवर दिवाळी येऊन ठेपल्यामुळे समस्त बाजारपेठा रंगीबेरंगी तोरणांनी, निरनिराळ्या कंदिलांनी, सजावटीच्या साहित्यांनी सजल्या आहेत. शहरासारख्या ठिकाणी दुकानांपेक्षा रस्त्यावरील विक्रेत्यांकडून सजावटीचे साहित्य खरेदी करण्यालाच लोक पसंती देताना दिसत आहेत. या विक्रेत्यांच्या गर्दीत कुठेतरी कोपऱ्याला मातीच्या पणत्या, लक्ष्मीपूजनाला पुजली जाणारी फुलझाडू, नरकचतुर्दशीला फोडले जाणारे कारेटे असे थोडे थोडके साहित्य विकणाऱ्या ७०-८० वयाच्या वयस्क



बायका आणि पुरुष नक्कीच नजरेत पडतात. या वयातही त्यांची पोटासाठी मेहेनत करण्याची जिद्द पाहून कुणाच्याही डोळ्यात पाणी यावे. दिवसभर मेहेनत करून जेमतेम २००-३०० रुपयेही यांच्या पदरी पडत नसावेत. तरीही भीक मागण्यापेक्षा मेहनतीचे ४ पैसे कमवून कष्टाची भाकरी खाण्याची त्यांची वृत्ती बरेच काही शिकवून जाते. अशा वयस्कांकडून त्यांच्याकडील साहित्य अवश्य खरेदी करावे. त्यांनी थाटलेला छोटासा व्यवसाय त्यांना श्रीमंत बनवणारा नसला, तरी या धकाधकीच्या जीवनात त्यांना दोन वेळचे अन्न मिळवून देऊन जिवंत ठेवणारा नक्कीच असतो. अशांकडून खरेदी करताना भाव-तोल करू नका. त्यांनी सांगितलेल्या भावातच वस्तू खरेदी करा कारण आपण दिलेले अधिकचे २ रुपयेही त्यांना लाखमोलाची उभारी देत असतात.

**मोक्षदा घाणेकर**

## 'विमा' नसलेल्या सरकारी आश्वासनांची फसवणूक

**व**र्षानुवर्षे शेतकरी निसर्गाच्या लहरीपणाशी दोन हात करत आला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, त्याच्या पदरात नेहमीच निराशा पडते. अशा कठीण प्रसंगी त्याला आधार देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी पीक विमा योजना आणल्या. या योजना म्हणजे शेतकऱ्यांसाठी एक आर्थिक कवचकुंडले असावी, अशी अपेक्षा असते. मात्र, जेव्हा याच विमा योजनेतील सर्वात मोठा भाग म्हणजे शासनाने भरायचा विमा हप्ता वेळेत भरला जात नाही, तेव्हा शेतकऱ्याला दुहेरी फटका बसतो. ही केवळ तांत्रिक चूक नाही, तर कोट्यवधी शेतकऱ्यांच्या कष्टाची आणि विश्वासाची फसवणूक आहे.

पीक विमा योजनेत शेतकरी आपला किरकोळ हिस्सा भरतो, तर उर्वरित आणि मोठा हिस्सा केंद्र व राज्य सरकारे एकत्रितपणे अनुदान म्हणून विमा कंपन्यांना देतात. हाच अनुदान किंवा हप्ता वेळेवर भरणे हे शासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे. हा हप्ता जमा झाल्यावरच शेतकऱ्यांच्या पिकाला अधिकृतपणे 'विम्याचे कवच' मिळते. परंतु, अनेकदा सरकारी पातळीवर आवश्यक निधीची उपलब्धता असूनही, प्रशासकीय दिरंगाई, लालफीतशाही आणि उदासीनतेमुळे हा हप्ता विमा कंपन्यांपर्यंत पोहोचत नाही. परिणामी, शेतीत मोठे नुकसान झाल्यावर जेव्हा शेतकरी नुकसान भरपाईसाठी अर्ज करतो, तेव्हा त्याला 'तुमच्या पिकाचा हप्ताच पूर्ण भरलेला नाही' किंवा 'विमा पॉलिसी वैध नाही' असे उत्तर मिळते.



शासनाने विमा हप्ता न भरल्यामुळे शेतकऱ्यांच्या आयुष्यात अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. खरीप किंवा रब्बी हंगामात पिकाचे मोठे नुकसान झाल्यास, विमा कवच असूनही भरपाई मिळण्याचा मार्ग बंद होतो. विम्याची रक्कम न मिळाल्याने शेतकरी कर्जाच्या खाईत अधिक खोलवर जातो. त्याला नवीन पीक घेण्यासाठी पुन्हा सावकाराकडे किंवा बँकेकडे जावे लागते.शासनाने सुरू केलेल्या कोणत्याही योजनेवरील शेतकऱ्यांचा विश्वास उडतो. शेतकरी स्वतःच्या खिशातून हप्ता भरूनही, केवळ प्रशासनाच्या चुकीमुळे त्याला वंचित राहावे लागते.आर्थिक नुकसानीसोबतच, या फसवणुकीमुळे शेतकऱ्याचे मनोधैर्य खचते. यामुळे आत्महत्यांसारख्या टोकाच्या घटनांना प्रोत्साहन मिळते.

शासनाकडून हप्ता न भरला जाणे हे दुर्लक्ष आणि जबाबदारीच्या अभावाचे लक्षण आहे. ज्यांच्या जीवावर अर्थव्यवस्था चालते, त्या अन्नदात्याबद्दल सरकारमध्ये उदासीनता दिसत आहे.या समस्येवर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.विमा हप्त्यासाठी आवश्यक असलेला निधी प्रत्येक हंगामाच्या सुरुवातीलाच राखीव ठेवला जावा.कोणत्या शेतकऱ्याचा, कोणत्या पिकाचा आणि किती हप्ता भरला गेला आहे, याची माहिती ऑनलाइन डॅशबोर्डवर उपलब्ध असावी. विमा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जावी.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. तो आपले कर्तव्य अत्यंत निष्ठेने पार पाडतो. पण जेव्हा त्याच्या कल्याणासाठी बनवलेल्या योजनाच त्याच्या फसवणुकीचे कारण बनतात, तेव्हा ही गोष्ट केवळ दुर्दैवी नाही, तर लज्जास्पद आहे. शासनाने केवळ घोषणा न करता, विमा हप्त्यांचे व्यवहार अत्यंत गांभीर्याने घ्यावेत आणि ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना त्वरित नुकसान भरपाई देऊन या फसवणुकीचे प्रायश्चित्त करावे. शेतकऱ्याला आता आश्वासन नाही, तर न्याय हवा आहे.

**विरंद्र सोनवणे**
मो.८८८८२४८८३

## कमी वेळेत घर करा चकाचक!

**स**ण असो वा रोजची साफसफाई, घर स्वच्छ ठेवल्याने सकारात्मकता आणि उत्साह येतो. बाजारातील महागड्या उत्पादनांऐवजी, तुम्ही घरगुती आणि नैसर्गिक वस्तूंनीही कमी वेळेत प्रभावी स्वच्छता करू शकता. खालील काही सोप्या आणि जबरदस्त ट्रिक वापरून तुमचे घर नव्यासारखे चमकदार दिसेल.



स्वयंपाकघरातील ओटा सिंक आणि बाथरूमच्या टाईल्सवरील चिकटपणा काढण्यासाठी हे मिश्रण जादूचं काम करतं.लिंबू (थस्दह) आणि बेकिंग सोडा (ॅव्हु एर्द्): लिंबाचा रस आणि बेकिंग सोडा एकत्र करून जाडसर पेस्ट तयार करा. ही पेस्ट चिकट डागांवर किंवा गंजलेल्या नळांवर लावा. काही मिनिटांनी स्क्रब करून स्वच्छ पाण्याने धुवा. लिंबातील ॲसिड आणि सोड्यामुळे डाग लगेच निघून जातात. आल्याची पावडर, व्हिनेगर आणि बेकिंग सोडा एकत्र करून पेस्ट बनवा. यामुळे वॉश बेसिन आणि ड्रेनमधील चिकटपणा व हट्टी डाग सहज निघतात.

पंखे आणि खिडक्यांसाठी सोपे हॅक्स,पंख्याची धूळ आणि खिडक्यांचे काच साफ करणे हे सर्वात त्रासदायक काम असते,पंखा स्वच्छ करण्यासाठी 'पिलो कव्हर' हॅक: पंख्याचे प्रत्येक पाते एका जुन्या उशीच्या कव्हरमध्ये घाला आणि हळू हळू बाहेरून आतल्या बाजूला पुसा. यामुळे पंख्यावरील सर्व धूळ थेट कव्हरमध्ये जमा होईल आणि तुमच्या घरात खाली पडणार नाही,काचेसाठी व्हिनेगर स्प्रे: पाणी आणि व्हाईट व्हिनेगर सम प्रमाणात मिसळून स्प्रे बॉटलमध्ये भरा. हा स्प्रे खिडक्या आणि आरशांवर वापरा. मायक्रोफायबर कापडाने पुसल्यास काच लख्ख चमकते, फर्निचर आणि फरशीची चमक टिकवा.

फरशी पुसताना पाण्यात थोडे व्हिनेगर आणि डिटर्जंट मिसळा. यामुळे जमिनीवरचे डाग निघून जातात आणि फरशीला चांगली चमक येते.लाकडी फर्निचरसाठी तेल: लाकडी फर्निचर पुसण्यासाठी नारळाचे तेल किंवा ऑलिव्ह ऑइल आणि लिंबाच्या रसाचे मिश्रण वापरा. यामुळे लाकडी वस्तूंची नैसर्गिक चमक टिकून राहते.कारपेटसाठी शेव्हिंग क्रीम: कार्पेटवरील डाग काढण्यासाठी त्यावर शेव्हिंग क्रीम लावा आणि काही वेळाने कापडाने पुसून काढा.

वस्तू कमी करा -साफसफाईला सुरुवात करण्यापूर्वी घरात साचलेल्या अनावश्यक वस्तूंची विल्हेवाट लावा.

जुने सामान बाहेर काढा: तुटलेला आरसा, खराब झालेले बूट, न वापरलेले जुने कपडे, गंजलेल्या वस्तू आणि वापरात नसलेले जुने फर्निचर घराबाहेर काढून टाका. घरात पसारा कमी झाल्यास साफसफाईचे काम आपोआप सोपे होते आणि घरात सकारात्मक ऊर्जा येते.

कपडे आणि सामान व्यवस्थापन: वापरात नसलेले कपडे आणि इतर सामान दान करा किंवा त्यांची योग्य जागी मांडणी करा. यामुळे घर नेहमी व्यवस्थित आणि नेटके दिसते.

## ऑक्टोबरमध्ये जरूर खा या भाज्या..

**ऑ**क्टोबर महिन्यात थंडीची सुरुवात होत असल्याने या काळात रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि पचन सुधारण्यासाठी हंगामी भाज्या खाणे अत्यंत महत्त्वाचे असते. ऑक्टोबर महिन्यात खालील ६ भाज्या खाणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते आणि तुम्हाला थंडीच्या दिवसांसाठी तंदुरुस्त ठेवते.

गाजर ही ऑक्टोबरमध्ये बाजारात येणारी एक गोड आणि जीवनसत्त्वे समृद्ध असणारी भाजी आहे. पोषक घटक: हे व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन के आणि अँटीऑक्सिडंट्सचा उत्कृष्ट स्रोत आहे, विशेषतः बीटा-कॅरोटीन आरोग्य फायदे: डोळ्यांचे आरोग्य: व्हिटॅमिन 'ए' मुळे दृष्टी सुधारण्यास मदत होते. त्वचा आणि प्रतिकारशक्ती: हे त्वचेला निरोगी ठेवते आणि शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवते.



पत्ताकोबी- पचनासाठी खूप चांगली मानली जाते. पोषक घटक: यामध्ये व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के तसेच फायबर चांगले असते. आरोग्य फायदे: पचन सुधारते: फायबरमुळे पचनक्रिया सुरळीत राहते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत होते. बीट- बीट हे जमिनीखाली वाढणारे कंदमूळ असून, ते रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी ओळखले जाते.बीट रक्त शुद्ध करते आणि रक्ताभिसरण सुधारते. स्टॅमिना वाढवते: नायट्रेट्समुळे शरीराची ऊर्जा आणि स्टॅमिना वाढण्यास मदत होते. पालक -ऑक्टोबरपासून पालकाची उपलब्धता वाढते. पालक हे एक पौष्टिक शक्तीस्थान आहे. पोषक घटक: हे लोह , व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के तसेच कॅरोटीनचा (ॅंदूाहा) उत्तम स्रोत आहे. आरोग्य फायदे: ॲनिमियापासून संरक्षण: लोहामुळे शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. भोपळी मिरची - ढोबळी मिरची रंगीत भोपळी मिरची या काळात बाजारात उपलब्ध होते आणि ती रोगप्रतिकारशक्तीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. पोषक घटक: ही व्हिटॅमिन सी चा सर्वात मोठा स्रोत आहे. यात व्हिटॅमिन ए आणि बी६ देखील असते.

# भुकेविरुद्धचा लढा आणि शाश्वत अन्नसुरक्षा
# जागतिक अन्न दिनाचे सामाजिक भान

**द**रवर्षी १६ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक अन्न दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. १९४५ साली १६ ऑक्टोबर रोजी कॅनडा येथील क्वेबेक सिटी येथे ४२ देशांच्या प्रतिनिधींनी संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेची (Food and Agriculture Organization – FAO) स्थापना केली. त्यामुळेच हा दिवस 'जागतिक अन्न दिन' म्हणून साजरा केला जातो.' जागतिक अन्न दिन हा केवळ एका संस्थेचा वर्धापनदिन नसून तो जगाच्या सर्वात मोठ्या आणि गंभीर समस्यांपैकी एक असलेल्या भूक, कुपोषण, दारिद्र्य आणि अन्न वितरणातील असमानता या विषयांवरील सामाजिक जागृतीचा दिवस आहे. या दिनाचे मूळ उद्दिष्ट म्हणजे जगातील प्रत्येक व्यक्तीला पौष्टिक, सुरक्षित आणि पुरेसे अन्न मिळावे यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक स्तरावर प्रयत्नांना चालना देणे हे आहे.

आजच्या घडीला जगात अन्न उत्पादन वाढले असले तरी भूक आणि कुपोषणाची समस्या चिंताजनक स्वरूपात कायम आहे. FAO च्या The State of Food Security and Nutrition in the Worl (SOFI) २०२५ या अहवालानुसार, २०२४ साली जगभर सुमारे ६३८ ते ७२० दशलक्ष लोकांना (म्हणजेच अंदाजे ६३ ते ७२ कोटी लोकांना) पुरेसे अन्न मिळत नाही. तसेच सुमारे २ अब्ज लोकांना पौष्टिक आणि सुरक्षित अन्नाची कमतरता भासते, तर जागतिक लोकसंख्येपैकी सुमारे ८.२ टक्के लोक अजूनही भुकेशी झगडत आहेत. FAO आणि `orld Food Programme (WFP) च्या संयुक्त अहवालानुसार, वाढती अन्नमूल्यवाढ, हवामान बदल, सशस्त्र संघर्ष, आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील असमानता यांमुळे अनेक देशांतील अन्नसुरक्षेवर गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर 'जागतिक अन्न दिन' दरवर्षी विविध विषयांवर जनजागृती निर्माण करतो. २०२५ साली या दिनाची अधिकृत थीम FAO ने 'Hand in Hand for Better Foods and a Better Future' अशी निश्चित केली आहे. या थीमद्वारे जगभरातील देश, संस्था आणि व्यक्तींनी एकत्र येऊन अधिक पौष्टिक, टिकाऊ आणि समतामूलक अन्नव्यवस्था उभी करावी, असा संदेश देण्यात आला आहे.अन्न हे मानवाच्या अस्तित्वाचे मूळ तत्त्व आहे. परंतु आज जगात अन्नाची निर्मिती, साठवण, वितरण आणि उपभोग या सर्व प्रक्रियांमध्ये प्रचंड असमानता आहे. विकसित देशांमध्ये अन्नाची नासाडी तर



विकसनशील देशांमध्ये भुकेची तीव्रता दिसून येते.

भारतासारख्या कृषीप्रधान देशात अन्नउत्पादनाचा भव्य इतिहास असूनही भुकेचा शाप अजूनही लाखो लोकांच्या जीवनाला वेढून बसलेला आहे. यावर उपाय म्हणून 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना', 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३' (NFS), आणि 'मिड-डे मील योजना'सारख्या उपक्रमांनी काही प्रमाणात दिलासा दिला असला, तरीही त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज तीव्रतेने जाणवते. अन्नसुरक्षा केवळ धान्य वितरणाच्या मर्यादेत न पाहता ती पोषण, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण या सर्व अंगांनी समजून घेणे आवश्यक आहे. कारण भूक ही मानवी विकासातील सर्वात मोठी अडथळा आहे, आणि जोपर्यंत प्रत्येक भारतीयाला पुरेसे, सुरक्षित आणि पौष्टिक अन्न मिळणार नाही, तोपर्यंत 'विकसित भारत' हे स्वप्न अपूर्णच राहील.

भारतामध्ये आज अन्नधान्याचे उत्पादन वाढले असले तरी त्याचे समान वितरण आणि साठवणूक व्यवस्थापन हे अद्यापही आव्हानात्मक आहे. दरवर्षी लाखो टन धान्य अयोग्य साठवणुकीमुळे वाया जाते. भारतीय अन्न महामंडळ (FCI) च्या अहवालानुसार, सुमारे १० टक्के पर्यंत धान्य उंदीर, आर्द्रता आणि साठवणूक अभावामुळे नष्ट होऊ शकते. ही अन्ननासाडी टाळण्यासाठी आधुनिक शीतगृह आणि शेतकरी उत्पादक कंपनींचे जाळे मजबूत करणे गरजेचे आहे. भुकेचा प्रश्न हा फक्त 'अन्न नसल्याचा' नाही तर 'अन्नाचा गैरवाटप' आणि 'अन्नविषयक धोरणांची असमान अंमलबजावणी' यांचाही आहे. शहरी आणि ग्रामीण, श्रीमंत आणि गरीब, पुरुष आणि महिला यांच्यातील अन्नसुरक्षेतील अंतर कमी करणे हा सर्वात मोठा सामाजिक उद्देश असायला हवा.

जागतिक अन्न दिन हा केवळ उत्सव नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण किती अन्न वाचवतो, किती नासवतो, आणि किती वाटतो याचा विचार करण्याचा दिवस आहे. आपण 'अन्न दान' आणि 'अन्न संवर्धन' या दोन्ही संकल्पना जीवनात उतरविल्या तरच जागतिक भूकमुक्तीचा स्वप्न साकार होईल. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक शासन यंत्रणा यांनी अन्नबचतीबाबत जनजागृती मोहिमा राबवाव्यात. अन्न हे जीवन आहे, अन्न हे आरोग्य आहे, आणि अन्न हे मानवतेचे प्रतीक आहे. म्हणूनच, 'अन्नाचा सन्मान करा, अन्नाची नासाडी टाळा आणि अन्नाचे समान वाटप करा' हा संदेश प्रत्येक नागरिकाच्या कृतीतून प्रतिबिंबित झाला पाहिजे. भविष्यातील पिढ्यांसाठी शाश्वत आणि समतामूलक अन्नव्यवस्था उभी करण्यासाठी आज आपण पावले उचलली पाहिजेत. भुकेविरुद्धचा हा लढा केवळ शासनाचा नाही, तर प्रत्येक मानवाचा आहे. कारण भूक कोणालाही विचारत नाही, ती फक्त जाणवते, आणि त्या जाणिवेतूनच जागतिक अन्न दिनाचा खरा अर्थ प्रकट होतो.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# बांधकाम कामगारांचा अकोल्यात एल्गार!

## दिवाळी बोनस व ‘अटल आवास’ घरकुल योजनेसह विविध मागण्यांसाठी केले धरणे आंदोलन

### प्रशासनाच्या ‘वेळकाढूपणा’ भूमिकेमुळे कामगार संतप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या प्रशासनाच्या वेळकाढूपणा धोरणामुळे संतप्त झालेल्या बांधकाम कामगारांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी आज बुधवार, दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ, जिल्हा कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन केले.

दिवाळीपूर्वी ५,००० रुपये बोनस, ‘अटल बांधकाम आवास’ घरकुल योजना त्वरित लागू करणे, तसेच स्थगित केलेल्या कल्याणकारी योजना पुन्हा सुरू करणे, या प्रमुख मागण्यांसाठी कामगारांनी एल्गार पुकारला. सकाळी ११ वाजल्यापासून इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ, जिल्हा कार्यालयासमोर हे आंदोलन सुरू झाले. यामध्ये बिल्डींग पेंटर बांधकाम व इतर असंघटीत मजूर संघ (ट्रेड युनियन), महाराष्ट्र बांधकाम संघटना स्वतंत्र कृती समिती, विदर्भ प्रदेश असंघटीत मजूर संघ आणि जनजागृती असंघटीत बांधकाम मजूर संघटना या संघटनांनी संयुक्तपणे सहभाग घेतला होता.



**प्रमुख मागण्या आणि कामगारांचा रोषः दिवाळी बोनसः** मागील वर्षी तात्कालीन कामगार मंत्र्यांनी दिवाळी बोनस जाहीर करूनही तो अद्याप देण्यात आलेला नाही. मंडळाने तातडीने ५,००० रुपये दिवाळी बोनस द्यावा, जेणेकरून लाखो बांधकाम कामगारांना इतर कामगारांप्रमाणे दिवाळी साजरी करता येईल. गरीब कष्टकऱ्यांना लाभ देण्यासाठी जिल्ह्यात अटल बांधकाम आवास घरकुल योजना तात्काळ राबवून कामगारांना ५ लाख रुपयांचे अनुदान त्वरित देण्यात यावे. शासनाने स्थगित केलेल्या सर्व २८ कल्याणकारी योजना पुन्हा सुरू कराव्यात. सर्व असंघटित बांधकाम कामगारांना राज्य कामगार विमा (ईएसआयसी) योजना लागू करावी आणि कामाचे तास १२ वरून पुन्हा ८ तास करण्यात यावेत. कोणताही लाभ वस्तू स्वरूपात न देता थेट कामगारांच्या बँक खात्यात (DBT) जमा करावा. ६० वर्षे पूर्ण झालेल्या कामगारांसाठी निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना तातडीने सुरू करावी. गंभीर आजारांसाठी १ लाख रुपये अर्थसहाय्य तसेच नोंदणी व नूतनीकरणाचे अर्ज तात्काळ निकाली काढण्यात यावेत. या आंदोलनाचे नेतृत्व संघटनेचे अध्यक्ष प्रशांत मेश्राम, उपाध्यक्ष विनोद बावसकर , महासचिव मनोज बाविस्कर, अध्यक्ष आत्माराम साठे, संघटक सुरेश कारंडे आणि प्रसिद्ध प्रमुख गणेश सावळे यांनी केले. याप्रसंगी राज्य संघटक नितीन वाकोडे, वाशिम जिल्हा अध्यक्ष अजमत खान, गणेश राठोड, सत्यदेव तायडे, रावणाखाली मिरली, शरबुद्दीन काजी, संतोष गवई, संदीप साळवे, सचिन खराटे, सुनील शिवकार, नागेश नेमाडे, मंगेश शिंदे यांच्यासह शेकडो कामगार उपस्थित होते. कामगारांच्या या एल्गारामुळे जिल्हा प्रशासनावर त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी दबाव वाढला आहे.

# आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त डॉ. कल्याणी गादीया गोवा येथील कॉन्फरन्स मध्ये सन्मानित

■ प्रतिनिधी | अकोला ■

येथील शिशू नेत्रतज्ञ, तिरळेपणा तज्ञ आणि फेको सर्जन आणि येथील आय आरोग्य सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. कल्याणी सौरभ गादीया यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला म्हणून गोवा येथे आयोजित महाराष्ट्र ऑफ्थॅलमोलॉजिकल सोसायटीच्या कॉन्फरन्स मध्ये सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र ऑफ्थॅलमोलॉजिकल सोसायटीचे अध्यक्ष आणि अकोला प्रख्यात नेत्रतज्ञ डॉ. शिरीष थोरात यांचे हस्ते आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. कल्याणी गादीया यांना सन्मानित करण्यात आले. आशिया पॅसिफिक ॲकेडमी ऑफ ऑफ्थॅलमोलॉजी आणि ऑल इंडिया ऑफ्थॅलमोलॉजिकल सोसायटीच्या दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स मध्ये डॉ. कल्याणी गादीया यांनी तिरळेपणा ( स्क्विंट) या विषयावर सादर केलेल्या शोध निबंधाला सर्वोत्कृष्ट शोध निबंध म्हणून इंटरनॅशनल हीरो पुरस्कार प्राप्त झाला होता. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये पुरस्कार प्राप्त नेत्रतज्ज्ञांना महाराष्ट्र ऑफ्थॅलमोलॉजिकल सोसायटीच्या कॉन्फरन्स मध्ये सन्मानित करण्यात येते.



याशिवाय अमृतसर येथे संपन्न झालेल्या ऑल इंडिया ऑफ्थॅलमोलॉजिकल सोसायटीच्या अर्ध वार्षिक कॉन्फरन्समध्ये डॉ. कल्याणी गादीया यांनी शिशू नेत्ररोग आणि तिरळेपणा या विषयावर सादर केलेल्या पोस्टरला सर्वोत्कृष्ट पोस्टर म्हणून पुरस्कार मिळाला होता. याच कॉन्फरन्समध्ये डॉ. कल्याणी गादीया यांनी ’ डबल सेरोनिगेटीव्ह मायेस्थेनिया ग्रावीस इन चिल्ड्रेन ’ या विषयावर शोध निबंध देखील सादर केला. या यशाबद्दल डॉ. कल्याणी गादीया यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# दिवाळी बोनससाठी कामगार विभागाकडे काँग्रेसकडून निवेदन



■ प्रतिनिधी | अकोला ■

असंगठित कामगार विभाग कर्मचारी काँग्रेस तर्फे दिवाळीचा बोनस म्हणून पाच हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात संघटनेचे शहराध्यक्ष सुनील वानखडे यांनी कामगार कल्याणकारी मंडळ, अकोला येथील सहायक आयुक्त यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, दिवाळी सणानिमित्त असंघटित कामगारांना आर्थिक मदत म्हणून पाच हजार रुपयांचा बोनस देण्यात यावा. तसेच प्रत्येक कामगाराची माहिती – आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक – संकलित करून योजना जलद राबविण्यात यावी. लाभार्थ्यांना आरोग्य योजना देखील सुरू करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागचे उपाध्यक्ष महेंद्र गवई, काँग्रेस कामगार विभागाचे अध्यक्ष सुनील वानखडे, मुकींदा अंजनकर, अजय उपरवट, प्रमोद गवई व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘प्रभात’ च्या विद्यार्थ्यांनी खाऊच्या पैशातून जमविलेला पुरग्रस्त निधी प्रशंसनीय - जिल्हाधिकारी

- विद्यार्थी संसदेचा पुढाकार
- दीड लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री निधीसाठी सुपूर्द

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रभात किड्स स्कूल अकोलाच्या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री पुरग्रस्त निधीसाठी १.५ लक्ष रुपयांचा निधी गोळा करून तो धनादेश आज दि. १५ ऑक्टोबर रोजी अकोल्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मीणा (भा.प्र.से.) यांचे सुपूर्द केला आहे. ‘प्रभात’ विद्यार्थी संसदेच्या प्रतिनिधी या प्रकल्पामध्ये पुढाकार घेतला होता. प्रकल्प प्रमुख कु. अपूर्वा मिटकरी हिच्या पुढाकारात विद्यार्थी संसदेच्या सर्व सदस्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना आवाहन केले होते तसेच पालकांना विनंती पत्र पाठवले आणि पालकांकडून गोळा केलेल्या निधीचा धनादेश प्रत्यक्ष जाऊन जिल्हाधिकारी महोदयांना देण्यात आला. काही विद्यार्थ्यांनी आपल्या खाऊच्या गुल्लक मधून निधी दिला तर, कुणी आपल्या पॉकेट मनी मधून यासाठी निधी दिला असे प्रकल्प प्रमुख अपूर्वा मिटकरी हिने सांगितले. विद्यार्थी संसदेची विद्यार्थिनी प्रमुख गार्गी गरकल हिने निधी गोळा करण्याची संपूर्ण प्रक्रिया जिल्हाधिकार्यांना सांगितली तर, त्याविषयी विस्तृत माहिती प्रकल्प प्रमुख अपूर्वा मिटकरी हिने दिली. जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मीणा यांनी विद्यार्थ्यांच्या या पुढाकाराचे कौतुक केले आणि या मानवतावादी दृष्टीकोनाच्या प्रकल्पासाठी योगदान देणार्या प्रत्येक विद्यार्थ्याला दाद दिली. या प्रकल्पाचे मार्गदर्शक प्रशांत होळकर व नंदकिशोर डंबाळे यांच्यासह विद्यार्थी संसदेचे अपूर्वा मिटकरी, रैवत देशपांडे, गार्गी गरकल, प्रणील नावकार, मधुरा वाघ, अलंकार डंबाळे, ओजस्वी पुरी, हंसिका तहलरामानी, वीर जयस्वाल, रेणुका रहाटे, आदर्श दलाल, अनुष्का टकरानी, अथर्व आखरे, शाश्वत महल्ले, शर्वरी गरकल, गार्गी गावंडे, अनुष्का मेंढे, स्वर्णीमा घुले, पार्थ देशमुख, सुज्वल चव्हाण, शौर्य जयताडे, प्रिया बंदीवान या विद्यार्थ्यांची याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थिती होती. प्रभातच्या बालगोपालांचे ह्या प्रकल्पासाठी सर्व स्तरावरुन कौतुक होत आहे.



# अवाजवी भाडे आकारल्यास बसमालकांवर कारवाई करणार

### परिवहन विभागाची मोहिम

■ प्रतिनिधी | अकोला ■

दिवाळी सणाला गावी जाणा-या प्रवाश्यांची गर्दी पाहून अवाजवी भाडे आकारणा-या खासगी बसमालकांवर कारवाईसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने मोहिम हाती घेतली आहे. दिवाळी सणानिमित्त बऱ्याच प्रमाणात नागरिक आपल्या कुटुंबियांना भेटण्यासाठी आणि सणानिमित्त आपल्या गावी जाण्यासाठी खासगी मोटारींनी प्रवास करीत असतात. अशावेळी खासगी प्रवाशी बस ऑपरेटर आणि ऑनलाईन तिकिट बुकिंगवाले यांच्याकडुन तिकीट दरांमध्ये वाढ केली जाते. यामुळे नागरिकांचे आर्थिक शोषण तर होतेच परंतु ज्या नागरिकांना अशा वाढीव दरांमुळे प्रवास परवडत नाही व त्यांची गैरसोय होते असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कार्यालयाची ही मोहिम दि. ३ नोव्हेंबरपर्यंत राबविण्यात येत असून, खासगी प्रवासी बसगाड्यांची तपासणी व भाडे आकारणी आदी बाबी तपासण्यात येणार आहेत.

खासगी बसचालकांनी शासन निर्णयानुसार आपल्या बसचे भाडे हे राज्य परिवहन बस भाड्यापेक्षा १.५ पटीपेक्षा अधिक आकारु नये. तपासणीमध्ये असे आढळून आल्यास कारवाई करण्यात येईल. वाहनांची सखोल तपासणी करण्यात येऊन मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत असलेल्या नियमानुसार वाहनावर कडक कारवाई करण्यात येईल याची सर्व खाजगी बस संचालक यांनी नोंद घ्यावी.

सणासुदीच्या काळात शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे खासगी बसचे भाडे हे राज्य मार्ग परिवहन बसच्या १.५ पट पर्यंत वाढवण्याची बस मालकांना परवानगी आहे .परंतु कुणी खासगी बस ऑपरेटर प्रवाशांकडुन राज्य परिवहन बसच्या भाड्याच्या १.५ पटीपेक्षा अधिक भाडे घेत असेल तर प्रवाशांकडुन जेवढे भाडे घेतले असेल तेवढ्या रकमेच्या तिकीटाची प्रवाशांनी मागणी करावी. त्याआधारे परिवहन कार्यालयाच्या ई-मेल आयडी dyrto.30-mh@gov.in यावर तक्रार करता येईल. अशा खाजगी बसेसवर मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार कारवाई करण्यात येईल.

# व्यसनमुक्तीसाठी आरोग्य विभागाची जनजागृती मोहिम

**अकोला :** आपत्तीकाळात मानसिक आरोग्य सेवांची उपलब्धता, व्यसनमुक्ती याबाबत आरोग्य विभागातर्फे पुढील महिनाभर जनजागृती मोहिम हाती घेण्यात आली आहे. जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसिक आरोग्य सेवा उपलब्धता व तंबाखू मुक्त युवा अभियानाचा शुभारंभ सीताबाई कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात नुकताच झाला.

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक :- १५/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, अकोला तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामेचही करतात अशा व्यक्तींनी अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी (इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय ज्ञानेश्वर नगर, गल्ली क्रमांक ४ डाबकी रोड, अकोला ता.जि. अकोला येथे दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती.

**(जितेंद्र देशकर सरदार)**

**जाहीर नोटीस**

**वि. ०२रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८१५/२०२५ प्रोसेस नं. १७२९४/२०२५
चौ.ता. २१/११/२०२५ दिनांक : १३/१०/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती मिराबाई राजकुमार जेठानी २. मनोज राजकुमार जेठानी ३. मयुर राजकुमार जेठानी ४. नितीनकुमार राजकुमार जेठानी सर्व रा. सिंधी हिंदी शाळेजवळ, पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला, ता. जि. अकोला. ५. सौ. काजल संजयकुमार मेघानी रा. गुरूनानक नगर, सिंधी कॅम्प, मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर जि. अकोला. ६. सौ. किरण सनी पंजवानी रा. आदर्श कॉलनी, सुभाष नगर, बुऱ्हानपूर. एम. पी.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजकुमार तोतलदास जेठानी
**पत्ता :-** रा. सिंधी हिंदी शाळेजवळ, पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजकुमार तोतलदास जेठानी यांचे दि. ०५/०२/२०२४ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१ / ११ / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात

एम.जे.सी.नं.१७४३/२०२५ प्रोसेस नं. १५७९२/२०२५
चौ.ता.: ०३/११/२०२५ दिनांक: १९/०९/२०२५


अर्जदार:- १) मानसी प्रसाद कानिटकर लग्नानंतरचे स्वप्ना सुरेश केतकर लग्नाआधीचे,
पत्ता- संत तुकाराम हॉस्पिटल जवळ, गौरक्षण रोड, अकोला ता.जि. अकोला
२) सागर सुरेश केतकर, रा. जठारपेठ, पोलीस चौकी जवळ, विजय ड्रायक्लिनर जवळ, तापडीया नगर, अकोला ता. जि. अकोला
गैरअर्जदार:- निल.
मयताचा पत्ता:- मयत:- सरोज सुरेश केतकर
पत्ता:- रा. जठारपेठ, पोलीस चौकी जवळ, विजय ड्रायक्लिनर जवळ, तापडीया नगर,अकोला ता.जि.अकोला

**या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सरोज सुरेश केतकर यांचे दि.२६/०२/२०२५ रोजी रेनबो लाईफ हॉस्पिटल, ठाणे येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात्येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०९/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का
आदेशानुसार,
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला

# तलाठी - सचिव निलंबित; मात्र कृषी सहायकाला अभय?

## पातुरच्या उमरा परिसरात सर्वेक्षणात घोळ प्रकरण




■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील उमरा परिसरात पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात आर्थिक व्यवहार करून घोळ करणाऱ्या सर्वेक्षण पथकातील तलाठी व सचिव यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली, मात्र कृषी सहायक यांना संबंधित अधिकाऱ्याकडून अभय दिले जात आहे की काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पीक नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी तहसीलदारांनी तलाठी, सचिव, कृषी सहायक या तिघांची समिती गठित केली होती. आणि या समितीकडून उमरा परिसरात पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात घोळ करून अनेक शेतकऱ्यांना लाभांपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप ग्राम पंचायतसह शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीतून केला होता. सदर तक्रारीवरून तहसीलदारांनी १२ सप्टेंबर रोजी तलाठी, सचिव, कृषी सहायक यांच्यावर निलंबनाची कारवाईसाठी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अहवाल पाठविला होता. तहसीलदारांच्या अहवालावरून बाळापूरचे उपविभागीय अधिकारी निखिल खेमनर यांनी तलाठी एस. पी. लठाड यांना १७ सप्टेंबर रोजी निलंबित केले, तसेच सचिव जे. पी. तायडे यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ६ ऑक्टोबर रोजी निलंबित केले, परंतु पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात घोळ करणाऱ्या समितीतील तिघे जबाबदार असताना तलाठी, सचिव यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली, मात्र कृषी सहायकावर कुठल्याही प्रकारची कारवाई न झाल्याने संबंधित अधिकारी कृषी सहायकावर मेहरबान असून त्यांना अभय दिले जात असल्याचा आरोप होत नागरिकांकडून केल्या जात आहे.

### तहसीलदारांचा अहवाल कृषी विभागात धुळखात !

पीक नुकसानीचा सर्वेक्षण करण्यासाठी तहसीलदारांनी तलाठी ,सचिव कृषी सहायक असे तिघांची समिती गठीत केली होती. सर्वेक्षणात घोळ करणाऱ्या जबाबदार असलेले तिघांपैकी तलाठी ,सचिव यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली, मात्र कृषी सहायक यांच्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई न झाल्याने तहसीलदारांचा अहवाल कृषी विभागात धुळखात पडला असल्याची चर्चा रंगली आहे.

**अकोला :** माहेश्वरी ज्येष्ठ नागरिक प्रकोष्ठच्या वतीने महेश भवन येथे क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यात अनेक नागरिकांनी सहभाग घेतला. प्रकोष्ठचे अध्यक्ष सुरेश माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेत संपन्न या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून अमरावती येथील अनिल राठी होते.

**चौकशीची जाहिर नोटीस**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- १०६ / २०२५ कलम १९
**सार्वजनिक न्यासाचे नाव -** श्री. गजानन महिला भजन मंडळ अडगाव बु. ता. तेल्हारा जि. अकोला
**अर्जदार :-** गोदावरी गणेश इंगळे रा. अडगाव बु. ता. तेल्हारा जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**अ) जंगम मिळकत ( वर्णन)** :- रुपये १०००/- अध्यक्षांच्या ताब्यात आहे.
**आ) स्थावर मिळकत ( वर्णन ) :-** काही नाही.

सदरच्या चौकशी’ प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १९/०९/२०२५ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८३९/२०२५ प्रोसेस नं.१६९८१/२०२५
चौ.ता. २४/११/२०२५ दिनांक : ०८/१०/२०२५

**अर्जदार :** १. दिनेश नारायण गुजराथी २. गोपाल नारायण गुजराथी दोघेही रा. उगवा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नारायण विश्वनाथ पटेल (गुजराथी)
**पत्ता :-** रा. उगवा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नारायण विश्वनाथ पटेल (गुजराथी) यांचे दि. १७/०९/१९७४ रोजी राहत्या घरी उगवा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८४५/२०२५ प्रोसेस नं.१६९८२/२०२५
चौ.ता. २४/११/२०२५ दिनांक : ०८/१०/२०२५

**अर्जदार :** १. पार्वताबाई रामभाउ फुकट २. संजय रामभाउ फुकट ३. सतिश रामभाउ फुकट सर्व रा. वार्ड क्र. १, आगर, ता. जि. अकोला. ४. सौ. वर्षा श्रीकृष्ण मोरे रा. रेल, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामभाउ नथ्थुजी फुकट
**पत्ता :-** रा. आगर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामभाउ नथ्थुजी फुकट यांचे दि. ०८/०५/२००९ रोजी राहत्या घरी आगर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**चौकशी नोटिस**

**सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम सन १९५० यांचे कलम २२/सन २०२५ चा अर्ज क्र.- ३९२/२०२५ कलम २२**

सार्वजनिक श्री. हनुमान मंदिर विश्वस्त मंडळ न्यू तापडिया नगर अकोला ई-३९८
**अर्जदार :-** श्री गणेश भालचंद्र मैराळ
याने यांनी कलम-२२ अन्वये केलेला अर्ज यांच्या संबंधात कलम २२ /अन्वये भरलेला नमुना
१. विनोद बाळकृष्णाराव कोल्हटकर २. श्रीविवेक वसंतराव जोशी ३. श्री राजीव श्रीराम गिरणीकर
ज्याअर्थी खाली सही करणार याजकडून वरी सार्वजनिक विश्वस्तव्यावस्थे संबंधात- कलम २२/अन्वये नोंद दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

ज्याअर्थी तुम्हास ही नोटिस देण्यांत येत आहे आणि फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही ताजीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकिलामार्फत खाली सही करणार यांचेसमोर वर दिलेल्या पत्त्यावर तारीख १७ माहे ११ सन २०२५ रोजी सकाळी/दुपारि ११.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रशनांची उत्तरे द्यावीत आणि त्या संबंधीचा तोंडी व दस्तऐवजाच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहु चौकशी होईल. तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यांत येईल अशी तुम्हास नोटिस देण्यात येत आहे. आज दिनांक १५ माहे १० सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त-२ अकोला यांच्या शिक्कयानिशी दिली.

शिक्का
**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार संजय काशीराम वानखडे रा. चोहोट्टा बाजार ता. अकोट जि. अकोला यांनी दिलेल्या माहीतीवरुन कळविण्यात येते ते येणेप्रमाणे :

माझे पक्षकाराच्या मालकीचे मौजे किनखेड ता. अकोट, जि. अकोला गट क्र. १६, क्षेत्रफळ २ हे ४३ आर असून त्यापैकी ९४ आर जमीन ही अकृषक आहे हे खरेदी खत क्र. ३२/१९९५, दि. २३/०१/१९९५ हे त्यांच्या राहत्या घरुन हरविले असून सदरचे खरेदी खत हे कुठल्याही बँकेकडे किंवा वित्त संस्थेकडे गहाण नाही. सदर खरेदी खत हे ज्याला कोणाला मिळाल्यास कळवावे. तसेच सदर खरेदी खत कुठल्याही बँकेकडे किंवा वित्त संस्थेकडे गहाण असल्यास सदर बँकेने किंवा वित्त संस्थेने कागदपत्रांसह वरील पत्यावर आपला आक्षेप ७ दिवसाच्या आत नोंदवावा. असे न केल्यास माझे पक्षकार सदर मालमत्तेचे खरेदी हरविले आहे असे समजण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक : १५/१०/२०२५

**ॲड. सिध्दार्थ एन. तायडे**
प्रभारंजन, गजानन कॉलनी, शिवणी,
अकोला- ४४४१०४ मो.नं. ९८५०२६३७३१

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३१८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अपघात रोखण्यासाठी संयुक्त बैठक

## रस्ते सुरक्षेसाठी ठोस उपाययोजनांचा आराखडा तयार

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात वाढत्या अपघातांच्या पाश्वभूमीवर पोलीस अधीक्षक कार्यालयात विविध विभागांची संयुक्त बैठक घेण्यात आली. रस्ते सुरक्षा आणि अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करून काही महत्त्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आले.



बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, प्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढें, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सतीश अंभोरे, प्रकल्प संचालक अभिजीत जिचकार, समृद्धी महामार्ग व टोल प्लाझा व्यवस्थापक यांच्यासह पुलगाव, वर्धा शहर, रामनगर, सेलू, सिंदी रेल्वे, सावंगी व जाम पोलीस ठाण्यांचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीत पोलीस अधीक्षक जैन यांनी अपघात रोखण्यासाठी रस्त्यांवर स्पीड ब्रेकर आणि वेगमर्यादा फलक बसविण्याचे, हेल्मेटचा सक्तीने वापर करण्यासाठी जनजागृती वाढविण्याचे, तसेच मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यांनी अपघातग्रस्तांना तात्काळ मदत मिळावी यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीचा उपयोग करण्याचेही सांगितले.खराब रस्त्यांची दुरुस्ती, अपघातप्रवण ठिकाणी चेतावणी फलक लावणे, तसेच समृद्धी महामार्गावरील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याविषयीही चर्चा केली गेली. मोटर वाहन कायद्यानुसार संयुक्त तपासणी मोहिमा वाढविण्याचा निर्णयही घेण्यात आला.बैठकीचा समारोप करताना अपर पोलीस अधीक्षक वाघमारे यांनी सर्व विभागांमधील समन्वयातून अपघातमुक्त वर्धा घडविण्याचे आवाहन केले.

# माजी सैनिकांसाठी ५ नोव्हेंबरपर्यंत लिपीक भरती

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासनाच्या सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमध्ये रिक्त असलेल्या ७२ लिपिक टंकलेखक पदासाठी ५ नोव्हेंबर पर्यंत सरळसेवा भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या भरती प्रक्रियेचा माजी सैनिकांना लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भरती परीक्षा टीसीएस आयओएन मार्फत घेतली जाणार आहे. भरती प्रकियेत सहभागी होण्यासाठी ५ नोव्हेंबर पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे. यासाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. आवश्यक शैक्षणिक पात्रता माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावी. मराठी टंकलेखनाचा वेग दर मिनिटास किमान ३० शब्द असल्याचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण असणे, तसेच सशस्त्र दलात किमान १५ वर्षाची सेवा पूर्ण केलेली असणे अनिवार्य आहे. परीक्षा शुल्क खुला प्रवर्गासाठी १ हजार रुपये आणि मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गासाठी ९०० रुपये राहील. पदभरती बाबत सविस्तर माहिती www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी आज होळी आंदोलन

## वर्ध्यात शेतकऱ्यांचा आवाज बुलंद

**वर्धा/जनमाध्यम**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा, हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत मिळालीच पाहिजे, या मागणीसाठी शेतकरी संघटनेच्या वर्धा जिल्हा शाखेतर्फे १६ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होळी आंदोलन करण्यात येणार आहे.

राज्य शासनाने दिलेल्या मदतीच्या आश्वासनाची अंमलबजावणी न केल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी उसळली आहे. शासनाच्या निर्णयांची प्रतिकात्मक होळी करून या असंतोषाला स्वरूप दिले जाणार असल्याची माहिती शेतकरी संघटनेचे नेते मधुसूदन हरणे यांनी दिली.या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे आणि शासनास आपली मागणी ऐकण्यास भाग पाडावे, असे आवाहनही हरणे यांनी केले असून वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष या आंदोलनाकडे लागले आहे.

# नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ तर्फे मतदार नोंदणी करण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी मतदार नोंदणी पुनरिक्षन कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पदविधर उमेदवारांनी मतदार म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

आयोगाच्यावतीने मतदार नोंदणीची जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार पदविधर व्यक्तींना प्रकरणपरत्वे नमुना १८ द्वारे अर्ज स्विकारण्याचा अंतिम दि.६ नोव्हेंबर आहे. मतदार नोंदणी करणे सोईचे व्हावे यासाठी आर्वी तालुक्यामध्ये ३, आष्टी २, कारंजा १, हिंगणघाट ४, समुद्रपूर १, सेलू तालुक्यामध्ये सिंदी व सेलू असे २, देवळी तालुक्यात देवळी व पुलगाव असे ३ तर वर्धा तालुक्यामध्ये आंजी, सेवाग्राम, वर्धा शहर व ग्रामीण मिळून १३ असे एकुण २९ पदनिर्देशित अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. मतदारांनी आपले रहिवास पुरावा, पदवी अथवा पदविकेची दि.१ नोव्हेंबर २०२२ पुर्वी उत्तीर्ण असलेली गुणपत्रिका किंवा पदवी पदविका साक्षांकित करुन फोटोसह संबंधित पदनिर्देशित अधिकारी यांचेकडे नमुना १८ भरुन सादर करावा. तसेच मतदार आपले नाव https://mahaelection.gov.in या लिंकवर नोंदणी करु शकतात.

जिल्ह्यामध्ये सन २०२० मध्ये एकूण २१ हजार ८७९ पदवीधर मतदार होते. सध्या दि.३० सप्टेंबर ते १३ ऑक्टोंबर पर्यंत ६२६ मतदारांनी आपली नावे नोंदविण्याकरीता अर्ज सादर केला आहे. विविध कार्यालयामध्ये विभागप्रमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य यांची तहसिलदार स्तरावर सभा आयोजित करुन त्यांना त्यांचे अधिनस्तम पदवीधर अधिकारी, कर्मचारी यांचे नाव मतदार यादीत नोंदविण्याकरीता विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.पदवीधर मतदार संघातील जिल्ह्यातील सर्व पात्र पदवीधरांनी वेळापत्रकानुसार पदनिर्देशित अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात विहित नमुना १८ मधील अर्ज आवश्यक ते पुरावे व प्रमाणपत्रांसह दाखल करावेत व नागपूर विभाग पदवीधर मतदार संघ यादी तयार करण्याच्या कामास सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांनी केले आहे.

# हृदय व फुप्फुस पुनरुजीवन जनजागृती सप्ताहाचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**

हृदयाविकाराच्या झटक्याच्यावेळी तत्काळ हृदय व फुप्फुस पुनरुजीवन करण्याबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व आरोग्य संस्थांमध्ये १९ ऑक्टोंबर पर्यंत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी केले आहे.

सप्ताहादरम्यान नागरिकांमध्ये सीपीआर या जीवनरक्षक कौशल्याचे महत्व व त्याची योग्य कृती याबाबत जागरुकता निर्माण करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश सामान्य नागरिकांमध्ये हृदयविकाराच्या वेळी तत्काळ सीपीआर देण्याबाबत जागरुकता निर्माण करणे आणि जीवनरक्षक कौशल्ये विकसित करणे हा आहे. प्रशिक्षित व्यक्तीने वेळेवर सीपीआर दिल्यास जगण्याची शक्यता लक्षणीयरीत्या सुधारते. सीपीआर न दिल्यास काही मिनिटांतच मेंदूला हानी पोहोचू शकते आणि प्रत्येक मिनिटाच्या विलंबामुळे जगण्याची शक्यता सुमारे १० टक्के कमी होते.

सीपीआर महत्व आणि आपत्कालीन परिस्थितीत त्याचा वापर कसा करावा याबद्दल माहिती देण्यासाठी आरोग्य शिक्षण व माहिती प्रसारणाची साधने तसेच समाजमाध्यमाध्यमाचा प्रभावीपणे वापर केला जाईल. वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आरोग्य संस्थांमधील इतर कर्मचाऱ्यांसाठी तातडीच्या परिस्थितीत सीपीआर देण्यासाठी आवश्यक प्रात्याक्षिक प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली आहे.उपक्रमात सहभागी होण्यासाठी https://echo.zoom.us/webinar/register/WN-fsVmS?OvR2tE3szTQUocg यावर नोंदणी करावी. तसेच व्हिडीओद्वारे प्रशिक्षण https://youtu.be/d4yody184sOUwjRZalm98e या लिंकवर घेता येणार आहे, असे आरोग्य विभागाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रकवर पोलिसांची कारवाई

## अकरा गाईंसह ६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट/जनमाध्यम**

हिंगणघाट पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत गोवंशाची अवैध वाहतूक करणारा ट्रक पकडण्यात आला असून, अकरा गाईंसह एकूण ६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई जाम रोडवरील रायगड हॉटेलसमोर करण्यात आली. पोलिसांनी ट्रक क्रमांक एमएच-४० बीएल-८४९२ थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये अकरा गाईंची अवैध वाहतूक होत असल्याचे उघड झाले. संबंधित वाहन चालक व मालक शुभम श्रावण सेलवटे (वय ३०, रा. बुटीबोरी, जिल्हा नागपूर) हा आपल्या ट्रकद्वारे गोवंशाची वाहतूक करीत होता. मात्र पोलिसांना पाहून तो घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी पोलिसांनी प्राण्यांचा क्रूरता प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१)(डी), तसेच महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ), ९, ११. आणि मोटार वाहन कायदा कलम ३ (१), १८१, १३०, १७७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत ठाणेदार अनिल राऊत यांच्या नेतृत्वात पोलीस हवालदार गजानन कामठाणे, दिनेश धुमाने व माने यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सुरू आहे.

# अज्ञात महिलेकडून बालकाच्या अपहरणाचा प्रयत्न

## पालकाने दिली रामनगर पोलिसांना तक्रार

**वर्धा/जनमाध्यम**

घरासमोर खोळत असलेल्या ११ वर्षांच्या मुलाला एका मध्यमवयीन महिलेने फूस लावून आपल्या सोबत नेले. काही वेळानंतर मुलाने धैर्य दाखवत महिलेच्या तावडीतून स्वतःची सुटका करून घेतली. ऑटोचालकाच्या मदतीने घरी परतला. ही घटना प्लॉट नं. ६ रेवतकर ले-आऊट, कारला रोड येथे उघडकीस आली. घरी परतलेल्या बालकाने घडलेली घटना पालकांकडे कथन केली त्यानंतर मुलाच्या अपहरणाच्या प्रयत्नाबाबत पालकांनी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यासंदर्भात वृत्त लिहीपर्यंत कोणताही गुन्हा दाखल झाला नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

माहितीनुसार, रेवतकर ले-आऊट कारला रोड परिसरातील रहिवासी दिनेश वरकड यांचा मुलगा देवांश (११) दुपारी घरासमोर खेळत होता. साधारण १२.३० वाजता एका मध्यमवयीन महिला देवांशकडे आली आणि काही वेळ बोलत त्याला फूस लावून सोबत घेऊन गेली. दादाजी धुनिवाले मठ चौकात पोहोचल्यावर देवांशला संशय आला. त्याने धैर्य दाखवत महिलेचा हात झटकला आणि पळत जाऊन एका ऑटोचालकाकडे मदत मागितली. ऑटोचालकाच्या मदतीने देवांश सुरक्षित घरी पोहोचला. देवांशने घडलेली घटना आपल्या कुटुंबीयांना सांगितल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. दिवसाढवळ्या मुलाच्या अपहरणाचा प्रयत्न झाल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेची दिवसभर शहरात चर्चा होती. दरम्यान, देवांशचे वडील दिनेश वरकड यांनी रामनगर पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दिली असून, परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून संबंधित महिलेला शोधून काढण्याची मागणी केली आहे.

# लखनऊ येथे अग्नीवीर भरती रॅलीचे आयोजन

**वर्धा /जनमाध्यम**

भारतीय सैन्यामध्ये अग्नीवीर भरतीसाठी आर्मी रिक्रुटमेंट रॅली एएमसी सेंटर, लखनऊ येथे दि. १० ते ते १४ नोव्हेंबर या कालावधीत भरती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रॅली दरम्यान जनरल ड्यूटी, युनिट कोटा भरती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी अग्नीवीर भरतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


अग्नीवीर भरती रॅलीमध्ये माजी सैनिक, विधवा व वीरनारी यांचे पाल्य, सेवारत सैनिकांचे पाल्य, तसेच युध्दातील जखमी सैनिकांचे भाऊ व पाल्य, खेळाडूंना सहभाग घेता येणार आहे. अधिक माहिती uhq2025@joinamc.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्रीपती मोरे यांनी कळविले आहे.

# ऑनलाईन खरेदीच्या नावाखाली सायबर जाळे

## 'कॉल फॉरवर्डिंग' कोडने उडवतात WhatsApp खाते

**वर्धा/जनमाध्यम**

सणासुदीच्या काळात ऑनलाइन खरेदीचा हंगाम सुरू असून त्याचसोबत सायबर गुन्हेगारांनी नवी फसवणुकीची पद्धत अवलंबिली आहे. कुरियर कंपनीचा एजंट किंवा डिलिव्हरी कर्मचारी असल्याचे भासवून ते लोकांना फसवण्याचे प्रकार वाढले आहेत.




तक्रारीनुसार, हे गुन्हेगार नागरिकांना फोन करून सांगतात की, तुमचा पार्सल चुकीच्या ठिकाणी गेला आहे, किंवा डिलिव्हरीचा पत्ता स्पष्ट होत नाही. त्यानंतर समस्या सोडवण्यासाठी ते संबंधितांना त्यांच्या मोबाईलवरून एक विशिष्ट कोड डायल करण्यास सांगतात. हा कोड २१ किंवा ४०१ xxxxxxxxxx# असा असतो.हा कोड डायल होताच कॉल फॉरवर्डिंग सेवा सक्रिय होते व त्या फसवणूक करणाऱ्याच्या नंबरवर पीडितांचा सर्व कॉल, संदेश आणि विशेषत OTP आपोआप जातो. या ध्कइ चा वापर करून सायबर टोळके पीडितांचे WhatsApp खाते हॅक करतात. त्यानंतर, त्यांच्या संपर्कातील व्यक्तींना वैद्यकीय आपत्कालीन कारणे सांगून आर्थिक मदतीचे खोटे संदेश पाठवतात.सायबर तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून कोड डायल करू नये. कुरियर संबंधी शंका असल्यास संबंधित कंपनीच्या अधिकृत ग्राहकसेवेशी संपर्क साधावा. OTP, बँक माहिती किंवा वैयक्तिक तपशील कोणालाही देऊ नये, असा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.जर अशा प्रकारची फसवणूक झाल्याचे आढळले, तर तातडीने सायबर सेलकडे तक्रार नोंदवावी किंवा सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा. तसेच मोबाईलमध्ये कॉल फॉरवर्डिंग सुरू असल्यास ते त्वरित बंद करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संक्षिप्त

## शेतमजूर युवकाचा शेतात मृत्यू

**हिंगणघाट-** तालुक्यातील चिकमोह गावात मजुरीसाठी आलेल्या शेतमजुराचा शेतातच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. शुभम कृष्णा उईके (वय २५, रा. गडचिरोली) हा सोयाबीन कापणीच्या कामासाठी आपल्या सवंगड्यांसह चिकमोह येथे आला होता. सोयाबीनची मजुरी करत असताना अचानक त्याला चक्कर आली व तो शेतातच खाली कोसळला. तात्काळ त्याला ऑटोने हिंगणघाट येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेची नोंद त्याच्यासोबत काम करणारा विनोद वसंत उईके (वय ३८) याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी मर्ग दाखल करून घेतली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुमेध आगलावे करीत आहेत. सध्या परिसरात सोयाबीन कापणीचे काम सुरू असून, गडचिरोली जिल्ह्यासह इतर भागांतील मजूर मोठ्या संख्येने मजुरीसाठी येथे येत आहेत.

## दोन लाखाचे साहित्य लंपास

**आर्वी -** सिमेंटच्या विटा बनविण्याच्या कारखान्यातून अज्ञात चोरट्याने २ लाख रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले. ही घटना जांब येथे घडली. आर्वी-तळेगाव रोडवरील जाब येथे सिमेंट विटा बनविण्याचा कारखाना आहे. पावसाळ्यात हा कारखाना बंद होता. दरम्यान, अज्ञात चोरट्याने कुलूप तोडून कंपनीत ठेवऊन असलेल्या सिमेंट तयार करणाऱ्या मशिनचे २ लाख रुपयांचे साहित्य चोरून नेले. या प्रकरणी अनिल भट्ट रा. आर्वी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## घरगुती कारणातून मुलीची आत्महत्या

**आर्वी -** घरगुती कारणातून मुलीने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. निंबोली (शेंडे) येथे ही घटना घडली. तनुश्री पेंदाम (वय १७) रा. निंबोली (शेंडे), असे मृत मुलीचे नाव आहे. तनुश्री हिचा दुपारच्या जेवणाच्या कारणातून घरी वाद झाला होता. दरम्यान, तिने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## विहिरीत उडी घेत आत्महत्या

**कारंजा (घाडगे) -** सततची नापिकी आणि कर्जबाजारी पणाला कंटाळून शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. सेलगाव (उमाटे) शिवारात ही घटना घडली. गणेश घसाड (वय ४०) रा. सेलगाव (उमाटे), असे मृताचे नाव आहे. गणेश घसाड याच्याकडे पाच एकर शेती असून त्रा शेतावर पीककर्ज होते. तसेच गणेशने महिद्रा फायनान्स आणि बचतगटाकडून कर्ज घेतले होते. सततच्या नापिकीमुळे कर्जाची परतफेड कशी, करावी या विवंचनेत तो राहत होता. दरम्यान, त्याने शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी कारंजा पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## हिंगणघाटात घरफोडी

**हिंगणघाट -** शहरातील विराम सिटी, सातेफळ रोड परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून तब्बल १ लाख २३ हजार ३७४ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची खळबळ उडाली आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी ट्रान्सपोर्ट व्यवसाय करतो. आईच्या निधनामुळे कुटुंब काही दिवस वरणगाव येथे गेले होते. घर बंद असल्याची माहिती मिळताच चोरट्यांनी संधी साधली. १३ ऑक्टोबरच्या रात्रीपासून १४ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंतच्या वेळेत घराचे कुलूप तोडून चोरी करण्यात आली.घरात प्रवेश करून कपाटातील सामान अस्ताव्यस्त फेकून दिले. लॉकरमधील २० हजार रुपये रोख, १९ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन (किंमत १,०१,३७४) आणि चांदीची पाळ (२,०००) असा एकूण १,२३,३७४ रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला.घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू असून पुढील तपास सुरु आहे.

## सुजुकी डिजायर चार चाकी गाडी चोरी

**तळेगाव -** (ता. आष्टी) येथील शंतनू पुरुषोत्तम राव यांच्या सांगण्या नुसार, त्यांच्या घरासमोर ठेवलेली सुजुकी डिजायर चार चाकी गाडी चोरी झाली आहे. या चोरीची नोंद तळेगाव पोलीस ठाण्यात १४ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री नऊ वाजतांच्या दरम्यान करण्यात आली आहे. गेली रात्री सुमारे तीन वाजता अज्ञात व्यक्ती या गाडीला घेऊन निसटल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्ट दिसून आले. या चोरीत गाडीची किंमत सुमारे तीन लाख पन्नास हजार रुपये असल्याचे सांगितले जाते. फिर्यादी शंतनू आणि त्यांच्या पत्नी ज्योती यांनी गाडी गावात आणि मोहल्ल्यात शोधली, पण काहीही ठिकाणी गाडी आढळली नाही. पोलीसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून, आरोपीच्या शोधासाठी विविध पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. गाडीचा विसरलेल्या चोरट्याला पकडण्याचा पोलीस विभागाने निर्धार दाखविला आहे.या प्रकारामुळे तळेगाव परिसरात सुरक्षेची चिंताही वाढली असून, नागरिकांनी अधिक जागरूक राहण्याचे आवाहन स्थानिक पोलीस करत आहेत.पोलीस ठाणे तळेगाव या घटनेचा गांभीर्याने स्वागत करत, त्वरित दोषींवर कठोर कारवाई करणार असल्याचा विश्वास दिला आहे.या घटनेचा गांभीर्याने स्वागत करत, त्वरित दोषींवर कठोर कारवाई करणार असल्याचा विश्वास दिला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३१७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# सूक्ष्म नियोजनातून व्यापक व संतुलित विकास कार्यक्रम राबविण्यावर सातत्यपूर्ण भर- आ. सुलभाताई खोडके

## सिद्धार्थ नगर येथील बुद्ध विहार मागील अभ्यासिका बांधकामाचे आ.खोडके यांच्या हस्ते भूमिपूजन

**अमरावती -** जनसामान्यांच्या लाभणारा अखंडितपणे स्नेहभाव तसेच कायम स्वरूपी प्रोत्साहन या लोकबळावरच विशिष्ट नावीन्यपूर्ण उपक्रमांची मांडणी, रचना आणि अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने लक्ष केंद्रित करणे या बाबी शहरी क्षेत्र विकासातील प्रत्यक्ष परिस्थितीवर अवलंबून असतात. तथापि, नवीन उपक्रमांच्या रचनेमध्ये भूतकाळातील प्रमुख अनुभव आणि धडे हे सुद्धा विचारात घेतले पाहिजे. आदि बाबी लक्षात घेता, अमरावती शहरातील प्रत्येक प्रभाग विकसित करण्याच्या दृष्टीने सर्व घटकांना सोबत घेऊन अंमलबजावणीचा दृष्टिकोन जनतेचा वाढता पाठींबा या ताकदीवर विविध योजनांच्या अंमलबजावणीवरून आलेल्या अनुभवानुसार असेही दिसून येते की नियोजनबद्ध, व्यापक व संतुलित कार्यक्रम यशस्वी होण्याची जास्त शक्यता असते.सूक्ष्म नियोजन हेच १०० टक्के यशाचे खरे सूत्र असते. विकासकामांच्या गतीने पूर्तता करण्याच्या संकल्पनेशी निगडित कौशल्ये आणि क्षमता विकसित करून नागरिकांचा विश्वास सार्थ ठरवित ही विकासकामांची मालिका अव्याहतपणे सुरु ठेवण्यासाठी आपण सदैव कटीबद्ध आहोत. याकरिताच विद्यार्थ्यांचे हिताची जोपासना करण्यासाठी सुसज्ज - अद्यावत अशी अभ्यासिकेच्या निर्माण कार्याची आज सुरुवात झाली आहे.




असे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. सर्वप्रथम आमदार सौ. सुलभाताई खोडके व यश खोडके यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध तसेच भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस वंदन -नमन व माल्यार्पण करण्यात आले.तदनंतर आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी रुपये- एक कोटी निधीतून बांधकाम केल्या जाणाऱ्या सिद्धार्थ नगर येथील त्रिरत्न बुद्ध विहार मागे असलेल्या अभ्यासिकेच्या बांधकामाच्या विकासकामाच्या भूमिपूजनाची औपचारीकता साधली. यावेळी विकासकामाच्या नामफलकाचे त्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. सिद्धार्थ नगर येथील नागरिकांच्या हस्ते यावेळी शाल - श्रीफळ व पुष्पगुछ देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या स्नेहपूर्ण सत्काराचा स्वीकार करीत त्यांनी स्थानिक विद्यार्थ्यांना ज्ञानवृद्धी, आत्मविश्वास, कौशल्य विकास, तार्किक विचार, स्वतंत्र विचार, एकाग्रता, व्यक्तिमत्व विकास, स्वयंशिस्त, नियमित अभ्यास, वेळेचे व्यवस्थापन, ज्ञानार्जन करण्यासाठी मानसिक तयारी, या दशसूत्रीचा अवलंब करण्याचे आवाहन करीत स्थानिक नागरिकांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी आमदार -सौ. सुलभाताई खोडके यांच्यासमवेत यश खोडके तसेच सिद्धार्थ नगर येथील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनींसह युवक - युवती प्रामुख्याने उपस्थित होते.

# अमरावतीत उद्या 'दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन'चा भव्य शुभारंभ

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचे नागरिकांना उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन

**अमरावती -** अमरावती महानगरपालिका तर्फे आयोजित 'दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन' या भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन उद्या दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता अमरावती येथील सांस्कृतिक भवनात होत आहे. या अनोख्या उपक्रमाद्वारे नागरिकांना दिवाळीच्या उत्सवी वातावरणासह स्थानिक कलाकारांच्या कला, छायाचित्रण आणि हस्तकौशल्याचा आनंद घेण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमात लोकप्रतिनिधी, विविध मान्यवर, अधिकारी, समाजसेवक आणि कलाकार उपस्थित राहणार आहेत. हा महोत्सव १६ ते २१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत नागरिकांसाठी खुला राहणार आहे.

कार्यक्रमात फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शनी, स्थानिक स्वयंसहायता बचत गटांचे स्टॉल, हस्तकला व स्थानिक उत्पादने प्रदर्शन, तसेच दिवाळीशी संबंधित सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य-संगीत सादरीकरणे, आणि बालकांसाठी विशेष उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शहरातील उद्योजक, कलाकार, विद्यार्थी, महिला बचत गट आणि नागरिक यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे अमरावती महानगरपालिकेचे आवाहन आहे. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, अमरावती शहरातील नागरिकांनी आपले कौशल्य, परंपरा आणि संस्कृती या माध्यमातून प्रदर्शित करावी. या दिवाळी आनंदोत्सवाचे उद्दिष्ट म्हणजे स्वच्छ, सुंदर आणि सर्जनशील अमरावतीकडे वाटचाल करणे आहे. कार्यक्रमादरम्यान फोटोग्राफी स्पर्धेत सहभागी कलाकारांचे छायाचित्रण कौशल्य प्रदर्शित होईल. तसेच स्वच्छता, हरित उपक्रम आणि पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश देणाऱ्या उपक्रमांनाही महत्त्व दिले जाईल. महानगरपालिकेच्या या उपक्रमाला नागरिक, विद्यार्थी आणि कुटुंबांसाठी उत्साह, कला आणि संस्कृतीची रंगतदार मेजवानी ठरणार आहे. अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शन हे केवळ मनोरंजनाचे व्यासपीठ नसून, अमरावतीच्या सांस्कृतिक वारशाचे आणि नागरिकांच्या सर्जनशीलतेचे प्रदर्शन आहे. प्रत्येक नागरिकाने या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन आपले कौशल्य, कला आणि संस्कृती जगासमोर आणावी. स्वच्छता, पर्यावरणपूरक दिवाळी आणि स्थानिक उत्पादने यांच्या प्रोत्साहनासाठी हा उत्सव एक उत्तम संधी आहे. नागरिकांनी आपल्या कुटुंबासह या महोत्सवात उपस्थित राहून स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, तसेच शहराच्या सौंदर्य, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा संदेश या माध्यमातून दृढ करावा. आयुक्तांनी पुढे सांगितले की, महानगरपालिकेच्या विविध उपक्रमांना नागरिकांचा सहकार्यभाव हेच शहर विकासाचे बळ आहे. दिवाळी आनंदोत्सवात सहभागी होऊन आपण 'स्वच्छ, सुंदर आणि सांस्कृतिक अमरावती' घडविण्यास हातभार लावूया.

# माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना अभिवादन



**अमरावती -** माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, नगरपालिका प्रशासन सहआयुक्त विकास खंडारे आदी उपस्थित होते. उपस्थित अधिकारी- कर्मचारी यांनीही पुष्प वाहून डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

# समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेबाबत महत्वाची सूचना

**अमरावती -** राज्यातील सर्व जिल्हा परिषद मधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी 'समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५' या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने दि. १ ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यातील विविध केंद्रावर आयोजन करण्यात आले आहे. परीक्षेबाबतची अधिसूचना, वेळापत्रक व ऑनलाईन आवेदनपत्राबाबतची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिध्द आली आहे. तरी परीक्षार्थी उमेदवारांनी वेळोवेळी www.mscepune.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

# सुखदेव ढोबळे यांचे निधन



**तिवसा -** येथील पत्रकार हेमंत निखाडे यांचे मामा सुखदेव नरहरी ढोबळे,(रा.यशोदा नगर,अमरावती) यांचे आज १५ ऑक्टोबर बुधवार रोजी अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षाचे होते.त्यांच्या मृत्यू पश्चात पत्नी,मुले,नातवंड,भाऊ,बहिणी असा बराच मोठा आप्त परिवार आहे.उद्या सकाळी १० वाजता यशोदानगर येथील हिंदू स्मशानभूमी येथे त्यांच्यावर सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,अमरावती**
**श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३०७/२०२५
**रुकन्या -वि- निरंक**
**पुढील ता.२०.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. **रुकन्या सुलताना सयद रहेमान**, वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. **सयद वाकर सयद रहेमान,** वय ३८ वर्षे, व्यवसाय - व्यापार
दोघे रा.एस.आर.हाउस, वाहेद खान डि.एड.कॉलेज रोड, नुर नगर नं.१, अमरावती
३. **शाजिया अंजुम मोहम्मद इक्बाल,** वय ३७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.कामापुरा, अंजनगाव सुर्जी,ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती
४. **रुही उजमा मोहम्मद इर्शाद,** वय ३५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.इमाम चौक जवळ, काझी पुरा, अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सयद रहमान सयद मेहबुब** हे दि. **२६.०७.२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार रुकन्या सुलताना सयद रहेमान व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रुकन्या सुलताना सयद रहेमान व इतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**(C.J.J.D.) मा. दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१३६/२०२५ — ने.ता.१.११.२०२५
**बबीता --वि--शिला**

**अर्जदार :**
१. **बबीता अशोक बारसे**
२. **अभय गजानन बारसे**
३. **अक्षय गजानन बारसे** - अ.क्र.१ ते ०३ रा.येणस ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**

१. **शिला अशोक लोहकरे व इतर** - रा.वलनी खरडा, ता.कळंब, जि.यवतमाळ
२. **वंदना जितेंद्र बसवनाथे** रा.शेलु नटवा, ता.ना.खंडे. जि.अमरावती
३. **मीरा मधुकर धवणे** रा.निंबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. **श्रीमती पंचफुला सोपान बारसे** रा.येणस, ता.नां.खंडे. जि.अमरावती

ज्याअर्थी **मयत सोपान नारायण बारसे यांचा मृत्यू दि.०७.०२.२०२३ रोजी येणस, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला आहे. **अर्जदार आणि गैरअर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३० जून २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३१९/२०२५
**निलेश -वि- अनिता**
पुढील ता.२१.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. निलेश जयकृष्णराव शिरभाते, वय ५१ वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.मेन रोड शिरभाते कॉम्प्लेक्स, मोती नगर, अमरावती
२. शैलेश जयकृष्णराव शिरभाते, वय ५० वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.यशोदा नगर रोड, शिरभाते मंगल कार्यालयाजवळ, मोतीनगर, अमरावती
३. प्रिती गजानन गुल्हाने, वय ४८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.गंगोत्री कॉलनी, अकोली रोड, साईनगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत इंदिरा जयकृष्णा शिरभाते** यांचे दिनांक **०१.०५.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार निलेश जयकृष्णराव शिरभाते व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निलेश जयकृष्णराव शिरभाते व ईतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२५०/२०२५ — ने.ता.०६.११.२०२५

**अर्जदार :-**
**१.देवेंद्र आनंद तांबसकर**
**२.रोहित देवेंद्र तांबसकर**
**३.खुशी देवेंद्र तांबसकर,**
सर्व रा. वार्ड क्र.६,ओंकारखेडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी **सिमा देवेंद्र तांबसकर** यांचा मृत्यू दि.**०८.०१.२०२५** रोजी **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर** येथे झाला.**मयताचे अ.क्र.१ हा पती, अर्जदार क्र.२ मुलगा व अर्जदार क्र.३ ही मुलगी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २५ सप्टेंबर २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहा.अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - १९८७/२०२५**
**श्रीमती मेघा अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०५.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Smt. Megha Milind Dudhane,** Age 62 yrs., Occu.- Housewife,
2) **Mr. Kauustubh Milind Dudhane,** Age 36 yrs., Occu.- Service,
3) **Mr. Shardul Milind Dudhane,** Age 30 yrs., Occu.- Business,
All 1 to 3 R/o. 97-Mauli,Padam Saurabh Colony, Shegaon Road, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द -

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मिलींद नारायणराव दुधाणे हे दि.२१/०५/२०२५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार मेघा अधिक अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती मेघा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १३.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३०४/२०२५
**श्रीमती अरुणा -वि- निरंक**
पुढील ता.१७.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Aruna Gopichand Kambale
Age 64 Yrs. Occu.: Household
R/o Near Kalptaru Budha Vihar, Kaushaly Nagar, Bhagwan Nagar, Nagpur, Tq. Dist. Nagpur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दामु शिवाजी सोनोने** हे दिनांक 26.04.2014 रोजी **बडनेरा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अरुणा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अरुणा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती

---

**नगर परिषद कार्यालय, दर्यापूर, जिल्हा अमरावती**

न.प.दर्यापूर/आरोग्य विभाग/जा.क्र./२५१८/२०२५ — दि.१५/१०/२०२५

**ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी नगरपरिषद दर्यापूर इच्छुक निविदाकार मार्फत पुढे नमुद कामाकरिता निविदा आमंत्रित करीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम (रु.) | निविदा फार्म फी (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०२५-२६ या वर्षातील जिल्हा वार्षिक योजना DPDC अंतर्गत दर्यापूर शहराच्या अग्निशमन विभागाचे बळकटीकरण करणेकरिता आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत. | रु.६०,००,०००/- | रु.६०,०००/- | रु.३०००/- |

| अ.क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द करणे. | १५/१०/२०२५ | सायंकाळी ६.०० |
| २ | निविदा फॉर्म उपलब्ध होणे | १५/१०/२०२५ | सायंकाळी ६.०० |
| ३ | निविदा भरण्याची अंतिम तारीख | २७/१०/२०२५ | सायंकाळी ६.०० |
| ४ | निविदा उघडण्याची अंदाजित तारीख | २९/१०/२०२५ | दुपारी ४.०० |

**अटी व शर्ती**
१.उपरोक्त प्रमाणे नमुद कामाची निविदा कुठलेही कारण न देता रदद करण्याचे व निविदामधील अटी शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद दर्यापूर यांनी राखून ठेवले आहे.
२. अनामत रक्कम ऑनलाईन स्वरुपात भरणे बंधनकारक आहे.
३. कामा संबंधित सर्व आवश्यक माहिती, अटी व शर्ती https://mahatenders.gov.in/ संकेत स्थळावर अपलोड केले आहेत.

-स्वा-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद, दर्यापूर**

---

**मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२५२/२०२५ — ने.ता.०६.११.२०२५

**अर्जदार :-**
१. **शेख दानिश शेख नईम शेख**
२. **रेशमा परवीन शेख नईम**
सर्व रा. वार्ड क्र.२,मोमीनपुरा,नांदगाव खंडेश्वर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**

**निरंक**

ज्याअर्थी **शेख नईम शेख अजीम** यांचा मृत्यू दि.०५.०५.१९९८ रोजी **नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे आई नामे तमीज बी शेख अजीम यांचा मृत्यू दि. २६.०८.२०११ रोजी झाला आहे. मयताचे **अ.क्र.१ हा मुलगा व अर्जदार क्र.२ ही पत्नी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २५ सप्टेंबर २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहा.अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**जाहीर नोटिस**

**नोटिस देणार :-** **अभिषेक प्रमोदराव पेरके,**
वय २३ वर्ष,धंदा-शेती
रा.अंतोरा जुना,ता.आष्टी, जि.वर्धा

जाहीर नोटिस देतो की,

**१.** मी श्रीहरी जानराव टाकोडे, वय ६० वर्ष, धंदा-शेती, रा.लाडकी बु.ता.मोर्शी, जि.अमरावती यांचेकडून मौजा दुर्गवाडा, गा.नं. १३२ प्र.ता.पो.तु.मोर्शी जि.अमरावती येथील ग्रा.पं. कक्षेतील शेत स.नं. २ मधील रा.मा.क्र.०३/एन.ए.पी.३४/दुर्गवाडा/०२/११/२०२१ ई.नुसार लेआऊट कन्व्हर्टेड झालेला प्लॉट नं.६२ पूर्ण खुला असलेला एकुण क्षेत्रफळ १२४.०० चौ.मी.(१३३४.७४) याची लांबी रुंदी लेआउट मंजुर नकाशाप्रमाणे ) ज्याची चतुसिमा पुर्वेस- लेआउट मधील ९ मी. रोड, पश्चिमेस-प्लॉट नं.५३, उत्तरेस- प्लॉट नं. ६३, दक्षिणेस - प्लॉट नं. ६१ चा सौदा ९,३४,३१८/- रुपयाला केला असून त्याबाबत ईसारपावतीचे २,००,०००/- (दोन लाख रुपये) दिले आहे. खरेदी ता.३०.१२.२५ किंवा त्यांचे आंत करण्याचे ठरले आहे. तरी सदर प्लॉटवर कोणाचा बोजा,कोणी सौदा केला असेल तर नोटिसपासुन ३० दिवसाचे आंत कळवावे.

**दिनांक : १५/१०/२०२५** — **सही/-**

---

**जाहीर नोटीस**

No.2
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF **Shri R.B.Raja**
12th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (0.5, R.1, 5)**

Spl.Dkst./508/2024
**Ravindra Jaikumar Alias Jayantkumar Naik Vs Rupesh Kisanlal Sahu**
NEXT DATE 15.11.2025

To,
Aruna Jayantkumar Naik
Fulamla, Tq.Nandgaon Khandeshwar,
Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Ravindra Jaikumar Alias Jayantkumar Naik** has instituted a suit against you for you hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 15.11.2025 at 11.00 o'clock in the forenoon, to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 13.10.2025.

शिक्का
**12th Jt.Civil Judge,**
**Sr.Dn., Amravati**

---

**जाहीर नोटीस**

No.2
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF **Shri R.B.Raja**
12th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (0.5, R. 1, 5)**

Spl.Dkst./508/2024
**Ravindra Jaikumar Alias Jayantkumar Naik Vs Rupesh Kisanlal Sahu**
NEXT DATE 15.11.2025

To,
Shraddha Yashwant Naik
Naik Zerox Rukhmini Nagar,
Congress Nagar Road, Amravati.
Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Ravindra Jaikumar Alias Jayantkumar Naik** has instituted a suit against you for you hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **15.11.2025** at **11.00** o'clock in the forenoon, to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 13.10.2025.

शिक्का
**12th Jt.Civil Judge,**
**Sr.Dn., Amravati**

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### विद्यापीठाच्या हिवाळी-२०२५ च्या काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल



**अमरावती-**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाव्दारे घेण्यात येणा-या हिवाळी - २०२५ च्या लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या ँुर्ल्म.ग्ह या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. परंतु काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आले आहेत. त्यामध्ये बी.ई.सेमि.-६ (सी.बी.सी.एस.), बी.ए. सेमि.-२ (एन.ई.पी.), बी.पी.ए. सेमि.-१ व २, बी.कॉम.सेमि.-१ व २ (एन.ई.पी.)/ बी.कॉम. (ए./एफ) सेमि.-१ व २ (एन.ई.पी.), बी.एस्सी. सेमि.-१ व २ (एन.ई.पी.), बी.एस्सी. (गृह विज्ञान) सेमि.-१ व २ (एन.ई.पी.), बी.पी.ई. ॲन्ड एस. सेमि.-१ व २ (एन.ई.पी.), डिप्लोमा इन .बिझिनेस ॲनेलिस्टिक सेमि.-१ व २ आणि पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन फायनान्सियल लिट. कोर्स (एक वर्षीय) या परीक्षांचा समावेश आहे.यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना कळवायचे आहे. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.



**अमरावती-राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अमरावती दौरा नुकताच झाला. यावेळी भाजपा पक्षाचे जिल्हा सरचिटनीस व पथ्रोट जिल्हा परिषद सर्कल चे संभाव्य उमेदवार सुधीर रसे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. भाजपा पक्षाचे जिल्हा सरचिटनीस सुधीर रसे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे मतदार संघातील विकासकामाबाबत चर्चाही केली.**



### गांधी विद्यालय येथे 'वाचन प्रेरणा दिन'

**अंजनगाव बारी -** डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसाचे औचित्य साधून गांधी विद्यालय बडनेरा येथे 'वाचन प्रेरणा साजरा' करण्यात आला. त्या अनुषंगाने शाळेच्या प्राचार्य वंदना टिक्कस व पर्यवेक्षक दिगंबर करडे यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन हार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी लुंबिनी रंगारी, ईशानी गोंडाणे, प्राची हजारे, शरयू बारब्दे या विद्यार्थ्यांनी एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे आयोजन डांगरे , निघोंटकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष पवार यांनी केले या कार्यक्रमा करिता अवघड, चौधरी, देशमुख, नीलिमा देव, गंगा भैसने ,भारती ठाकूर, किरण कोल्हे, वैभव काळे ,शोभा खंडारे , दारोकार, आगे व बोरकर आदींनी कार्यक्रम यशस्वीतेकरिता परिश्रम घेतले.



### वाचन प्रेरणा दिन साजरा

**अचलपूर-**देशाचे माजी राष्ट्रपती स्व.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस अचलपूर शहरातील नवयुग हिंदी वाचनालयात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वाचनालयाचे अध्यक्ष माणिक देशपांडे,सचिव अनीलकुमार चौधरी, सुमन अनिल चौधरी, ग्रंथपाल मनोज ठाकूर, संजय उविटकर प्रामुख्याने उपस्थितीत होते.यावेळी मान्यवरांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वातून वाचनाचे मानवी जीवनातील महत्त्व पटवून दिले.



### होमगार्ड पथकाकडून वृक्षारोपण

**धारणी-**हरित महाराष्ट्र–समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत धारणी शहरातील प्रभाग क्रमांक तीन येथील गार्डनमध्ये होमगार्ड पथकाच्या वतीने विविध देशी प्रजातींच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात होमगार्ड पथकाचे अधिकारी शामकरण कस्तुरे हे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या सोबत प्रकाश जांभेकर, योगेश राठोड, राजेश पटेल, सुनील पटोलकर, नारायण धांडे, पांडेजी आदी सैनिक उपस्थित होते. या वृक्षारोपण मोहिमेत महिला सैनिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. पथकाने शहरात हरित वातावरण निर्माण व्हावे आणि पुढील पिढ्यांसाठी स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक परिसर निर्माण होण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविला असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# रहाटगावमध्ये बनावट चलनी नोटांचा गोरखधंदा उघड

## नांदगाव पेठ पोलिसांची मध्यरात्री धडाकेबाज कारवाई; तीन जण ताब्यात, तर एक फरार

**नांदगाव पेठ/वार्ताहर**

रहाटगाव परिसरात काही इसम बनावट चलनी नोटा दैनंदिन व्यवहारात वापरत असल्याची खात्रीलायक माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी मध्यरात्री धडाकेबाज कारवाई करत तिघा संशयितांना रंगेहात पकडले. या कारवाईत तब्बल २६ हजार ५०० रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या असून आणखी एक आरोपी फरार असल्याचे समोर आले आहे. या घटनेने अमरावती जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांना रहाटगाव परिसरात बनावट चलनी नोटांचा वापर होत असल्याची गुप्त माहिती मिळताच त्यांनी तत्काळ पोलीस पथकासह उपलब्ध पंचांना सोबत घेऊन नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या शासकीय वाहनाने घटनास्थळी रवाना झाले. रहाटगाव येथील वृंदावन कॉलनी परिसरात गुप्त बातमीदारांनी दिलेल्या माहितीनुसार काही इसम अंधाराचा फायदा घेत रस्त्याकडेला बसलेले दिसून आले. पोलिसांनी शासकीय वाहन थोड्या अंतरावर उभे करून शिताफीने सापळा रचला आणि तीन संशयितांना जागीच पकडले. आरोपी पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांना नाव




विचारले असता त्यांची नावे संचित अरविंद चव्हाण (वय १९, रा. रहाटगाव प्लॉट), दीपक बाबुलाल खंडारे (वय ३२, रा. पंचशिल नगर, रहाटगाव) आणि संघरत्न राजेंद्र मोटघरे (वय ३६, रा. जुनी वस्ती, मस्जिदजवळ, रहाटगाव) अशी असल्याचे त्यांनी सांगितले. पंचासमक्ष अंगझडती घेतल्यावर संचित चव्हाण कडे ५०० रुपयांच्या २६ नोटा (१३,०००), दीपक खंडारे कडे १५ नोटा (७,५००) तर संघरत्न मोटघरे कडे १२ नोटा (६,०००) मिळून एकूण ?२६,५०० रुपयांच्या बनावट नोटा ताब्यात घेण्यात आल्या.

या सर्व नोटांचे बारकाईने निरीक्षण केले असता त्यावर आरबीआयचा लोगो व वॉटरमार्क नसल्याचे आणि पाण्याने पुसल्यावर रंग निघत असल्याचे दिसून आले.

यावरून या नोटा बनावट असल्याचे स्पष्ट झाले. सर्व नोटा पंचासमक्ष सीलबंद करून जप्त करण्यात आल्या. चौकशीत संचित चव्हाण याने सांगितले की या बनावट नोटा आदित्य किशोर रामेकर (वय २५, रा. समर्थवाडी, रहाटगाव) याने बाजारात वापरण्यासाठी दिल्या होत्या.

पोलीस शिपाई निलेश जानराव साविकर यांच्या फिर्यादी या प्रकरणात चारही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १७९ आणि १८० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलिसांच्या या कारवाईने बनावट नोटांचा गोरखधंदा उघडकीस येताच रहाटगाव परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये पोलीस दलाच्या तत्परतेचे कौतुक व्यक्त होत आहे.

### ग्रामपंचायतच्या कर्तव्यात कसूर

## अतिक्रमण केल्यामुळे ग्रामपंचायत लोतवाडा येथील सरपंच, उपसरपंच सदस्य तिघेही अपात्र

### ॲड. स्वप्नील एस. ओव्हर (पाटील) यांचा यशस्वी युक्तिवाद

**अमरावती/का.प्र.**

विद्यमान अप्पर आयुक्त, अमरावती येथे अर्जदार भिमराव कुऱ्हाडे यांचे विद्वान वकील स्वप्नील एस. ओव्हर (पाटील) यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत कायद्याचे कलम १६(२) अन्वये लोतवाडा येथील सरपंच व सदस्य यांनी अतिक्रमण केल्यामुळे, अप्पर आयुक्त, अमरावती येथे अपील दाखल केले होते, सदर अपिलात यशस्वीरीत्या युक्तिवाद सादर केल्यानंतर विभागीय आयुक्त यांनी सरपंच दुर्गा गावंडे व लोतवाडा ग्रा.पं. मधील २ सदस्य, यांना अपात्र घोषित केले, सरकारी जागेत अतिक्रमण केल्याचे त्यांच्या अंगलट आले व कर्तव्यात कसूर केल्याने, त्यांना अपात्र घोषित करण्यात आले. दर्यापूर तालुक्यातील लोतवाडा ग्रामपंचायतची निवडणूक पार पडली होती, त्यावेळेस लोतवाडा ग्रामपंचायतचे सरपंच म्हणून दुर्गा गावंडे व सदस्य म्हणून ओंकार कात्रे व शुभांगी भदे यांनी पदभार स्वीकारला होता. त्यांचे अतिक्रमण होते, हे त्यांना सुद्धा माहिती होते, गावातील प्रतिष्टीत व्यक्ती भीमराव कुऱ्हाडे यांनी गावाच्या हितासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सरपंच यांचे अतिक्रमण असल्याने तक्रार दाखल केली होती, परंतु त्यामध्ये अप्पर जिल्हाधिकारी साहेब यांनी कुठलीही शहानिशा न करता भीमराव कुऱ्हाडे यांचे अपील खारीज केले होते, श्री. भिमराव कुऱ्हाडे यांना माहिती होते सरपंच व सदस्यांचे अतिक्रमण आहे त्यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे धाव घेतली, मा. अप्पर आयुक्त, अमरावती यांनी योग्य ती शहानिशा करून सरपंच व सदस्य यांनी अतिक्रमण केल्याने त्यांना अपात्र घोषित केले आहे, अर्जदार भिमराव कुऱ्हाडे यांच्या वतीने विद्वान वकील ॲड स्वप्नील एस. ओव्हर (पाटील) यांनी यशस्वी युक्तिवाद केला.



## कौशल्य विकास केंद्रातर्फे प्रशिक्षण संस्थांकडून प्रस्ताव आमंत्रित

**अमरावती/का.प्र.**

ग्रामीण भागातील उमेदवारांना स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी मिळावी या उद्देशाने शासनामार्फत 'प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र' ग्रामपंचायत स्तरावर स्थापन करण्यात येत आहेत. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत जिल्ह्यात एकूण पाच गावांमध्ये प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहेत. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती यांच्यामार्फत यासाठी प्रशिक्षण संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. जिल्ह्यातील अचलपूर (कांडली), अंजनगाव सुर्जी (कापूसतळणी, सातेगाव), चांदुर रेल्वे (आमला विश्वेश्वर), आणि दर्यापूर (येवदा) या गावांमध्ये किंवा संबंधित तालुक्यांमधील इतर गावांमध्ये प्रशिक्षण राबविण्यासाठी संस्था अर्ज करू शकतात. इच्छुक संस्थांनी आपला परिपूर्ण प्रस्ताव १७ ऑक्टोबर, २०२५ पूर्वी कार्यालयास सादर करावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

अर्जदार संस्था भागीदारी फर्म, एलएलपी, खाजगी,पब्लिक लिमिटेड कंपनी किंवा सोसायटी, पब्लिक ट्रस्ट कायद्यानुसार नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तसेच, मागील चारपैकी (२०२०-२१ ते २०२३-२४) कोणत्याही दोन वर्षांत संस्थेची सरासरी वार्षिक उलाढाल प्रति ठिकाण १० लाख रुपये किंवा त्याहून अधिक असावी. तसेच, अर्जदार कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय संस्थेद्वारे काळ्या यादीत (ँम्ल्ू) नसावा.

संस्थांच्या निवडीचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीकडे राखून ठेवण्यात आले आहेत. अधिक माहिती किंवा अडचणीसाठी कार्यालयाच्या (०७२१-२५६६०६६) या क्रमांकावर संपर्क साधता येईल. या केंद्रामुळे ग्रामीण भागातील युवकांच्या कौशल्य विकासाला मोठी चालना मिळणार आहे. अर्जदार हा ट्रेनर पार्टनर म्हणून स्कील इंडिया डिजिटल पोर्टल पर सूचीबद्ध झालेला असावा.

अर्जदाराने अल्पकालीन प्रशिक्षण मध्ये किमान ३०० उमेदवारांना प्रशिक्षित केलेले असावे. अर्जदाराने उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार दिलेला असावा. सर्व माहिती तसेच आवश्यक कागदपत्रासह या कार्यालयास संपर्क साधावा. अर्जदारास कौशल्यासाठी कोणताही पुरस्कार मिळाला असेल तर प्राधान्य देण्यात येईल.

# स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आरआरआर सेंटरचे उद्घाटन

**अमरावती/का.प्र.**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अनुषंगाने अमरावती महानगरपालिका द्वारा अंबिका नगर येथील मनपा शाळेत RRR (Reduce, Reuse, Recycle) सेंटर चे उद्घाटन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, तसेच सर्व मनपा विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आपल्या घरातील वापरात नसलेली भांडी प्रतिकात्मक स्वरूपात सेंटरमध्ये जमा करून उपक्रमाची सुरुवात केली.

'RRR me 'Reduce, Reuse, Recycle' या तीन महत्त्वाच्या तत्त्वांवर आधारित एक सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम आहे. यामध्ये नागरिकांनी आपल्या घरातील न वापरले जाणारे, पण अजूनही वापरण्यायोग्य वस्तू सेंटरमध्ये आणायच्या असतात, ज्या गरजू नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातात. सेंटरमध्ये जुने पण चांगल्या स्थितीतील कपडे, शालेय साहित्य (पुस्तके, दप्तर, पेन-पेंसिली), वापरण्यायोग्य खेळणी,



घरगुती साहित्य (भांडी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू-जर त्या चालू स्थितीत असतील), वापरलेले पण चांगल्या स्थितीतील पादत्राणे, जुन्या पण कार्यक्षम सायकली, संगणक/मोबाइल (जर ते चालू स्थितीत असतील किंवा दुरुस्त करता येतील) तसेच इतर कोणत्याही दैनंदिन उपयुक्त वस्तू.या सेंटरचा उपयोग पर्यावरण पूरकतेस चालना, वस्तू टाकून न देता त्यांचा पुनर्वापर केल्याने कचरा कमी होतो. गरजूंच्या मदतीसाठी एक माध्यम ज्यांना त्या वस्तूंची गरज आहे, अशा व्यक्तींना त्या मोफत मिळतात. समाजात पुनर्वापराची सवय वाढते, वस्तूंचा योग्य प्रकारे पुनर्वापर झाल्याने वस्तूंचे आयुष्य वाढते. कचऱ्याचे प्रमाण कमी होते, त्यामुळे शहर अधिक स्वच्छ व सुंदर होण्यासाठी हातभार लागतो.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या कडून आवाहन करण्यात येते की, आपल्या घरातील चांगल्या स्थितीतील न वापरलेल्या वस्तू सेंटरमध्ये आणाव्यात, जेणेकरून त्या वस्तू गरजू व्यक्तींना उपयोगी पडतील. गरजू नागरिकांनीही या सेंटरला भेट देऊन आवश्यक वस्तू मोफत घेण्याची विनंती करण्यात येत आहे.

## थकीत हप्ते खात्यात जमा करण्याची चंद्रशेखर भोयर यांची मागणी

**अमरावती/का.प्र.**

शिक्षकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या व मागण्या संदर्भात शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घालत निवेदन सादर केले. प्रलंबित वाढीव टप्पे मंजूर करावेत आणि वेतन आयोगाचे थकीत हप्ते थेट शिक्षकांच्या खात्यात जमा करावे अशी महत्त्वपूर्ण मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेश सह-संयोजक चंद्रशेखर भोयर हे वाशिम, यवतमाळ, बुलढाणा आणि जालना जिल्ह्यांतील शिक्षक संवाद दौऱ्यावर



असताना असंख्य शिक्षक व शिक्षकेतर बांधवांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या संवादांमध्ये सैनिकी अंशतः अनुदानित शाळांना सन २०१९ पासून प्रलंबित असलेले वाढीव टप्पे तत्काळ मंजूर करावेत तसेच जीपीएफ, एनपीएस ,डीसीपीएस खाते नसलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ६ वा व ७ व्या वेतन आयोगाचे थकित हफ्ते थेट त्यांच्या वेतन खात्यात जमा करण्यात यावेत, असे दोन महत्त्वाचे मुद्दे शिक्षकांनी ठळकपणे उपस्थित केले. शिक्षक बांधवांच्या या न्याय्य मागण्यांची तत्काळ दखल घेत चंद्रशेखर भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अधिकृत निवेदनाद्वारे दोन्ही प्रश्नांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली, तसेच या प्रत्यक्ष भेट घेऊन संदर्भातील निवेदन सादर केले. या दोन्ही मागण्यांवर संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी याप्रसंगी दिले अशी माहिती चंद्रशेखर भोयर यांनी दिली.

## प्रतिभा पाटील यांचे निधन

**तिवसा/वार्ताहर**

अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त वेलफेअर सोसायटी अमरावती



च्या उपाधक्षा, श्री समर्थ सोटागीर महाराज बिगर शेती ग्रामीण सहकारी पतसंस्था तिवसा च्या संचालिका तसेच तिवसा जिनींग प्रेसिंग च्या माजी संचालिका प्रतिभाताई अनिलराव पाटील यांचे सोमवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६७ वर्षाच्या होत्या.त्यांच्या मृत्यूपश्चात मुलगा,सून,नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

## सांस्कृतिक कार्यक्रमाने आणली रंगत

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात नवप्रवेशीत विद्यार्थ्यांचा परिचय व स्वागत समारंभ पार पडला. वरिष्ठ अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे उत्साहाने स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा.डॉ. प्रशांत गावंडे, प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. हेमंत खडके, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, रसायनशास्त्र मंडळाच्या केमिकल सोसायटीच्या प्रभारी डॉ. मनीषा कोडापे उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. हेमंत खडके यांनी आपल्या भाषणातून विविध कविता व जीवनमूल्यांचे धडे विद्यार्थ्यांना दिले. शिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्व विकास व सकारात्मक विचारांची गरज असल्याचे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. प्रशांत गावंडे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण व संशोधनात आत्मविश्वासाने पुढे जावे, असे सांगितले. केमिकल सोसायटीच्या अध्यक्ष प्रांजली चव्हाण, कु. रेणुका नाले यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी दिलखुलास नृत्यप्रदर्शन, रॅम्पवॉक, हँडकरचिफ गेम, डेअर, फिशपाँड यांसारख्या खेळांनी रंगत




आणली. विशेषतः फिशपाँडमधील विनोदी संदेशांनी विद्यार्थी-शिक्षक सर्वांना खळखळून हसवले. संपूर्ण विभाग रेट्रो थीम ९० च्या दशकातील बॉलिवुड शैलीत सजविण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी सुध्दा खास ड्रेस कोड पाळत तसा लूक साकारला, त्यामुळे जुन्या आठवणी आणि नव्या उत्साहाचा अनोखा संगम दिसत होता. सर्वांनी एकत्रित नृत्य, खेळ आणि गप्पांचा आनंद घेतला.मिस फ्रेशर मस्के आणि मिस्टर फ्रेशर म्हणून कुणाल मेश्राम यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीत व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक डॉ. मनिषा कोडापे,संचालन स्नेहल गडदे तर आभार अर्पिता दामले हिने मानले. कार्यक्रमाला प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# झोन निहाय स्वच्छता कंत्राटला मिळाला स्थगनादेश

## महापालिकेला जोरदार धक्का

**अमरावती/प्रतिनिधी:-** महानगरपालिकेला ग्रहण लागलेले दिसून येत आहे. महानगरपालिकेचे एका हून एक निर्णय वादाच्या भवऱ्यात सापडत आहे. महापालिकेत एकल कंत्राट पद्धतीची विविध प्रक्रिया राबविण्यात येत होती दरम्यान नागपूर हायकोर्टाने झोंन निहाय स्वच्छता कंत्राटला स्थगनादेश दिल्याने मनपाला



पुन्हा एक धक्का मिळाला आहे. नागपूर हायकोर्टाचे न्यायाधीश अनिल किलोर व न्यायाधीश रजनीश व्यास यांच्या कोर्टाने हा निर्णय दिला आहे. महापालिकेत प्रशासकराज आल्यापासून वेगवेगळे निर्णय पहावयास मिळत आहे?. काही दिवसापूर्वी प्रभाग निहाय स्वच्छता कंत्राट रद्द करून झोन निहाय स्वच्छता कंत्राट देण्यात आले.झोंन निहाय स्वच्छता कंत्राट देताना अटी आणि शर्ती मध्ये कंत्राटदारांच्या फायद्यासाठी बदल करण्यात आले. माजी नगरसेवक बाळासाहेब भुयार, धीरज हिवसे, संजय नरवणे यानी ही जनहित याचिका दाखल केली होती. स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याने अमरावती शहरात कचऱ्याचे साम्राज्य असल्याचे आरोप करून झोन निहाय कंत्राट रद्द करण्याची मागणी केली होती. हायकोर्टाने ही जुने कंत्राट रद्द करून ☞(पान २ वर)

### ■ ११नोव्हेंबरला पुढील सुनावणी

एकीकडे महापालिका निवडणुकीचे वारे वाहत असतानाच नागपूर हायकोर्टात स्वच्छता कंत्राटवर पुढील सुनावणी ११ नोव्हेंबरला रोजी निर्धारित करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच या कंत्राट वर निर्णय लागला तर शहराला स्वच्छतेत ची सेवा मिळेल, परंतु आचारसंहिता लागू झाल्यावर जर हा निर्णय झाला तर अमरावतीकरांना फेब्रुवारी व मार्च मध्येच स्वच्छता सेवा मिळू शकते.

# खोलापूर येथे चायना मांज्याने कापला तरुणाचा गळा

**अमरावती/प्रतिनिधी:** प्रतिबंधित चायना मांज्याने एका तरुणाचा गळा कापला गेल्याची घटना मंगळवारच्या रात्री खोलापूर जवळ समोर आली आहे. यामुळे खळबळ उडाली आहे. गंभीर जखमी अवस्थेत तरुणाला वलगांव येथील बेस्ट रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहे. सय्यद शफी (३७,अंजनगाव सुर्जी) जखमी तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार



अंजनगाव सुर्जी निवासी सय्यद शफी मंगळवारच्या सायंकाळी काही कामानिमित्त आपल्या दुचाकी ने खोलापूर आले होते. काम झाल्यावर ते परत जात होते त्यावेळी☞(पान २ वर)